IRBK-0100380

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे

विषय चरित्र

दा क्र ३८०

IRBK-0100380

नोंद क्रं. ३८० चरित्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना : – खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

8 MAY 1974
10 OCT 1978
3 FEB 1980
27 NOV 1980
22 OCT 1996
५।१०।१०

हें पुस्तक मुंबई येथें रा. रा. मंगेश नारायण कुळकर्णी, यांनीं "कर्नाटक" छापखाना, ४३४ ठाकुरद्वार, मुंबई येथें छापलें.

व

रा. गोविंद कृष्ण प्रधान, पनवेल यांनीं प्रसिद्ध केलें.

म. ग्रं.
क्र. ...३६०.
वि. ...चरित्र
AL-५ २२९
९

# उपोद्घात.

श्रीसद्गुरु राममारुति महाराज भिवंडीकर हे कल्याण क्षेत्रीं शके १८४० भाद्रपद वद्य ९ शनिवार ता. २८ माहे सप्टेंबर १९१८ रोजीं स्वस्थानाप्रत-गमन करिते झाले. त्या दिवसापासून त्यांच्या अवतार कार्यांतील कांहीं विशिष्ट गोष्टी चरित्र रूपानें भाविक व श्रद्धाळु जनांच्या नजरेस याव्या एतदर्थ महाराजांच्या चरणीं रात्रं दिवस प्रार्थना चालू होती. त्या प्रार्थनेकडे महाराजांचें कृपावलोकन त्यांच्या समाधीकालानंतर तीन वर्षांनीं शिष्य मंडळींचे मनोरथ आज अंशतः पूर्ण होत आहेत ह्या बद्दल आनंद होत आहे. "अंशतः" म्हणण्याचें कारण हें कीं महाराज मठ स्थापून एकाच ठिकाणीं क्षेत्र संन्यासी वृत्तीनें राहिले नसल्या कारणानें त्यांच्या समागमांत आलेल्या मंडळीस ज्या अनुभवशीर प्रतीती आल्या त्या सर्वच एकत्र उपलब्ध होऊं शकल्या नाहींत आणि शिवाय ज्याच्या हातून हें अल्पसें चरित्र लिहिलें जात आहे त्यास ग्रंथ-लेखनाचा हा पहिलाच प्रसंग असल्या कारणानें भाषेंत वगैरे बरेच दोष यांत रहाणें केवळ स्वाभाविक आहे. तरी भाविक व प्रेमळ वाचक वर्गास विनम्र विनंति हीच कीं हें अल्प चरित्र केवळ निरहंकार वृत्तीनें व सद्गुरु सेवा घडावी याच ध्येयानें भक्ति पूर्वक लिहिलें आहे यास्तव भाषा वगैरे कडे दुर्लक्ष होणें विशेष संभवतें. तेव्हां यांतील दोषांकडे दृष्टी न देतां ही अल्पशी सेवा त्यांनीं हंसक्षीर न्यायानें मान्य करून घ्यावी.

महाराजांच्या समाधी मंदिराकरितां ज्या ज्या भाविक मंडळींनीं सेवा श्रीचरणीं अर्पण केली व करीत आहेत त्यांजबद्दल कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें आवश्यक आहे.

( १ ) समाधि फंड उभारण्या बद्दल जे थोर गृहस्थ आपल्या सह्यानिशीं विनंति पत्र काढून फंड गोळा करण्याच्या कामीं झटत आहेत; त्यांचें व्यक्तिशः नांव न दिलें तरी महाराजांचा शिष्यसमुदाय त्यांचा ऋणी आहे.

( २ ) समाधी फंडाकडे द्रव्यद्वारा मदत करण्यांत कल्याणकर बंधूंनीं जें औदार्य व्यक्त केलें आहे तें फारच प्रसंशनीय आहे व त्यांचें अनुकरण इतर गांवींहि झाल्यास हें समाधीस्थान म्हणजे मोठेसें **संस्थान** होऊन चिरकाल राहील अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

(३) कल्याण येथील श्रीमंत रा. रा. सखाराम गणेश उर्फ बापूसाहेब फडके यांनीं महाराजांचे समाधीस लागून एक मजली सभामंडप बांधण्याचें काम कल्याणकर बंधूचे सहायानें हातीं घेतलें असून तें पुरें करण्याकडे अविश्रांत श्रम घेत आहेत हें त्यांस अत्यंत भूषणावह आहे. कल्याण, भिवंडी, ठाणे, मुंबई, दादर, वांद्रें, पनवेल, वसई, डहाणू, तळेगांव (दाभाडे), पुणें वगैरे गांवीं हल्लीं वर्गणी गोळा करण्याचें काम चालू आहे तरी त्या गांवचे सर्व बंधूही व्यापारी वर्गासह पुढें होऊन हातीं घेतलेल्या या कामीं यश देणें सर्वस्वी त्यांचे मदतीवर अवलंबून आहे व ती मदत यथाशक्ति एक दिलानें होईल अशी आशा बाळगितों.

( ४ ) रा. रा. जनार्दन गंगाधर प्रधान, बाळकृष्ण वासुदेव प्रधान, बडोदें व रा. रा. शंकर रामचंद्र मेढेकर, कल्याण ह्या गृहस्थांनीं महाराजांच्या समाधि मंदिराकडे आपली कल्याण येथील सर्व जागा अर्पण केली व तसेंच रा. रा. प्रभाकर गंगाधर मेढेकर, व रा.रा. त्र्यंबक नीलकंठ कर्णिक (एग्यु मिक्श्चरवाले) यांनीं समाधी नजीक असलेली आपली जागा समाधि फंडाकडे अर्पण केली. तसेंच रा. रा. शिवराम नारायण कामथे, माटुंगा यांनीं आपली अलिबाग तालुक्यांत पोयनाड येथें असलेली भात शेती जमीन—सुमारें २५०० रुपये किंमतीची—महाराजांचे चरणीं अर्पण केली.

५ रा. रा. दामोदर आत्माराम मोकाशी रहाणार पेण याहीं आपले कनिष्ठ बंधू कै० विष्णु आत्माराम मोकाशी यांचे स्मरणार्थ रुपये ५०१ पांचशेंएक समाधी मंदिराकडे देण्याचें अभिवचन दिलें आहे. तसेंच डहाणू येथील रा. रा. नारायण गणेश जयवंत यांचे मार्फत यांचे आत्याकडून कै० सौ. इंदिराबाई गोविंदराव ताम्हणे यांच्या स्मरणार्थ अजमासें ३॥ तोळे वजनाची बोर माळ व रा. रा. बाळकृष्ण त्रिंबक गुप्ते यांचेकडून त्यांची मातुश्री कै० सौ० गंगाबाई त्रिंबक गुप्ते यांचे स्मरणार्थ १। तोळा वज़नाची आंगठी श्रींच्या मंदिराकडे अर्पण करण्यांत आली आहे. या सर्व उदार देणग्यांबद्दल भक्तसमुदाय ह्या गृहस्थांचा आभारी आहे.

( ६ ) प्रकरण १३ मध्यें नमूद केलेली पुस्तकरूपानें मदत करण्यांत रा. रा. दत्तात्रय जयराम बेन्द्रे बी. ए., कल्याण, शंकर दामोदर बेंद्रे, कल्याण, व शंकर नारायण पालकर या त्रयींचें औदार्य स्तुतीस पात्र आहे. मंडळीनीं या पुस्तकांची मागणी करून त्या रूपानें समाधी फंडास मदत करण्याचें श्रेय घ्यावें अशी नम्र विनंति आहे. तसेंच रा. रा. दत्तात्रेय वामन गुप्ते, दादर, हे महाराजांची छबी ( फोटो ) माफक किंमतींत देऊन शिवाय आपल्या फोटोग्राफीच्या प्राप्तींतून महाराजांच्या समाधि-फंडाकडे कांहीं अंश अर्पण करीत असतात ही त्यांची सेवा व जे गृहस्थ द्रव्यद्वारा या फंडाकडे मदत करीत आहेत त्यांची सेवा प्रशंसनीय आहे. सारांश महाराजांच्या चरणीं अनेक गृहस्थांचें लक्ष लागून राहिलें आहे ही अत्यन्त समाधानाची गोष्ट आहे.

७ श्रींच्या वार्षिक पुण्यतिथ्युत्सवाप्रीत्यर्थ वगैरे होणाऱ्या खर्चांकरितां कांहीं तरी कायमचें उत्पन्न असावें म्हणून फंडाचे व्यवस्थापक रा. रा. शांताराम आत्माराम जयवंत, शांताराम विठ्ठल गुप्ते व त्रिंबक सदाशिव गुप्ते यांहीं दहा खंडी भात उत्पन्नाची जमीन रु. ३७०० ला खरेदी करण्याचें साठें केलें. परंतु त्यांचे अजमासाप्रमाणें फंडांत वसूल वेळीं झाला नाहीं व शिलकेच्या अभावीं झालेला करार रद्द करण्याची वेळ आली त्या प्रसंगीं श्रींचे कार्यास माघार होऊं नये या श्रद्धेनें सदहू व्यवस्थापकांपैकीं रा. रा. शांताराम विठ्ठल गुप्ते यांहीं ठरलेल्या रकमेपैकीं अंशतः तरी रक्कम देऊन करार कायम राखावा म्हणून तूर्त फंडाकडे दीड हजार रुपये दिले आहेत. या मदतीमुळें येत्या वर्षीं दहा खंडी भात श्रींचे समाधीफंडाकडे येईल. ही रक्कम परत घेणेची सवलतही योग्य अशीच रा. शांताराम भाऊंनीं दिली आहे. जसजशी वर्गणी वसूल होईल तसतशी ते आपली रक्कम परत घेणार आहेत या त्यांच्या उदार कृत्याबद्दल शिष्यसमुदाय त्यांचा ऋणी आहे.

या चरित्रलेखनास रा. रा. गोविंद कृष्ण प्रधान हल्लीं वस्ती पंढरपुर यांनीं मूळ स्फूर्ति दिल्यामुळें या चरित्राचें सर्व श्रेय त्यांजकडे आहे.

कर्नाटक प्रेसचे मालक रा. रा. मंगेश नारायण कुळकर्णी यांनीं थोड्या अवकाशामध्यें परिश्रम घेऊन पुस्तक छापून दिल्याबद्दल यांचेही आभार मानणें अवश्य आहे.

श्री. व्यंकटेश्वर प्रेसचे मालक कै. शेट खेमराज श्रीकृष्णदास व हल्लींचे मालक शेट रंगनाथ खेमराज व म्यानेजर शिवरतन व्याजपेई, इन्दुप्रकाशकर्ते रा. रा.

दामोदर सावळाराम यंदे, संदेशकर्ते रा. रा. अच्युत बळवंत कोल्हटकर बी. ए., एलएल. बी., जगद्वृत्ताचे संपादक रा. रा. नानाभाई गोविंद चित्रे व महाराष्ट्र साहित्याचे संपादक रा. रा गोविन्द गोपाळ टिपणीस या गृहस्थांहीं अडचण सोसून आपापल्या पत्रांतून महाराजांसम्बन्धी वेळोवेळीं लेख लिहून स्वतंत्र जाहिराती व हँडबिलें छापून देण्याचें कामीं मदत केली व करीत आहेत हें त्यांचें कृत्य गौरवास विशेष पात्र आहे.

या चरित्राचें निरीक्षण करून तें सुव्यवस्थित रीतीनें वाचकांपुढें आणण्याचें श्रेय ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर बी. ए. मुमुक्षुकर्ते व संतांच्या चरित्रांचे लेखक व श्री. रा. रा. वामनराव आत्माराम कीर्तिकर बी. ए. एल्. एल्. बी. बॅरिस्टर ॲट लॉ यांच्याकडे आहे. यांनीं परिश्रम घेऊन आपल्या ज्ञानाचा लाभ दिला व या चरित्रास ह. भ. प. पांगारकर यांनीं स्वतः प्रस्तावना जोडून भूषित केलें या उदार अंतःकरणाबद्दल शिष्यसमुदाय त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

या चरित्राच्या विक्रीपासून होणारें सर्व उत्पन्न समाधिफंडाकडे जमा व्हावयाचें आहे. तसेंच पारिग्राफ ३ व ७ मध्यें नमूद केलेल्या वस्तुस्थितीकडे लक्ष देऊन हा समाधिफंड हस्तें परहस्तें उदार आश्रय देऊन ऊर्जित दशेस आणण्याची ईश्वरानें भाविक वर्गास सद्बुद्धि द्यावी अशी विनम्र प्रार्थना करून हें अल्पचरित्र महाराजांच्या चरणीं अर्पण करितों.

कल्याण, भाद्रपद शुद्ध ४ शके १८४३,<br>( श्रीगणेश चतुर्थी ) सोमवार,<br>ता. ५ सप्टेंबर, सन १९२१.

महाराजांचा शिष्यसमुदाय.

ग्रं. नं. २२९

# प्रस्तावना.

जे ऐसे स्वसुखें मातले । आपणपांचि आपण राहिले ॥
ते मी जाणे निखिल वोतले । सामरस्याचे ॥ १३७ ॥
ते आनंदाचे अनुकार । कीं सुखाचे अंकुर ॥
कीं महाबोधें विहार । केले जैसे ॥ १३८ ॥
ते विवेकाचे गांव । कीं परब्रह्मींचे स्वभाव ॥
नातरी अळंकारिले अवयव । ब्रह्मविद्येचे ॥ १३९ ॥

—ज्ञानेश्वरी अ० ५.

१ श्री राममारुति महाराज यांचें हें गोड चरित्र सर्व भाविकांस आनंददायक वाटेल अशी मला खात्री आहे. साधुसंतांचें चरित्र हें पेढयासारखें जाणत्या नेणत्यांस आवडणारेंच आहे. शास्त्रीय ग्रंथ हे नारळांसारखे असतात, बाहेरची कठिण कवटी फोडावी तेव्हांच त्यांतील खोबरें हातीं लागायचें ! संतचरित्रांची गोष्ट तशी नाहीं. तीं आंत बाहेर गोडच गोड असतात. संत माधुर्याचे अनुकार असल्यामुळें त्यांचें दर्शन, त्यांचें बोलणें चालणें, त्यांचे आहार विहार, त्यांच्या सहजलीला, त्यांचीं सकल चरित्रें अंतर्बाह्य मधुर असतात व जाणांनेणां सकळांतीं वेड लावून सोडतात. 'देव रोकडा सज्जनीं.' देव निर्गुण, निरंजन, निराकार आहे, पण संत सगुण, साकार व सर्वसेव्य असतात. थोरला देव आम्हां सामान्य जीवांना चोरला आहे, पण तोच देव संतांच्या सगुण रूपानें व्यक्तीस आल्यामुळें अधिक सुसेव्य झाला आहे. आम्हांला देवापेक्षांहि संतच अधिक प्रिय वाटतात. व्यासशुकादि किंवा ज्ञानेश्वर नाथ समर्थ तुकोबादि जे भगवंताचे अनुग आहेत ह्यांनीं देवाला ध्यावें, आम्ही संतांचे अनुग. आह्माला संतच ठाऊक ! एखादा मुलगा बाळपणच्या अल्लड स्वभावानुसार सवंगड्या समवेत खेळाच्या नादांत बाहेर राहिला व घरीं यायला त्याला रात्र पडेतों उशीर झाला तर घरांत पाय ठेवण्यापूर्वी बापाचें स्मरण होऊन तो बिचकतो. बाप रागें भरेल, बाप मारील याचें त्याला भय वाटतें. मग तो मागच्या दारानें स्वयंपाक घरांत जातो, आईशीं मोकळ्या मनानें बोलतो व आई

जरा रागावतेही, पण नवनीताधिक कोमल असें तिचें हृदय तात्काळ द्रवतें. मुलानें घरीं यायला उशीर केला याबद्दलचा तिचा राग मुलाला पाहतांच नाहींसा होतो व त्याला भूक लागली असेल असें वाटून त्याची भूक तिलाच लागते! ती मुलाची रदबदली करण्याकरितां हळूच दारांत उभी राहून मधुर स्वरानें पतिराजास सांगते, 'म्हटलें, बाळाला मीच कांहीं कामाला पाठविलें होतें, त्याला जरा उशीर झाला ह्मणून त्याजवर रागवायचें नाहीं बरं का? पुन्हां नाहीं त्याला उशीर व्हायचा.' कांतेच्या तोंडचे हे मधुर शब्द ऐकल्यावरही रागावेल असा अरसिक कोणता कांत आहे? कांतेची मोहनीच तशी आहे. अशीच भक्ताचीहि देवावर मोहनी आहे. भक्ताची देवावर याच प्रेमबळावर सत्ता चालते. संत आईसारखे कोमल असतात. बापासारखा देव आहे. तुकोबा सारख्यांनीं देवाच्या मातृतुल्य वात्सल्याचें वर्णन केलें आहे, पण तो त्यांचा अनुभव आहे. आम्हां मुमुक्षु जीवांना संतच निकटचे वाटतात. वरील वर्णन माझ्या पदरचें नाहीं. सत्कवि मोरोपंतांनीं म्हटलें आहे:—

> भगवंत भगवदनुगां, आह्मां तो संत सदनुगां ठावे।
> बाळें प्रथम बयेचे, बापाचे चरण तदनु, गांठावे॥ १॥

देव ते संत व संत ते देव हें खरें आहे व ह्मणून संतांविषयींचा आमचा उत्कट प्रेमभाव पाहून देवाला गोडच वाटेल असा आमचा विश्वास आहे! असो. संत आमचे मायबाप, संत आमचे गुरु, संत आमचा सकल परमार्थ आहेत. त्यांचे पाय धरिल्यानेंच देवाचें वर्म कळणारें आहे. आमचे उद्धारक संतच होत.

२ श्रीराममारुति महाराजांना प्रत्यक्ष भेटण्याचा योग मला आला नाहीं, तथापि आप्तसंबंधानें माझें जाणें येणें कल्याणास होत असल्यामुळें त्यांची कीर्ति मी पुष्कळ वर्षें ऐकून आहें. त्यांचें अखंड रामभजन व त्यांच्या लीला ज्या ह्या ग्रंथांत वर्णिल्या आहेत त्यांपैकीं बऱ्याच लीला मला ऐकून माहीत आहेत; म्हणून ग्रंथाच्या प्रामाण्याविषयीं कोणालाही शंका घेण्याचें कारण नाहीं हें लिहिणें माझें कर्तव्य मी समजतों. प्रस्तुत चरित्रग्रंथ रा. रा. शिवरामभाऊ गुप्ते यांनीं महाराजांच्या दुसऱ्या कित्येक शिष्यांच्या व भक्तांच्या साह्यानें तयार केला आहे. याची हस्तलिखित प्रत दुरुस्तीपूर्वी व नंतर आणि तिसऱ्यांदा छापल्यानंतर याप्रमाणें तीन वेळां मला दाखविण्यांत आली व तीनही वेळ मी ती प्रेमादरपूर्वक वाचली. संतचरित्र मूळचेंच गोड असल्यामुळें कोणी कसेंही लिहिलें तरी तें

गोडच लागतें, मग त्यांत सांप्रदायिक गुरुभक्तांनीं गुरुभक्तीनें प्रेरित होऊन लिहिलें तर त्याची माधुरी काय वर्णावी ? प्रस्तुत चरित्र अशांपैकींच असल्यानें फार सरस उतरलें आहे. महाराजांची उत्कट रामभक्ति व चरित्र लेखकांची उज्ज्वल गुरुभक्ति या गंगायमुनांचा यांत मधुर संगम झाला आहे. सर्व चरित्रभर सात्विक भावाची दिव्य प्रभा पसरली आहे. सर्व परमार्थ हितेच्छूंना सदर ग्रंथ उद्बोधक वाटेल यांत शंका नाहीं.

३ ग्रंथांतील उत्तम स्थळें मी न दाखवितां ज्याचीं त्यांनींच निवडून काढावीं यांत विशेष स्वारस्य आहे. तथापि विहंगम दृष्टीनें मी ग्रंथावरून नजर फिरवून जातों. मूळ नक्षत्रावर महाराजांचा जन्म झाला, शांती वगैरे करण्यांत आली, वडिलांना भयंकर दुखणें आलें व त्यांतून श्रीबालमुकुंद स्वामींच्या कृपाशीर्वादानें ते वाचले हा कथाभाग मोठा हृदयंगम आहे. मूळ नक्षत्रीं जन्म अशुभ मानला आहे, तथापि श्री एकनाथ महाराजांचा जन्मही मूळ नक्षत्रावरच झाला होता व ज्योतिषाप्रमाणें त्याचा ठोकताळा येऊन नाथांचे आईबाप त्यांच्या बाळपणींच वारले. स्थल व काळ यांच्या शुभाशुभपणाचा विचार सामान्य जन करीत असतात व त्यांत कांहीं चूक आहे असेंही नाहीं. जन्ममृत्यु ज्याच्या त्याच्या प्रारब्धानुसार होत असतात, त्याचा गुणदोष दुसऱ्याला लावण्यांत कांहीं अर्थ नाहीं. नाथसाहेब किंवा राममारुति महाराज यांच्या सारखे पुण्यात्म्यांना

'तुका ह्मणे हरिच्या दासा। शुभ काळ दाही दिशा'

या न्यायानें सर्वच स्थळ काळ शुभ असतात. ते त्यांचें आत्यंतिक हितच करीत असतात. नाथराज लिहितात:—

अभंग

मुळीच्या मुळीं एका जन्मला। माय बापे थोर धाक घेतला ॥ १ ॥
कैसें मूळ नक्षत्र आलें कपाळा। स्वयें लागलों दोहींच्या निर्मूळा ॥ २ ॥
शांती करितां अवघ्यांची झाली शांती। मुळीं लागोनियां लाविली ख्याती ॥३॥
एका जनार्दनीं मुळीच्या गोठी। माये सगट सगळा बापचि घोटी ॥ ४ ॥

माय प्रकृति व बाप पुरुष या दोघांनांही गिळून राहिलेला क्षराक्षरातीत परमात्मा तोच एकनाथ असा याचा लक्ष्यार्थ आहे. हा अभंग गाथ्यांत नाहीं पण मला पैठण येथील जुनीं दप्तरें चाळतांना त्यांत सांपडला. असो. राममारुतिमहाराज मूळ नक्षत्रावर जन्मले व त्यांनीं नाथाप्रमाणेंच नामस्मरण बळानें पुरु-

त्तम योग साधला. त्यांना धड्यावर अक्षरें शिकायचा सहजच कंटाळा आला. कां कीं त्यांनीं अक्षर परब्रह्माचा अभ्यास चालविला होता. त्यांचे पूर्व संस्कार अत्यंत पवित्र होते हें त्यांच्या बाळचरित्रावरूनही दिसतें. नामरंग त्यांनीं अपार लुटला यांत शंका नाहीं. पालखीच्या मिरवणुकींतली त्यांची तन्मयता, त्यांचें नाचणें, उडणें, गाणें सर्वच अत्यंत मोहक होतें व त्याचें वर्णनही मनोहर आलें आहे. त्यांचें ' रामा रामा मारुते रामा रामा ' हें भजन व मारुतिरायासारखें हुंकारयुक्त उड्डाण ज्यांनीं पाहिलें असेल त्यांना भक्तिसुख भोगणाऱ्या भाग्याची कांहीं तरी कल्पना आली असेल. संत व भक्त सहज निर्विकल्प सुख भोगीत असतात, आपण त्याची कल्पना करीत कल्पनेच्या पार होण्याचा अभ्यास ठेवावा म्हणजे हरिकृपेनें तें आपलें निजसुख आपल्याला मिळेल. राम मारुति महाराजांना मुंबईस जीवनजी महाराजांच्या चाळींत ते वेळीं असलेले श्री स्वामी बालमुकुंद यांचा अनुग्रह होता. गुरुशिष्यांचें प्रेम व शिष्याची गुरुभक्ति अपूर्व होती. स्वामींना बाळपणीं मीं पाहिलें होतें असें मला वाटतें. स्वामी शके १८०५ चे पौषांत समाधिस्थ झाले व त्याच सालच्या चातुर्मासांत त्याच चाळींत मी इंग्रजी शिकण्याकरितां प्रथम राहिलों होतों. तेथें स्वामींच्या मठांत दर्शनास नित्य जात असें ! त्याचाच तर हा प्रताप नसेल ना कीं स्वामींच्या पट्ट शिष्याच्या चरित्राच्या ह्या ' नाथद्वारींच्या रांजणांत ' ही प्रस्तावनारूप माझी छोटीशी कळशी पडण्याचा योग आला आहे. हें लिहितां लिहितां मला सुचत आहे ! श्री पांडुरंगाच्या दयेनें बाळपणापासून संत साधु दर्शनाचे योग मला बहुत आले आहेत व सकल साधु संतांची मजवर कृपादृष्टि आहे असा माझा दृढ विश्वास आहे. वयाच्या सहावे वर्षीं श्री देव मामलेदारांच्या हातचे पेढे त्यांचे जवळ सतत सात आठ दिवस बसून मला खावयास मिळाले होते ! मी आत्मचरित्रांत वाहवत आहें खरा, पण माझ्या डोळयांपुढें श्री बालमुकुंद स्वामींचा तेव्हांचा मठ व त्याचें पवित्र वातावरण यावेळीं अगदीं ठळकपणानें दिसत आहे !

८ प्रस्तुत चरित्रांत ' महाराजांची ईश्वर नामभाषा ' हें प्रकरण अगदीं अपूर्व व चित्तवेधक आहे. त्यांची सर्व भाषा देवाच्या २२ नामांत बसली होती ! ती संगतीमुळें शिष्यांना समजत असे ! त्या नामांचे अर्थ काय होते हें ७ व्या प्रकरणांत मोठ्या शोधक व चौकस बुद्धीनें लिहिलें आहे. ते विवक्षित नामेंच विवक्षित अर्थीं उच्चारीत ! वारांचीं नांवेंही त्यांतच बसविलीं होतीं. निरर्थक शब्द-

शास्त्र टाकून देऊन त्यांनीं आपली व्यवहार्य सर्व भाषा देवाच्या २२ नामांत बसविली होती ही गोष्ट अत्यंत कौतुकास्पद वाटते. 'महाराजांची राहणी' हें ८ वें प्रकरण बोधप्रद आहे. श्रीसमर्थांप्रमाणें लहान मुलांवर त्यांचें अत्यंत प्रेम होतें. ( १ ) ईशावास्योपनिषद व ( २ ) चतुःश्लोकी भागवत यांवरील ओव्याही ९ वे प्रकरणांत दिल्या आहेत त्या मननपूर्वक पहाव्यात. त्यांच्या साधुत्वाच्या १६ गोष्टी ११ व्या प्रकरणांत दिल्या आहेत त्या भाविकांस अत्यंत प्रिय होतील यांत शंका नाहीं. अखेर 'स्तुति सुमनांजलि' या प्रकरणांत महाराजांवर त्यांच्या शिष्यांनीं केलेलीं स्तुतिस्तोत्रें दिलीं आहेत. या ग्रंथाची रूपरेषा या प्रकारची आहे. सदर ग्रंथ सांप्रदायिकांतच नव्हे तर संप्रदायाच्या बाहेरीलही सर्व भाविकांस आदरणीय वाटेल अशी उमेद आहे.

पुणें, मुमुक्षुकचेरी,<br>
श्रीकृष्णाष्टमी १८४३

साधुसंतांचा दासानुदास,<br>
लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.

# अनुक्रमणिका.


पृष्ठ.

| | |
|---|---|
| मंगलाचरण ... ... ... ... | १–३ |
| कुल-वृत्तांत ... ... ... ... | ३–६ |
| बालपण ... ... ... ... | ६–२० |
| साधन-मार्ग ... ... ... ... | २०–२६ |
| महाराजांचे सद्गुरु ... ... ... | २६–३२ |
| गुरुसमाधी ... ... ... ... | ३३–३५ |
| महाराजांची ईश्वरनामभाषा ... ... | ३६–४० |
| महाराजांची रहाणी ... ... ... | ४१–४५ |
| अवतारमहिमा ... ... ... | ४६–५९ |
| ब्रह्मचर्य व्रत... ... ... ... | ५९–६३ |
| महाराजांच्या साधुत्वाच्या गोष्टी ... ... | ६३–७६ |
| अखेर साधिली ... ... ... | ७६–८३ |
| समाधिस्थान... ... ... ... | ८४–८८ |
| स्तुतिसुमनांजलि ... ... ... | ८८-१०२ |
| स्फुट पदें वगैरे ... ... ... | १०३–१०६ |

फोटो.

| | |
|---|---|
| श्रीबालमुकुंद स्वामी ... ... | २६ |
| श्रीराममारुती महाराज... ... ... | २२ व ४२ |

म. ग्रं. सं. ...
क्रा. क्र.................
दि. ........................

श्रीगजाननाय नमः

# श्री सद्गुरु समर्थ राममारुतये नमः

प्रकरण १ लें.

## मंगलाचरण.

मंगलधामा मंगलमूर्ती । ब्रह्मसनातन ब्रह्मणस्पती ।
जेष्ठराय श्रेष्ठजगती । मायातीता सर्वेशा ॥ १ ॥
परब्रह्म ऐसा जो सनातन । तयासी वदती शिव नन्दन
तो हा भक्तालागीं गजानन । प्रणव स्वरूपा अवलम्बित ॥ २ ॥
तव कृपा झालियावरी । पांगुळ वेंघेल महागिरी ।
मूक पढेल वेद चारी । दिव्य ज्ञान पावोनी ॥ ३ ॥
तरी शरण आलों देवाधिदेवा । करीं धरी विघ्नराया ।
सद्गुरुलीला वर्णावया । बुद्धि-दाता तूं होई ॥ ४ ॥

---

मूळमाया जी प्रणवाम्बरी । जीच होय वाचेची ईश्वरी ।
वर्णिती जियेतें वेद चारी । ती गणेश रमणी शारदा ॥ १ ॥
माते ! जिव्हाग्रीं अखण्ड वसोन । वदवी सम्पूर्ण लीला सुरस गहन ।
माते ! तव कृपेवांचून । शक्य न होय वर्णावया ॥ २ ॥

---

आतां नमूं परमगुरु । श्री बालमुकुन्द स्वामीसद्गुरु ।
आणि परात्पर गुरु । श्री गुण्डोमहाराज ॥ १ ॥

सिद्ध सन्त तुह्मीं दयासागर । भक्तांसि तुह्मी करुणाकर ।
मनेच्छा पूर्ण करा सत्वर । मागणें हेंचि दयाळा ॥ २ ॥

---

सद्गुरु ज्ञानाचा न लगे पार । भाविकासी जो करुणाकर ।
मनेप्सित देतसे सत्वर । सद्भाव चित्तीं जाणुनी ॥ १ ॥
गुरू समान मानूं देव । तरि तया न देववे आत्मवैभव ।
गुरुपदीं ठेवितां दृढ भाव । आपणासम करीतसे ॥ २ ॥
गुरु केवळ माय माउली । भक्ति जाणुनी करी साउली ।
सद्गुरुवांचूनि कदा काळीं । ज्ञानप्राप्ती नव्हेचि ॥ ३ ॥
सद्गुरू ऐसा दयाघन । सद्भावें धरितों तव चरण ।
तव कथा सुरस गहन । वदे आनन्दे गुरुमाये ॥ ४ ॥

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥
ब्रह्मानन्दं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं ।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादिलक्ष्यम् ।
एकं नित्यं विमलमचलं सर्वधी साक्षिभूतम् ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ।

न गुरोरधिकं न गुरोरधिकं ।
शिवशासनतः शिवशासनतः ॥

मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिं ।
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ॥

नमोस्त्वनन्ताय सहस्रमूर्तये सहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे ।
सहस्रनाम्ने पुरुषाय शाश्वते सहस्रकोटी युगधारिणे नमः ॥

---

अवघा बोले चाले हरी । ज्याची कथा तोचि करी ॥ १ ॥
होऊनियां श्रोता वक्ता । करी आपुली आपण कथा ॥ २ ॥
विश्वव्यापक परिपूर्ण । अवघा एकचि नारायण ॥ ३ ॥
कैंचा रमावल्लभदास । अवघा हरीचा विलास ॥ ४ ॥
जो साधुचा अंकित जीव झाला । त्याचा असे भार निरंजनाला ॥

## प्रकरण २ रें.

## कुल-वृत्तान्त.

"शं सुख ह्याचा कर्ता यास्तव शंकर तुला ह्मणति सुकवी"

—मोरोपंत.

[१ महाराजांचे पूर्वज पेण गांवचे देशपांडे. २ वडील, मातुःश्री व भावंडें.]

महाराजांचें घराणें साम्पत्तिक दृष्ट्या व प्रतिष्ठेनें थोर असून या घराण्यास मानमान्यताहि बरीच होती. कुलाबा जिल्ह्यांत पेण गांवीं यांच्या घराण्याकडे देशपांडेपणाचें वतन अद्याप चालू आहे. यांचे पूर्वज दान शूर व सात्विक वृत्तीचे असल्यामुळें गांवांत ते प्रमुखत्वांत गणिले जात. सात्विक वृत्तीमध्यें केंव्हांही रहाणी शुद्ध निरहंकार व मत्सरविरहितच असावी लागते; तसेंच असलीं माणसें निःस्वार्थी असतात; व या गुणामुळेंच त्यांचे विचार सर्व मतांच्या लोकांस सारखे पटून मतभेदामुळें परस्परांपासून अलग राहूं इच्छिणाऱ्या मण्डळीवर ह्यांच्या विचाराचा पगडा बसून सर्वत्र ऐक्य नांदतें. असे मतभेदाचे प्रसंग पेण गांवीं वारंवार येत असून त्यांचा निवाडा करण्याचें काम महाराजांच्या घराण्याकडेसच येत असे. तो काळ राजकीय चळवळीचा असल्यामुळें शान्तपणें न्याय निवाडा देण्याकरितां असल्या लोकोत्तर गुणांच्या माणसांची अवश्यकता फार असे व त्यांत ह्या घराण्याकडे देशपांडेपणाचा अधिकार असल्यामुळें हें घराणें सर्वत्रांस पूज्य व महनीय झालें होतें.

२. यांचे पणजे देवाजी उर्फ देवराव हे रत्नागिरी जिल्ह्यांत चांगल्या हुद्यावर कामगार होते व यांचे आजे सीताराम हे साधारण नोकरीवर होते; तरी पण

साम्पत्तिक स्थिति बऱ्यांतली होती. यांच्या वडिलांचें नांव राजारामभाऊ व मातुःश्रीचें नांव सीताबाई; ह्या भिवंडी येथील कुळकर्णी घराण्यांतील होत. माउली सीताबाई ह्या थोर घराण्यांतील खऱ्याच, शिवाय त्यांचे ठायीं ईश्वरभक्ति अप्रतिम होती. यांचें उपास्य श्रीराम होय. श्रीरामाची अलोट भक्ति करून आपल्या हृदयमंदिरांत त्यास स्थान दिल्याशिवाय श्रीराममारुति महाराजासारख्या दिव्य रत्नानें या माउलीच्या गर्भांत वास करणें शक्य होतें काय ? हृदयांत श्रीराम व गर्भांत श्रीमारुति अशीं शिंपल्याचीं पुटें तयार होतांच त्यांत श्रीरामभक्तिरूप स्वाति नक्षत्राचा पर्जन्यबिन्दु पडला म्हणूनच ना हें दिव्य मोतीं राममारुति ह्या जोड नांवानें ह्या जगांतील नामाचे दरबारांत दृग्गोचर झालें ? वडिलांचें नांव राजाराम व मातुःश्रीचें नांव सीताबाई यांतही श्रीरामानें व्यावहारिक दृष्ट्या किती मजेदार योग घडवून आणिला !! पारमार्थिक दृष्ट्या महाराजांचे वडील श्रीराम व मातुःश्री सीताबाई व देह धारण करविल्यावरहि श्रीरामचद्रांनीं मातापितराच्या नांवाचा तोच योग कायम ठेविला. राजारामपंतांस दोन मुली व दोन मुलगे मिळून चार अपत्यें. दोन मुलांपैकीं वडील वामन व धाकटे शंकर. हे शंकरच आपले चरित्र नायक होत. हे पुढें श्रीराम-मारुति-महाराज भिवंडीकर या नांवानें प्रसिद्ध झाले.

श्रीसमर्थ आपल्या दासबोधांत नरदेहाचें खालीलप्रमाणें वर्णन करितात. ते म्हणतात—

"धन्य धन्य हा नरदेहो। याची अपूर्वता पहाहो ॥
जो जो कीजे परमार्थ लाहो । तो तो पावे सिद्धीतें ॥

श्रीनाथमहाराज देहाचें वर्णन आपल्या रसाळ वाणींत खालीलप्रमाणें करितात. तो मूळांतच वाचण्याची वाचकांनीं तसदी घ्यावी अशी त्यांस प्रेमाची सूचना आहे. नाथ म्हणतात—

देहासी जें गुरुत्व जाणा । तें दों प्रकारीं विचक्षणा ।
देहा ऐसें गोमटें । पाहतां न भेटे लोकीं ॥
सांगेन त्याच्या लक्षणा । संरक्षणा परमार्थी ॥
देहा ऐसें वोखटें । पृथ्वीमाजीं नाहीं कोठें ॥
वोखटं ह्मणोनि त्यागावें । तैं मोक्षसुखासि नागवावें ॥
हो का गोमटं ह्मणोनि भोगावें । तैं अवश्य जावें नरकासी ॥

तरी हें त्यागावें ना भोगावें । मध्यभागीं विभागावें ॥
आत्मसाधनीं राखावें । निजस्वभावें हितालागीं ॥

एक. भाग. ८. २५. २५.

आंग्लकवि शेक्सपिअरनें नरदेहाविषयीं असेच उद्गार काढिले आहेत.

"What a piece of work is Man. How noble in reason! How infinite in faculty! In form and moving how express and admirable! In action how like an angel! In apprehension how like a God! The beauty of the world! The paragon of animals. —*Hamlet*.

[नरदेहामध्यें असें कांहीं विलक्षण सामर्थ्य आहे कीं जो जो सद्धेतु मनांत धरावा तो तो सिद्धीस नेतां आलाच पाहिजे; परंतु हें मर्म हस्तगत करून देहाचें सार्थक करणारीं नररत्नें फार विरळा, व अशा नररत्नांनाच सत्पुरुष ही संज्ञा आहे. श्रीराममारुति हें रत्न ह्याच कोटीपैकीं असून त्यांचे ठायीं भगवद्भक्ति, विरक्तता, विद्वत्ता वगैरे लक्षणें अपूर्वत्वानें विलसत असल्यामुळें हे सन्तपदास चढले.] असो.

राजारामभाऊ हे आपल्या आजोळीं भिवंडी येथें असतांना शेट वरीम करीम नांवाचा मिठाचा मोठा व्यापारी होता, त्याच्याकडे त्यांना मुनिमाची जागा मिळाली. त्यांच्या अंगची हुशारी, स्वामीनिष्ठा व प्रामाणिकपणा पाहून वरीम शेटनें मुम्बई, भिवंडी, घाटावर वगैरे ठिकाणीं असलेल्या सर्व पेढयांवरील आपल्या मुख्य कचेरींत ( ऑफिसांत ) राजारामभाऊंस मोठ्या मुनिमाच्या जागीं नेमिलें. लक्षावधि रुपयांचा व्यवहार करणारे हे शेटजी असल्यामुळें ही जागा फारच महत्वाची, जबाबदारीची व वैभवाची होती. आधींच गृहस्थिति चांगली, व त्यांत ही अधिकाराची जागा. अशा स्थितींमुळें आमचे महाराज लहानपणीं फारच थाटांत रहात. कपडेलत्ते, दागदागिने, शिपाई, प्यादे वगैरे सारी अनुकूलता होती. ज्ञानोबा रायानें म्हटलेंच आहे.)

पाठीं जन्मे संसारीं । परि सकळ धर्मांचिया माहेरीं ॥
लांबा उगवे आगरीं । विभवश्रियेचा ॥ ( ज्ञाने. )

महाराजांचे वडील बन्धु वामनराव ह्यांचा विवाह ह्याच सुमारास पेण गांवीं थाटानें झाला. महाराज मात्र लग्न करण्यास तयार होईनात. ह्या विषयींची हकी-

कत पुढें येईलच. इतक्यांत त्यांच्या मातुःश्री सीताबाई दिवंगत झाल्या व मागाहून राजारामभाऊनेंहि प्रयाण केलें. वामनराव हे स्वच्छंदीवृत्तीचे होते; परन्तु महाराजांच्या संगतीनें त्यांस पुढें योगाभ्यासाचा मार्ग लागून ते नेपाळाकडे गेले. तेथेंच त्यांचा योगमार्गांत अन्त झाला. वामनरावांचें कुटुम्ब तत्पूर्वीच निवर्तलें होतें. महाराजांच्या दोन्ही बहिणींचीं लग्नें होऊन वडील निवर्तली व धाकटी हल्लीं मुरबाड मुक्कामीं आपल्या पतिसमागमांत आहे.

## प्रकरण ३ रें.

## बालपण.

अर्भकाचे साठीं । पंतें धरिली पाटी ।
तैसे सन्त जगीं । क्रिया करुनि दाविती अंगीं ॥

—तुका. गा.

[ १. महाराजांचा जन्मशक निर्णय व जन्मस्थल. २ जन्म मूळनक्षत्रावर झाला. ३ जन्मतः प्रभृति महाराजांवर सन्तकृपादृष्टि. ४ बालपणचे गुण व वर्तनक्रम. ५ शिक्षण. ६ सन्त या दृष्टीनें भिवंडी येथील ब्रह्मवृन्दास परिचय. ७ कीर्तनांतील प्रेम व पालखीचे मिरवणुकींत नाचणें, उडणें वगैरे. ]

१ महाराजांच्या जन्मशकाबद्दल मतभेद आहे. यांचें अत्यल्प चरित्र "रजःकण" हें नांव धारण करून एका लेखकानें शके १८४२ भाद्रपद व. ९ स प्रसिद्ध केलें आहे. त्यांत यांचा जन्म शके १७९४ भाद्रपद शु. ९ असा दिला आहे व रा. थळी यांनीं सन्तसंघमाला भाग २ हें पुस्तक शके १८३६ सालीं प्रसिद्ध केलें; त्यांत महाराजांची छबी ( फोटो ) देऊन त्रोटक वर्णन दिलें आहे त्यांत महाराजांचा जन्म शक १७८१ भाद्रपद शु. ९ दिला आहे; दोहोंमध्यें १३ वर्षांचें अंतर पडल्यामुळें शक निश्चित करणें अवश्य आहे. यास साधनें म्हणजेः—

(अ) महाराजांचा जन्म भिवंडी येथें त्यांच्या वडीलांच्या मामांकडे झाला हें सर्वश्रुतच आहे, त्या घरीं म्हणजे कै. रा. माधवराव रघुनाथ खारकर ह्यांच्या दप्तरीं ह्यांचें जन्मटिप्पण किंवा जन्माबद्दल कांहीं टांचण असल्यास त्यावरून शोध करणें.

(ब) ह्यांचें प्राथमिक शिक्षण भिवंडीस झाल्यामुळें तेथील शाळेच्या दप्तरीं [ रजिस्टरांत ] दाखला पहाणें,

(क) भिवंडी म्युनिसिपालटीच्या जन्मनोंद वहींत दाखला पहाणें.

(ड) या सर्व साधनांच्या अभावीं वयोवृद्ध मण्डळीकडून शकनिर्णयाचा निश्चय होत असल्यास तो विचारांत घेणें.

या चारहि मार्गानें माहीती कशी मिळते तें पाहूं.

(अ) कै. रा. माधवराव खारकर ह्यांच्या येथें तपास करितां त्यांचे चिरंजीव बापासाहेब यांनीं सर्व दप्तर व टांचणें पाहिलीं पण जन्मटिप्पण वा जन्माचें टांचण कोठेंही मिळत नाहीं—हें टांचण वा टिप्पण मिळतें तर सर्वच वाद मिटला असता—प्रस्तुत लेखकानेंहि ह्या दप्तरीं बारकाईनें पाहिलें व त्यांत असलेलीं पंचांगेंहि पाहिलीं परन्तु पंचांगांत किंवा चोपड्यांत कोठेंहि टांचण केलेलें आढळलें नाहीं.

(ब) भिवंडीस जाऊन शाळेचीं रजिस्टरें पाहिलीं, परन्तु आश्चर्य हें कीं यांचें नांवसुद्धां त्या रजिस्टरांत सांपडत नाहीं. दररोज जरी नव्हे तरी केव्हां केव्हां–मधून मधून–कां होईना महाराज शाळेंत तर जात होते. असें असतां रजिस्टरांत नांव सुद्धां मिळूं नये हें आश्चर्यच. पुढें " शिक्षण " प्रकरणांत जमयतराम मास्तरानें बरेच दिवस यांना शाळेंत नेऊन शिकविण्याचा प्रयत्न केल्याबद्दलहि आलें आहे. हा सर्व प्रकार शाळेंत नांव न नोंदवितां कसा झाला न कळे. महाराज बरींच वर्षें शाळेंत जात असत तरीदेखील रजिस्टरांत नांव दाखल नाहीं हें मात्र खास.

(क) शाळेच्या रजिस्टराकडून हवी ती मदत मिळेना तेव्हां म्युनिसिपालिटीच्या जन्मनोंद रजिस्टरांत शोधून पाहिलें त्यांतहि जन्मनोंद झालेली नाहीं. हीं दोन्ही रजिस्टरें चांगलीं बारकाईनें पाहिलीं आहेत. जन्मनोंद नसण्याचें कारण कदाचित् असेंहि असूं शकेल कीं पूर्वींच्याकाळीं जन्म नोंद केल्यानें आयुष्य कमी होतें अशी कल्पना प्रचलित होती व त्यामुळें जन्मनोंद वहींत जन्म दाखल झाला नसेल.

(ड) भिवंडी व इतरत्र असलेल्या वृद्ध मण्डळीजवळ तपास करितां नक्की शक कोणी सांगूं शकत नाहींत. अनुमानानें वयाची इयत्ता सांगतात, परन्तु तीहि भिन्न भिन्नपणें सांगण्यांत येते व यावर शक निश्चय करणें धाडसाचें होईल म्हणून या रीतीनेंहि निर्णय करणें शक्य नाहीं.

येणेंप्रमाणें वरील कोणत्याहि मार्गानें जन्म काल निश्चित करणें दुर्घट आहे; तरी पण सुदैवानें एक साधन उपलब्ध आहे व तें महाराजांच्या खुद्द तोंडून आल्या कारणानें त्यावर विश्वास ठेवणें सुकर आहे. तें साधन म्हणजे शके १८४० च्या श्रावण महिन्यांत—महाराजांच्या देहावसान कालाच्या केवळ १ महिन्यापूर्वी महाराजांचें वास्तव्य दादरास असतां सहजगत्या मूळ नक्षत्रावर बोलणें निघालें, त्या प्रसंगीं महाराज बोलून गेले कीं "माझाहि जन्म मूळ नक्षत्रावर भाद्रपद शु० ९ स सोमवारीं झालेला आहे. मूळ नक्षत्र प्राकृत जनांच्या दृष्टीनें अशुभ मानलेलें आहे. परंतु तें तसेंच आहे असें नाहीं, उलट तें मंगलांतील एक मंगल आहे. मंगलदायक करवून घेणारा मात्र पाहिजे." अशी चर्चा करून महाराजांनीं आपल्या जन्मानंतर वडिलांस आलेलें दुखणें व मूळ नक्षत्राची केलेली शान्ति वगैरे भाग त्रोटक रीतीनें सांगितले. " बरें वाईट ज्याचें त्याचें पूर्वसुकृताप्रमाणें घडत असतें त्याला सुयोग वा कुयोग कसले कारणीभूत होतात. सर्व मनाच्या भावना आहेत परंतु केव्हां केव्हां मनानें दृढ भावना धरल्याप्रमाणें गोष्टी घडून येतात " वगैरे उद्गार काढलेले आम्हां शिष्य वर्गास पूर्णपणें स्मरत आहेत. हा जन्म वार तिथि व नक्षत्राचा सुगावा महाराजांच्या तोंडून अनायासें लागला तोच आधारभूत धरून कसा निर्णय ठरतो तो पाहूं. प्रसिद्ध झालेल्या दोन्ही पुस्तकांत तिथि भाद्रपद शु. ९ आहे तेव्हां तिथीचा प्रश्नच उरत नाहीं. "रजःकणा" प्रमाणें महाराजांचा जन्मशक १७९४ धरिला तर महाराज प्रयाणकाळीं म्हणजे शके १८४० सालीं ४६ वर्षांचें होते असें दिसतें. परंतु पन्नास पंचावनाच्या घरांत असलेल्या मंडळींना पक्कें स्मरतें कीं पेण व भिवंडीच्या पालखी-मिरवणूकींतून " राम-मारुति " म्हणून कोणी पेणच्या देशपांडे घराण्यांतील मुलगा अर्थात तरुणदशेंतील मुलगा पालखीसमोर सहा सहा फुटीवर उड्या मारून भररस्त्यांत गडबडा लोळत असे. तसेंच हा मुलगा घर सोडून कोठें तीर्थयात्रेस निघून गेला वगैरे गोष्टी त्यांनीं अगदीं लहानपणीं ऐकिल्या होत्या. ५०।५५ वर्षांच्या गृहस्थाच्या लहानपणीं महाराजांच्या—राममारुतींच्या—तरुणपणांतील गोष्टी ऐकणें म्हणजे अर्थात् त्यांपेक्षां राममारुति हे निदान १०–१२ वर्षांनीं तरी वडील असले पाहिजेत. दुसरें प्रमाण म्हणजे पालखी मिरवणूकींत 'गडबडां लोळणें' व 'तीर्थयात्रेस जाणें' महाराजांच्या जवळ जवळ तारुण्याच्या मध्यवयांत घडलेलें आहे; सारांश हल्लींच्या

५०।५५ वर्षांच्या गृहस्थाच्या लहानपणीं महाराज हे लहान नसून तरुण होते म्हणजे या दोहोंत वयाचें अन्तर किमानपक्ष १०–१२ वर्षांचें असलें पाहिजे. म्हणजे आज मितीला महाराज ६२ ते ६५ पर्यंत वयाचे असावयास पाहिजे होते. हल्लीं शक १८४३ चालू आहे व शके १८४० त महाराजांनीं इहलोकींचें अवतारकार्य पुरें केलें; तेव्हां शके १८४० त महाराजांचें वयोमान ६० ते ६३ असावें असा निर्णय निघूं पहातो व ह्यास प्रमाण रा. थळी ह्यांनीं प्रसिद्ध केलेला शके १७८१ ह्याच जमतो. या शकाप्रमाणें १८४० त महाराजांचें वय ५९ वर्षांचें ठरतें; आतां महाराजांनीं स्वतः म्हटल्याप्रमाणें भाद्रपद शु. ९ सोमवार मुळनक्षत्रयुक्त यास पंचांगाप्रमाणें कसा आधार मिळतो तो पाहूं व त्यास अनुसरून शके १७८१ जुळतो किंवा कसें हेंहि निश्चित करूं.

## पंचांगाप्रमाणें—

| शक | भाद्रपद शु. ९ | | मूळनक्षत्राचा काळ | |
|---|---|---|---|---|
| | वार | | घ. प. | नंतर |
| १७८१ | सोमवार | | ९.२५ | नतर |
| १७८२ | शनिवार | | १७.१४ | ,, |
| १७८३ | गुरुवार | ८ घ. नंतर | ५२.६ | पर्यंत |
| १७८४ | मंगळवार | | १९.२४ | नंतर |
| १७८५ | सोमवार | | २५.५४ | पर्यंत |
| १७८६ | शनिवार | | २२.३१ | ,, |
| १७८७ | बुधवार | | ३४.१८ | नंतर |
| १७८८ | मंगळवार | सोमवारीं अष्टमीसच मूळनक्षत्र | ५७.६ | होतें |
| १७८९ | शनिवार | | ५२.४ | पर्यंत |
| १७९० | बुधवार | | ४४.३९ | नंतर |
| १७९१ | मंगळवार | | १२.५० | पर्यंत |
| १७९२ | रविवार | | २९.४२ | ,, |
| १७९३ | शनिवार | शुक्रवारीं अष्टमीस मू. न. | १३.५ | होतें |
| १७९४ | बुधवार | | ३८.२१ | पर्यंत |

पंचांगाप्रमाणें १७८१ पासून १७९४ पर्यंत सोमवारीं मूळ नक्षत्रयुक्त ९ मी फक्त १७८१ व १७८५ या दोनच वर्षीं होती. रा. थळी यांचें पुस्तक महाराजांचें इह-लोकीचें अवतार कार्य संपण्यापूर्वी प्रसिद्ध झालें होतें व तें महाराजांनीं पाहिलें होतें. जर यदा कदाचित् शक चुकीचा असता तर तत्सम्बन्धीं महाराजांनीं आक्षेप घेतला असता; अर्थात् महाराजांस तो शक मान्य होता व वरील प्रमाणावरूनहि तोच शक निश्चित होतो. तस्मात् महाराजांचा जन्म ठाणें जिल्ह्यांत भिवंडी येथें शके १७८१ सिद्धार्थी नाम संवत्सरीं भाद्रपद शु. ९ स सोमवारीं झाला हेंच सिद्ध होतें.

२ महाराजांचा जन्म मूळ नक्षत्रावर झाला यांतील मर्म फार अगम्य आहे. अनीति व कुमार्गानें पूर्वजन्मीं वर्तन करून जे जीव अशा कुयोगावर जन्म पावतात ते खरोखरच ज्योतिषशास्त्रांत वर्णन केल्याप्रमाणें आपल्या जन्म-दात्यांच्या वा इतर निकट आप्तवर्गांच्या व क्वचित् प्रसंगीं स्वतःच्या मूळावर येऊन त्यांचा नायनाट करितात व त्याबरोबर आपलें आयुष्य आमरण दुःखांत काढितात. असल्या जीवांस बहुधा ईश्वरभक्तीचे मार्गहि लाधत नाहींत. महा-राज कांहीं ह्या कोटींतले नव्हते. ते आपल्या जनक जननीच्या वगैरे मूळावर येण्याऐवजीं मूळ मायेच्याच मूळावर आले होते. अहंकारादि विस्तारासह मूळ मायेचा नायनाट करून ते आपल्या उगमस्थानाचा अर्थात् स्वस्वरूप स्थितीचा उपभोग घेण्यास मूळ नक्षत्रावर जन्मास आले होते. श्री एकनाथ महाराजांचा जन्महि मूळ नक्षत्रावरच झाला होता. "**तुका म्हणे हरिच्या दासा। शुभ काळ दाही दिशा ॥**"

या तुकोबारायांच्या उक्तीप्रमाणें सत्पुरुषांचे ठायीं अमावास्या नाहीं, व्यति-पात नाहीं कीं मूळ नक्षत्रहि नाहीं. ते सदैव मंगलमयच आहेत.

श्रीमत् शंकराचार्यांनीं अशा महापुरुषाचें वर्णन आपल्या 'आत्मबोध' नामक ग्रंथांत केलेंच आहे कीं,

**"तीर्त्वा मोहार्णवं हत्वा रागद्वेषादि राक्षसान् ।**
**योगी शान्तिसमायुक्त आत्मारामो विराजते ॥ १ ॥**
**बाह्यानित्यसुखासक्तिं हित्वाऽऽत्मसुखनिर्वृतः ।**
**घटस्थ दीपवच्छश्वदन्तरेव प्रकाशते ॥ २ ॥**

उपाधिस्थोऽपि तद्धर्मैरलिप्तो व्योमवन्मुनिः ।
सर्वविन्मूढवत्तिष्ठेदसक्तो वायुवच्चरेत् ॥ ३ ॥
उपाधिविलयाद्विष्णौ निर्विशेषं विशेन्मुनिः ।
जले जलं वियद्व्योम्नि तेजस्तेजसि वा यथा ॥ ४ ॥

श्रुतीनेंहि असेंच वर्णन केलें आहे.

यदा सर्वे प्रमुच्यन्ते कामा येऽस्य हृदि श्रिताः ।
अथ मर्त्योऽमृतो भवत्यत्र ब्रह्म समश्नुते ॥

( कठोपनिषत्–द्वितीयोध्याय. )

या गुणांनीं जे परिपूर्ण ते या मायावी जगतांत कुयोगी मूळ नक्षत्रावर जन्मले असें ह्मणणेंहि मायेप्रमाणेंच नाशिवंत एतावता असत्य आहे. श्रीनाथ महाराज काय वा श्रीराममारुति महाराज काय आपआपले मूळ शोधूनच बसलेले आहेत. या मायावी जगतांतील मानवी प्राण्यांनीं त्यांच्या प्रमाणें आपलें मूळ पहावें म्हणूनच ही संत मंडळी मूळ नक्षत्रावर उदयास आली नसतील ना? असें जरी आहे तरी ही मंडळी जगांतील नियमानुसार कृति करून दाखवितात; कारण तसें न दाखविलें तर परमार्थांतील अति उच्च पदास जाण्याकरितां जे जे मार्ग आंखले आहेत त्यांवरील जनश्रद्धा नाहींशी होईल. श्रीकृष्णभगवंतांनीं गीतेंत ह्मटलें आहेच व त्यावरील भगवान् ज्ञानदेवांची सुमनोरम टीका खालीलप्रमाणें आहे—

याकारणें गा पार्था । होआवी कर्मीं आस्था ।
हे आणिकाही एका अर्था । उपकारेल ॥
देखें प्राप्तार्थ जाहले । जे निष्कामता पावले ।
तयाही कर्तव्य असे उरलें । लोकांलागीं ॥
मार्गीं अंधासारिखा । पुडें देखणाही चाले जैसा ॥
अज्ञाना प्रकटावा धर्मु तैसा । आचरोनी ॥
हांगा ऐसें जरी न कीजे । तरी अज्ञाना काय उमजे ॥
तिहीं कवणेपरी जाणिजे । मार्गातें या ॥

—ज्ञाने. ३. २०.५३.

त्याप्रमाणें हे सन्तहि आपल्या जनकजननीच्या सहवासास अंतरले. महाराज मूळनक्षत्रावर जन्मल्याबरोबर ज्योतिष्यांनीं त्यांचे जनकजननीस निक्षून सांगितलें कीं हा मुलगा आपल्या उभयतांचें मूळावर आला आहे. मग काय विचारतां ? हा दुष्टयोग टळावा म्हणून होम करूं कीं हवन करूं कीं नवस करूं, काय करूं आणि काय न करूं असें त्या प्रेमळ मातेस झालें. पुत्रवात्सल्य फार अनर्घ्य आहे. ज्या साध्वीस मातृपदाचा लाभ मिळाला असेल तीसच श्रीराममारुतीमहाराजांच्या मातु:श्रीच्या मनाची यथार्थ कल्पना होईल. पिता कदाचित् अशा कुयोगी मुलास दूर करील; परंतु मातेच्या स्वप्नांतहि असले विचार येणार नाहींत. मोरोपंतांनीं म्हटलेंच आहे.

**पिता जरि विटे विटो न जननी कुपुत्रीं विटे ।**
**दयामृतरसार्द्रधी न कुलकज्जलें त्या किटे ॥**
**प्रसादपट झांकिती परि परागुरूचे थिटे ।**
**ह्मणूनि ह्मणती भले न ऋण जन्मदेचें फिटे ॥**

तेव्हां ज्योतिष्यांनीं शास्त्राधारें असा उपाय सुचविला कीं, मूळनक्षत्रशांतिप्रीत्यर्थ होमहवन केलें असतां त्या नक्षत्राचे दोष टळतील. मग काय अवधि? ब्राह्मणांकडून यथासांग शांति करविण्यांत आली; तरी पण जें ज्या समयीं घडावयाचें तें कधींहि टळावयाचें नाहीं. हा नियम त्रिकालाबाधितच खरा. अशा वेळीं " **अवश्यं भाविभावानां प्रतीकारो भवेत् यदि । तदा दु:खैर्नलिप्येरन् नलरामयुधिष्ठिरा: ॥** " ह्या संस्कृत उक्तीचें स्मरण झाल्यावांचून रहात नाहीं. या नियमानुसार व मूळ नक्षत्राचे दोषास साजेसें मोठें दुखणें महाराजांच्या वडिलांस आलेंच. " **आत्मनो भोगायतनं शरीरं** " असें शरीराविषयीं म्हटलें आहे व त्याप्रमाणें प्रत्येक प्राणिमात्रास दुखणीं येतातच. परंतु त्यांना मनांत घोळत असलेल्या विकारानें केव्हां केव्हां निराळें स्वरूप प्राप्त होतें. त्याप्रमाणें या दुखण्यास भयंकर स्वरूप येऊन ह्यास मूळ नक्षत्रच कारणीभूत झालें अशी मनाची पक्की समजूत झाल्या कारणानें ह्या दुखण्यांतून आपण उठत नाहीं अशी राजारामभाऊंची दृढ कल्पना झाली. राजारामभाऊ घाबरले. व सीताबाईहि घाबरल्या, दुखणेंहि विकोपास जात चाललें व राजारामभाऊ आतां वांचत नाहींत असें वैद्यांसहि वाटूं लागलें. पण इतक्यांत काय चमत्कार झाला कीं मुंबईंत कांदेवाडींत **श्रीबालमुकुंदस्वामी** म्हणून महात्मे

होते. ह्यांचे मठांत रा. राजारामभाऊंचे मामा रा. माधवराव रघुनाथ खारकर हे नित्य नियमानें जात येत असत व त्यांची स्वामींच्या ठिकाणीं दृढ श्रद्धा असल्यामुळें स्वामींचीहि त्यांच्यावर कृपादृष्टि असे. या दुखण्यामुळें म्हणा किंवा अन्य कांहीं अडचणीमुळें म्हणा रा. माधवरावांचें स्वामीकडे बरेच दिवसांत जाणें झालें नाहीं. त्यामुळें स्वामीस त्यांचें स्मरण होऊन बरेच दिवसांत माधवराव कां आला नाहीं म्हणून जणूं काय निमित्त करून स्वामी भिवंडीस सहज आले. माधवरावांकडे येऊन पहातात तों हा गोंधळ. राजारामभाऊंची अन्तसमयाची वेळ येऊन ठेपलेली; स्वामीस पहातांच माधवरावानें चरणीं मस्तक ठेऊन सद्गदित होऊन स्वामीस आसन देऊन आपण जवळ बसले. सीताबाईनेंहि सौभाग्यस्थितींतलें हें अन्तिम दर्शन असें मानून स्वामीचें दर्शन घेतलें. माधवरावांनीं सर्व हकीकत निवेदन केली. स्वामींनीं गम्भीर मुद्रा धारण केली व राजारामभाऊंच्या सन्निध गेले. स्वामीकडे पाहून राजारामभाऊ अडखळत म्हणाले कीं हा मुलगा—आपल्या श्रीराममारुतीकडे बोट करून—मूळनक्षत्रावर जन्मास आलेला आहे. मी तर इहलोक सोडून जाणारच तेव्हां ह्यास आपल्या चरणावर घालतों. हा माझा नसून आपलाच आहे त्याचा अंगिकार व्हावा. इतकें बोलतांच सीताबाई मुलास घेऊन आल्या व स्वामीचरणाजवळ त्यास ठेविलें. स्वामींनीं राजारामभाऊंचे आंगावर हात फिरवून म्हटलें कीं "ठीक आहे. हा माझाच आहे परन्तु माझा प्रसाद म्हणून आपल्या येथेंच वाढूं द्या. योग्यकालीं मी घेऊन जाइन. याचा कुयोग आपणास बाधणार नाहीं." असें म्हणून मुलास महाराजांनीं कुरवाळिलें व सीताबाईचे स्वाधीन केलें व ह्मणाले कीं भिण्याचें कारण नाहीं, आपल्या पतीस आतां आराम वाटेल. त्याप्रमाणें राजारामभाऊंचे प्रकृतीस आराम पडून दिवसेंदिवस त्यांची प्रकृति सुधारत चालली व लवकरच ते निखालस बरे झाले. महाराजांचे जन्मकालींच म्हणजे ६–७ महिन्याचे आंतच हा सन्तदर्शनाचा—सद्गुरु दर्शनाचा—सुयोग घडून येणें म्हणजे

"ज्यांचें पूर्व पुण्य थोर। त्यासीच भेटेल सद्गुरु दातार॥

किंवा पुन्यपुंज बिनु मिलहि न सन्ता। सत संगति संसृति कर अन्ता॥

या प्रसिद्ध वचनांप्रमाणें महाराजांच्या पूर्वसंस्काराचाच हा प्रताप होय.

३ महाराज ७–८ वर्षांचे असतांना भिवंडीस आपल्या आजोळीं होते. त्यावेळीं श्री समर्थशिष्य उद्धवांच्या गादीवरील ६ वे पुरुष गंगाधर महाराज टाकळीकर

ह्यांचें आगमन भिवंडीचे रा. ताम्हणे ह्यांच्या घरीं झालें होतें. त्यांचें वास्तव्य भिवंडीस असतांना त्यांना महाराजाबद्दल अति आदर वाटे; ते वारंवार महाराजांना आपल्या सन्निध घेऊन कांहीं तरी हळूहळू बोलत असत. एकदां रा. ताम्हणे यांचे घरांतील बाईस गंगाधर महाराज अनुग्रह देत असतां राममारुति महाराज तेथें जवळच बसले होते यांकडे पाहून त्या बाई सहज ह्मणाल्या कीं " या मुलासही माळ द्या ना? " त्याबरोबर गंगाधर महाराजांनीं स्मित करून त्या मुलास–आपल्या महाराजास—जवळ घेतलें व कानांत कांहींतरीं हळूहळू पुटपुटले. यापूर्वीं महाराजांचें बाह्य वर्तन उनाड मुलाप्रमाणें असे; त्यांत त्या दिवसापासून फरक दिसूं लागला !

गंगाधर महाराज महाराजांस "रामजी" या नांवानें संबोधित. ह्याच सुमारास महाराज हे बालाजीच्या देवालयांत भिवंडीस एका वृद्ध तपस्व्यांचे सानिध्यांत असत. त्या वृद्ध तपस्व्याची सेवा करीतांना यांना पुष्कळांनीं पाहिलें आहे. सारांश श्रीराममारुति महाराज हे अगदीं बालपणापासून सन्तसमागमांत व सन्तकृपाछत्राखालीं वाढले.

४ वयाचे ३–४ वर्षांपासून यांची वृत्ति गबाळ दिसे. इतर मुलांबरोबर खेळण्याचा यांना हव्यास नव्हता. कोठें तरी एकांतांत बसावें किंवा स्नान वगैरे आटोपून शंकराचे देवळांत पिंडीवर आडवें पडून रहावें, केव्हां पोत्यांत पाय घालून देवळाचे गाभाऱ्यांत स्वस्थ पडून रहावें, अशाप्रमाणें महाराज एकांतांत कालक्रमणा करीत असत.

श्रीज्ञानदेव भगवंतांनीं अशा प्रकारच्या विभूतींचें खालीलप्रमाणें वर्णन केलें आहे:—

आणि तीर्थें धौतें तटें । तपोवनें चोखटें ।
आवडती कपाटें । वसवूं जया ॥
शैलकक्षांचीं कुहरें । जळाशय परिसरें ।
अधिष्ठी जो आदरें । नगरा न ये ॥
बहु एकांतावरी प्रीति । जया जनपदाची खंती ॥
जाण मनुष्याकारें मूर्ती । ज्ञानाची तो ॥

ज्ञाने. १३ ५१०/५१२.

अगदीं लहानपणापासून उपजत गुण म्हणजे कोणीहि दुःखी कष्टी प्राणी पाहिला कीं या बालमूर्तिचा जीव कासावीस होत असे. त्यास कपडा नसला तर हे आपल्या अंगांतून कपडा काढून देत. दाराशीं आलेला याचक यांनीं केव्हांहि विन्मुख जाऊं दिला नाहीं. दुसऱ्यास उपाशी ठेऊन आपण जेवावें म्हणजे यांस वाटे कीं—

ऐसें जिणें प्रेतवत । तें जाणिजे चालतें बोलतें प्रेत ।
खातें जेवितें भूत । प्रत्यक्ष तेंचि ॥

कोणीहि अन्नार्थी आला व त्या वेळेस हे जेवावयास बसत असले तर आपले पुढें वाढलेलें पान त्याचे पदरांत टाकित व कदाचित् घरांतील माणसें रागें भरतील या भीतीनें चटकन् उघडे बोडकेच देवळांत जाऊन बसत. हा दुसऱ्या प्राण्या विषयीं कळवळा त्यांच्या वयाच्या ४।५ वर्षांपासून दृष्टीस पडूं लागला. यांना जेवणाखाणाची किंवा वस्त्रप्रावरणाची मुळींच कशी ती परवा नव्हती. आपण स्वतः उघडें राहून किंवा उपाशी राहून दुसरा जीव समाधानांत ठेवणें यांतच त्यांना मौज किंबहुना त्यांतच आपलें खरें कर्तव्य आहे असें वाटत असे. देवालयांत तासाच्यातास एकटें जाऊन बसण्यांत त्यांना आनंद वाटे. ह्यांची वृत्ति—

'' बहु योगाभ्यासीं हांव । विजनाकडे धांव ।
न साहे जो नांव । संघाताचें ॥

अशी असे. —ज्ञा. १३५६०

श्रीसमर्थांनीं म्हटलें आहे कीं:—

झडकरि झटकावे स्थीर कोठें न व्हावें ।
न पुसत सकळांला गुप्त होऊनि जावें ॥
स्थळगति न वदावी जावया यावयाची ।
प्रकटित न करावी मात जे अन्तरींची ॥ १ ॥
प्रचलितहि न व्हावें झाडखंडीं भरावें ।
स्थळसुचिर पहावें साधतां स्थीर व्हावें ॥
बहुविध न फिरावें रान तें वाउगेंची ।
सुगम जरि मिळालें वस्ति ते साधकाची ॥ २ ॥

भिवंडीस ज्या देवालयांत त्यांचें नेहमीं वास्तव्य असे तीं येणेंप्रमाणें

१ गांवांतील श्री भीमेश्वराचें शंकराचें.

२ गांवांतील मेकलांचे श्रीरामाचें.

३ गांवांतील श्री वालाजीचें व मारुतीचें व

४ गांवाबाहेरील तळ्यावरील मेकलांचे बागेंत श्रीरामेश्वराचें.

बहुधा अंगावर कपड्यांचा अभाव असल्यामुळें हे आपले दोन्ही पाय एका पोत्यांत घालून पडून रहात.

ह्यांनीं लहानपणीं केव्हांहि इतर मुलांप्रमाणें तोंडांतून अवाच्य वा अभद्र शब्द काढला नाहीं.

५ ह्यांच्या स्वैर वर्तनामुळें हे शाळेंत वेळच्यावेळीं जात नसत किंबहुना गैरहजरच असत; त्यामुळें शिकण्याची अनास्था होई. ह्या वेळीं भिवंडीस जमयतराम नांवाचे गुजराथी मास्तर रहात होते; त्यांनीं ह्यांची अशी वृत्ति पाहून हिम्मत बाळगिली कीं मराठी नाहीं, तर नाहीं. पण आपण ह्याला गुजराती तरी शिकवूं व त्याप्रमाणें ते स्वतः जातीनें यांस शाळेंत नेऊन शिकवूं लागले. परंतु महाराजांचें वर्तन जसें मराठी शाळेंत तसेंच ह्या ठिकाणींहि होऊं लागलें, त्यांत अणुमात्र अंतर न पडतां ह्यांचें 'मनःपूतं समाचारेत्' वर्तन कायम होतेंच. अखेर रा. जमयतराम थकले व ह्यांना शिकविण्याचा नाद सोडून दिला. एवंच मराठी काय किंवा गुजराथी काय यांचें कोणतेंच शिक्षण शिस्तवार झालें नाहीं. पण आश्चर्य हें कीं इतकें असूनहि दोन्ही भाषेंत त्यांचें प्राविण्य होतें. पुढें व प्रौढावस्थेंत असें अनुभवास आलें कीं ह्यांना इंग्रजी व संस्कृत ह्याहि भाषा चांगल्या अवगत होत्या. ज्ञानोबारायांनीं म्हटल्याप्रमाणें—

काय घड्यावरि सारस्वतें । पडों सिकिजे ॥ ६–८

ह्यांची स्थिति होती हें निर्विवाद आहे.

महाराजांनीं स्वतः शिक्षणाचे कामीं व्यावहारिक दृष्ट्या अनास्था दाखविली त्यावरून शिक्षण हा विषय त्यांना रुचत नसे अशी कल्पना होण्याचा सम्भव आहे; पण तशी कल्पना करणें गैर आहे. स्वतः न शिकण्याचें कारण वर नमूद केलें आहेच. तरी पण त्यांना शिक्षणाची अत्यन्त आवड असे. प्रत्येक ज्ञातींत ठिकठिकाणीं चालू असलेल्या शिक्षण संस्थांबद्दल ते वारंवार कळकळीचे उद्गार काढीत. व अशा संस्थांच्या चालकांस ते ईश्वराचे दास म्हणत. भिवंडी येथें

चां. का. प्रभूंची एक शिक्षण संस्था अस्तित्वांत आहे. त्या संस्थेस दरसाल पंचवीस रुपये देणगी दाखल द्यावे अशी त्यांची शिष्यवर्गास आज्ञा आहे. सारांश शिक्षण हा विषय त्यांस प्रिय, व आवश्यक वाटे, परंतु स्वतःला तें मूळांतच मिळालें असल्या कारणानें बाह्योपाधीनें तें प्राप्त करून घेण्याचें–विशेषतः परिश्रम करून घेण्याचें–कोणतेंच प्रयोजन उरलें नव्हतें.

६ महाराज गांवांतील कोणत्या तरी देवालयांत असतात व तेही पोत्यांत पाय घालून पडलेले असतात हें गांवांतील बहुतेक गृहस्थांस माहीत होतें. त्या वेळीं भिवंडीस रा. मुळे नांवाचे सुखवस्तु गृहस्थ रहात होते. त्यांच्या येथें त्या वेळची भिवंडींतील प्रसिद्ध मंडळी विश्रांतीकरितां ह्मणून एकत्र जमत असे. व तेथें केव्हां केव्हां अध्यात्मविषयावर चर्चा चाले. त्या ठिकाणीं कै० श्रीमंत वासुदेवराव रामचंद्र उर्फ भाऊसाहेब घनवटकर, ह. भ. प. विष्णु चिंतामण अत्रे, डॉ. त्र्यंबक बाळकृष्ण मराठे वगैरे मंडळीचें जाणें विशेष असे. एका प्रसंगीं भाऊसाहेब घनवटकरांस असें वाटलें कीं हा मुलगा तरी कसा काय आहे हें पाहावें. त्यांनीं इच्छा दर्शविली मात्र तों एकानें जाऊन ह्या मुलास–महाराजांस–श्रीरामेश्वराचे देवळांतून शोधून आणिलें. महाराज आले व आपल्याला साजेलशा रीतीनें अदबीनें अन्तरावर बसले. मंडळीची आध्यात्मिक चर्चा चालू होतीच. त्यांत विशेष प्रश्न निघून वादास सुरवात झाली. बराच वेळ झाला व वादाचा निकाल लागेना असें पाहून ह्या मुलानें–आमच्या बाल-महाराजानें–पाटीपेनसील आणवून त्यावर चालू वादावर शंकानिवृत्तीदाखल कांहींसें लिहून ती पाटी भाऊसाहेबांपुढें ठेविली. भाऊसाहेब ती वाचतांच आश्चर्यचकित होऊन ह्या बालमूर्तीकडे पाहूं लागले, व ही कोणी तरी अद्वितीय मूर्ति आहे, असे सहज शब्द त्यांच्या तोंडून निघाले. त्यांना काय वाटलें असेल कोण जाणें, परंतु ह्या बालमूर्तीविषयीं त्यांना वाटलेला आदर, प्रेम व अभिमान ह्या एका वाक्यांत ग्रथित झाला. पुढें या बालमूर्ति महाराजांनीं आपणांकडे दररोज भोजनास यावें म्हणून यांना आग्रहाचें आमंत्रण देऊन भाऊसाहेबांनीं आपली गुणग्राहकता व्यक्त केली. व तेव्हांपासून महाराज त्यांकडे रोज भोजनास जाऊं लागले.

उपरिनिर्दिष्ट गोष्ट घडली त्या वेळीं महाराज आपले आजोळीं रा. माधव रघुनाथ खारकर यांजकडे रहात होते. हे मीठखात्यांत नोकरीस होते व भिवंडीस रहात असत. ह्याच वेळेला त्यांची बदली भिवंडीहून राई ( भायं-

दर ) येथें झाली व तन्निमित्त त्यांना भिवंडी सोडणें भाग पडलें. एक बिऱ्हाड हालतांच त्याच ठिकाणीं दुसरें उत्पन्न व्हावें ही देवाला भक्ताची केवढी काळजी वहावी लागते ह्याचें एक उत्कृष्ट द्योतक आहे. श्रीमद्भगवद्गीतेंत

अनन्यांश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥

हें भगवन्तानें आश्वासन दिलें आहे तें किती यथार्थ आहे बरें !

महाराज आपलें आन्हिक नित्यकर्म डॉ. मराठे यांच्याकडे उरकून भोजनास भाऊसाहेबांकडे जात असत. भाऊसाहेबांची ह्यांच्यावरील श्रद्धा उत्तरोत्तर वाढत चालली व त्यांचे इच्छेप्रमाणें महाराजांचा समागम शेवटपर्यंत टिकला. या दृढ श्रद्धेचे व संतसमागमाचे फळ म्हणून भाऊसाहेबांच्या अन्तकालींहि महाराज जवळच होते–नव्हे महाराज मुद्दामच होऊन गेले. तो प्रकार असा. महाराजांस कोठें जाणें असल्यास ते एक दोन दिवस पूर्वी बेत करीत. क्वचितच एकाएकीं–बेत वगैरे कांहींहि न करितां–एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं गमन करीत. एके दिवशीं "मला आतांच भिवंडीस गेलें पाहिजे" म्हणून जाण्याची गर्दी केली. मंडळीस शंका आली कीं आज एवढी तांतडी कां ? पूर्वी एक शब्दसुद्धां न बोलतां इतकी धांदल करण्याचें विशेष काय प्रयोजन असेल बरें ! अशी शंका मंडळीच्या मनांत येते न येते तोंच महाराजांनीं सांगितलें कीं भाऊसाहेब अत्यासन्न आहेत तेव्हां मला गेलेंच पाहिजे. असें म्हणून ते एकदम कल्याणहून भिवंडीस गेले. तो दिवस शके १८४० चैत्र शु. ६ चा होता. महाराज भाऊसाहेबांच्या अन्तकालपर्यंत जवळच होते, व त्यांचें देहावसान महाराजांच्या देखत झालें हें भाऊसाहेबांचें केवढें भाग्य ! नाथमहाराजांनीं म्हटलें आहे—

"श्रीराम भक्ताच्या दृष्टीपुढें । मरे त्याचें भाग्य चोखडें ।
जिणोनी त्रिगुणाचें सांकडें । पावे रोकडें परब्रह्म ॥१॥

भिवंडीस श्रीरामचंद्रप्रभूची, मारुतिरायाची व श्रीशंकराची पालखी मिरवणूक निघत असे. या मिरवणुकी म्हणजे महाराजांस अप्रतिम आनंद होण्याचें एक साधनच असे व ईश्वरप्रीत्यर्थ देह झिजविण्याची ती एक अमुल्य संधीच आहे असें ते मानीत. श्रीमद्भागवतांत प्रेमळ भक्तांचीं जीं कांहीं लक्षणें दिलीं आहेत त्यांपैकीं "हसत्यथो रोदिति रौति गायत्युन्मादवन्नृत्यति लोकबाह्यः" हीं होत व त्यापैकीं "उन्मादवन्नृत्यति लोकबाह्यः" हें लक्षण महाराजांच्या

वर्तनांत अशा प्रसंगीं वेळोवेळीं दृग्गोचर होत असे. ह्यावरील नाथांची हृदयंगम टीका नाथ भागवतांत अ. २ श्लोक ४० वर खालीलप्रमाणें आहे. विस्तारभयास्तव थोडासाच भाग दिला आहे, तरी सहृदय वाचकांनीं तीं मूळांतच वाचावी अशी त्यांनां विनम्र विनंति आहे.

हरिनाम गुण कीर्तन कीर्ती । अखंड आवडे जागृतीं ।
स्वप्नीं ही तेचि स्थिती । दृढ हरि भक्ति ठसावे ॥ ५६ ॥
ऐशियापरी भक्तियुक्त । दृढतर जाहलें ज्याचें व्रत ।
तंव तंव होय आर्द्र चित्त । प्रेमा अद्भुत हरिनाम कीर्ती ॥
आत्मा परमप्रिय हरि । त्याचें नाम कीर्तीचा हर्ष भारी ।
नित्य नवी आवडी धरी । सबाह्याभ्यन्तरीं हरि प्रगटे ॥
चुकल्या मायपूतां संकटीं । एकाकीं बहुकाळ जाहली भेटी ।
तेणें वोरडे घालोनि मिठी । चाले जेवीं पोटीं अनिवार रुदन ॥

* * * *

ऐशा हांकावरी हांका । फोडूं लागे अलोलिका ।
सवेंचि गाये निजात्मसुखा । स्वानंदें देखा डुल्लतु ॥
त्याचें गाणें ऐकतां । सुखरूप होय सज्ञान श्रोता ।
मुमुक्षां होय परमावस्था । जरी तो अवचितां गावों लागे ॥
गातां पदोपदीं निजसुख । कोंदाटे अधिकाधिक ।
वोसंडतां परम हरिख । स्वानन्दें अलोलिक नाचों लागे ॥
सारुनि दुजेपणाचें काज । निरसोनि लौकिकाची लाज ।
अहंभावेंवीण सहज । आनंदाचे भोजें अलौलिक नाचे ॥
जो मोलें मदिरा खाये । तो मदिरानन्दें नाचे गाये ।
मा जेणें ब्रह्मानन्दु सेविलाहे । तो केवीं राहे आवरला ॥

या पालखी मिरवणूकींत देहभान विसरून रस्त्यांतून महाराज लोळणें घेत व नाचत असत. पालखी बरोबर उघड्या आंगानें जेव्हां हे नाचत व उड्डाणें घेत व त्याप्रमाणें रस्त्यांत धुळीमध्यें वगैरे गडबडा लोळत त्या वेळीं आपणांस कांहीं लागेल किंवा कांहीं होईल ह्याचें त्यांनां देहभान देखील नसे, व अशा महात्म्यांनां तें नसावें हेंच विशेष संभवतें. श्रीतुकोबांनीं म्हटलेंच आहे कीं:—

उभा राहोनियां मुखीं नाम वदे । नाचे नाना छंदें हा गोविंद ॥ १ ॥
मार्गीं चालतां मुखीं नाम वाणी । उभा चक्रपाणी मागें पुढें ॥ २ ॥

महाराज वर आकाशांत उडी मारीत ती जवळ जवळ ६।६ फूट उंच असे व त्याच्यापूर्वी मोठ्यानें भुभुःकार करीत. भिवंडीप्रमाणेंच पेण व कल्याण येथें श्रीरामचन्द्रप्रभूची व मारुतीरायाची पालखी निघत असे व बरोबर मिरवणूक असे. अशा वेळीं महाराज तेथें अचूक जात असत व यांचें मन मानवेल तितकें नाचणें, उडणें, गडबडा लोळणें वगैरे प्रकार तत्रस्थ मण्डळींना पहावयास मिळत. ह्यांच्या ठिकाणीं भजनप्रेमा कांहीं विलक्षण होता. प्रेमा होता असें ह्मणण्यापेक्षां रोमरोमांगीं प्रेम वाणून होतें हेंच म्हणणें जास्त शोभतें. ते कोणाजवळ दुसऱ्या गोष्टीबद्दल जरी बोलत असले व दुसरीकडे भजन चाललेलें ह्यांच्या कांनीं पडलें पुरे कीं हात उडावयास लागत. आषाढीसारख्या पर्वणीच्या दिवशीं महाराज दादरास असले व माटुंगा येथील श्रीविठोबास भजनी दिंड्या जाऊं लागल्या म्हणजे हा योग पहावयास मिळे. सर्व दिवसभर महाराजांची ती प्रफुल्लित मुद्रा व भजनांचे तालाप्रमाणें तें हस्तलाघव व देहभान विसरून दृग्गोचर होणारी ती तन्मयता पाहून महाराज केवळ विठोबामय झालेले दिसत. असे प्रेमळ प्रसंग प्रत्येक भजनांत पहावयाची सुसंधि पुष्कळ भाविकांस महाराजांचे कृपेनें आलेली आहे.

---

## प्रकरण ४ थें.

# साधन मार्ग

दत्त देखिला डोळां आत्मदृष्टी ॥
रूप पाहातां लोचनीं । सुख झालें हो साजणी ।
तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा ॥ "ज्ञानोबा."
राम पाहिला । आह्मीं राम पाहिला ॥ पद.

[ १ सहजसमाधिस्थिति २ गायनाचा नाद व परावाणी ३ कीर्तनांत व विशेषतः भजनांत तल्लीनता होणें व तत्समयीं उड्डाणें घेऊन भु भुःकार करणें ४ श्रीदत्त, श्रीराम व श्रीविठोबा दर्शनें. ]

१ मनुष्यमात्राचा अनुभव असा आहे कीं कोणत्याही पदार्थाचें ज्ञान चित्ताच्या एकाग्रतेच्या साहाय्यानें होत असतें, म्हणजे त्या त्या विवक्षित पदार्थांकडेच लक्ष वेधून तद्विषयक ज्ञान अनुभवण्यास चित्ताची एकाग्रता करावी लागते. ही एकाग्रता एका विशिष्ट पदार्थाविषयीं कांहीं क्षण स्थिर रहाते न रहाते तोंच चित्ताच्या ठायीं दुसऱ्याच पदार्थाचें स्फुरण होतें व अशा तऱ्हेनें अनेक पदार्थांविषयीं वृत्ती वारंवार चक्राप्रमाणें परिभ्रमण पावत असतात. तात्पर्य सर्व साधारण नियमानें पाहिलें तर कोणत्याही पदार्थाचें ज्ञान होण्यास किंचित्काल तरी चित्ताची एकाग्रता व्हावीच लागते मग ती निमिष, अर्ध निमिष कां होईना.

आत्मदर्शी पुरुष चित्ताची (मनाची) एकाग्रता केल्याशिवाय किंवा एकाग्रतेसाठीं कोणत्याहि प्रकारचा प्रयत्न केल्यावांचून आत्मसुखाच्या आनंद स्थितीचा उपभोग सर्व काल व सर्व स्थितींत घेत असतात ह्यालाच 'सहजसमाधि' म्हणतात. चित्तनिरोध किंवा चित्तस्फुरण ह्या दोन्ही स्थितींत सिद्ध पुरुष अनुसंधानांतच मग्न असतात. ज्याप्रमाणें दाही दिशेनें वायु वहात असला किंवा निश्चल असला तरी आकाश निर्लेपच अतएव निष्कर्तव्य, असंग, अक्रिय असेंच असते. त्याप्रमाणेंच मनोवृत्तींचा निरोध झाला काय किंवा त्या स्फुरण पावल्या काय आत्मदर्शी पुरुष निष्कर्तव्य असतात. व याच सहज समाधि सुखाचा अनुभव महाराज आजन्म घेत होते. यांच्या मुखावाटें " श्रीराम " महामंत्राचा उच्चार अहो रात्र श्वासोच्छ्वासाबरोबर उमटत असे. पाटींवर वगैरे लिहीत असतांना अथवा एखादें पुस्तक किंवा पोथी वाचित असतांनां मुखानें श्रीराम मंत्राचा ध्वनि सारखा चालूच असे. मुखावाटे उच्चार करीत राहून अन्य लिहिणें वा वाचणें साधारण मनुष्यास शक्यच नाहीं, त्यावेळीं इतर व्यापार बंद करून तेथेंच लक्ष घालावें लागतें, परंतु महाराजासंबंधानें पाहातां लिहिण्याची क्रिया त्यांचे फक्त हात करीत, व वाचण्याची क्रिया फक्त डोळेच करीत. त्यांत मनाच्या एकाग्रतेची जोड मुळींच नसे. सारांश यत्न केल्यावांचून स्वाभाविक चित्तैकाग्र्य महाराजांना साध्य होतें.

हा राममंत्रोच्चार केवळ जागृतावस्थेंतच चालू असे असें नाहीं तर झोंपेंतहि हा ध्वनि प्रत्येक श्वासाबरोबर सारखाच स्पष्ट उमटत असे. झोंपेंत एका बाजूवरून दुसऱ्या बाजूवर होतांना श्वास जरा जोरानें वाहतो त्यावेळीं तर 'श्रीराम' हा उच्चार जवळच्या इसमास मोठ्यानें "श्रीराम" असा घुमलेल्या आवाजाप्रमाणें ऐकूं येई. जाग्रत् स्वप्न सुषुप्ति ह्या तिन्ही अवस्थांमध्यें ही असल्या प्रका-

रची राममय स्थिति असणें हें सहजसमाधि स्थितीचें लक्षण होय. यांचें ध्येय म्हणजेः—

> नावडे मज कांहींवो कांहींरे। रामस्मरणावांचुनि पाहींरे ॥ ध्रु० ॥
> श्रीराम जयराम जय जयराम वो जयजयराम ॥
> निरन्तर अन्तरिं हाचि नेम ॥ १ ॥
> झडो पडो तनु अथवा चिरंतन हो चिरंतन हो ॥
> परि रामस्मरण स्थिति भंग न होवो ॥ २ ॥

या निष्काम नेमानें (स्वानुभव दिनकर).

> जागत राम सोवत राम सपनमें देखत राम हि राम.।

अशी महाराजांची वृत्ति बनली व "नरकरनी करे तो नरका नारायन होय" ही उक्ति त्यांनीं यथार्थ करून दाखविली.

२ महाराजांचें नित्य नैमित्तिक कर्म म्हणजे वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें चिरकाल अजपामंत्र "अजपाजपणें उलट प्राणाचा। येथें ही मनाचा निर्धार असे"—हरिपाठ) व प्रातर् व सायं संध्या एवढेंच असें. महाराजांचा स्वभाव किंचित् लहरी असल्याकारणानें मुखप्रक्षालन व स्नानाचे वेळीं हातपाय धुणें व आंग चोळणें या मिषानें पाण्याबरोबर बराच वेळ क्रीडा चालत असे. क्वचित् प्रसंगीं तर हातपाय धुणें एक एक तास चालत असे व स्नान तर घंगाळावरी पाणी घेऊन होत असे. थंड पाण्याचें स्नान करण्याचा महाराजांचा सराव होता. असा बराच वेळ पाण्याचा नाद चालू असतां परा वाणींत 'रामा' 'रघुपते' 'मारुते' 'विठोबा' 'हरे नारायणा' व 'गोविंदा' या नांवानें खड्या सुरांत धांवा करीत व हीच नांवें उलट सुलट मागेंपुढें जुळवून त्याचा एक स्वतंत्र चरण बनवून रागदारींत सुरावर परंतु परावाणींत ह्मणत. अशी गाण्याची लहर सकाळीं ८—९ वाजेपर्यंत व सायंकाळीं दिवे लागण्याच्या सुमारास लागत असे.

धुळ्या नजीक सोनगीर येथील **श्रीगोविंद बाबा** उर्फ बापजी यांचे गादीवरील **श्रीकेशव दत्त महाराज** ह्यांस महाराजांच्या दर्शनाचा योग शके १८४० च्या श्रावणमासीं झाला. महाराजांची ही गाण्याची लकेर ऐकून केशवदत्त उद्गारले कीं 'महाराजांस परावाणी चांगल्या प्रकारें अवगत आहे व ही वाणी संतांचे ठिकाणींही क्वचित् ऐकावयास मिळते!'



श्रीराममारुती महाराज.

भाषा सोडण्यापूर्वीं महाराज **श्रीबालमुकुंद्** महाराजांच्या मठामध्यें नामांकित गवयां बरोबर गात असत. महाराजांना गाण्याचें अंग असल्या कारणानें ईश्वरास सामवेद द्वारें आळविण्याचें हें आणखी एक साधन त्यांचें अंगीं होतें.

३ बाळपणापासून महाराजांस भजन, कीर्तन व पुराण यांची अतिशय आवड होती. भजन श्रवणपथांत येतांच–मग तें श्रीमंताकडे असो वा गरीबाकडे असो, सार्वजनिक जागीं असो वा खासगी जागीं असो–स्वतःच्या प्रकृतीकडे बिलकूल लक्ष न देतां भजनाच्या ठिकाणीं अतिप्रेमानें जाऊन इतके कांहीं तद्रूप होत असत कीं भजन चालू असेपर्यंत मारुतीप्रमाणें उंच उंच उड्डाणें मारून नाना प्रकारच्या वांकड्या तिकड्या उड्या मारीत व नाचत. मधून मधून "विठोबा विठोबा" 'रामा रामा' 'मारुते रामा रामा' या नांवाच्या गजरांत भुभुःकार करीत. नाचत असतां पाउल टाकणें, हस्तक्षेप करणें, वांकुल्या दाखविल्याप्रमाणें तोंडाचा आकार व बोटांचा लवलवितपणा वगैरे प्रकार वानराप्रमाणें अर्थात् हनुमंताप्रमाणें दिसे.

यांचा चेहरा, यांची दृष्टि व यांच्या नाकाची व कमरेची ठेवण अशी काय होती कीं यांस पहाणारास मारुतिरायासारखाच भास होई. त्यांत विशेषतः शरीर बांधेसूद असून धोतराची कास मारलेली असावयाची मग तर काय महाराज हुबेहुब हनुमानच दिसावयाचे. मानवी भाषांचा त्याग केल्यामुळें ते स्वतः मुखानें भजन ह्मणत नसत तत्रापि अन्तर्यामीं भजन चालू ठेवून अंगविक्षेपानें व परावाणींतील धांव्यानें त्यांचा भजनप्रेमा चांगलाच व्यक्त होत असे. अतिप्रेमांत येऊन भुभुःकार करून उड्डाण घेत त्यावेळीं केव्हां केव्हां त्यांचे मस्तकाभोंवतीं मधून विजेसारखा चक्र उजेड पडे. भजनापेक्षां कीर्तनांत उड्डाण करणें व अंगविक्षेप करणें हे प्रकार हरिदास पद ह्मणूं लागले ह्मणजेच व्यक्त होत. मध्यंतरीं महाराज स्वस्थपणें निरूपण किंवा आख्यान ऐकत बसत.

भजन कीर्तन पुरें झाल्यावर आरतीस उभे राहण्यापूर्वीं जमीनीवर हात फिरवून तेथील मृत्तिका आपल्या भाळप्रदेशीं लावीत, श्रीतुकोबाराय ह्मणतात.

**कथा त्रिवेणी संगम । देव भक्त आणि नाम ।**
**तेथिंचे उत्तम । चरण रज वंदितां ॥**
**जळती दोषांचे डोंगर । शुद्ध होती नारीनर ।**
**गाती ऐकती सादर । जे पवित्र हरिकथा ॥**

आरती समाप्त झाल्यावर स्वतः तोंडानें भजन सांगतें त्याला भजन म्हणण्या-पेक्षां महामंत्रच म्हणणें जास्त शोभतें. तें असें

गोविंद रामा । गोपाळ रामा ॥

हा मंत्रोच्चार तीन वार सावकाश व तीन वार जलद अशा याच्या तीन आवृत्त्या करीत. महाराजांनीं म्हटल्यानंतर सर्व मंडळीनें म्हणावयाचें असा परि-पाठ असे. तदनंतर विठ्ठल नामाचा जयघोष करून समाप्ति होई. हा महाराजांनीं शिष्य व सकल भाविक जनांस अर्पिलेला प्रसाद–सद्गुरुकृपाठेवा–म्हणून त्यास आपल्या हृदयांत निरंतरचें स्थान द्यावें अशी त्यांच्या–महाराजांच्या–शिष्य वर्गास नम्र विनंति आहे. पांडवगीतेंत धन्वन्तरीनें म्हटलें आहे:—

अच्युतानन्तगोविन्दनामोच्चारणभेषजात् ।
नश्यन्ति सकला रोगाः सत्यं सत्यं वदाम्यहम् ॥

महाराज शनिवारीं अहोरात्र उपवासी रहात. आधींच झोंप कमी किंबहुना नाहींच म्हटलें तरी चालेल. आपण केव्हांहि जागे झाल्यावर पहावें तों महाराज जागेच्या जागेच, त्यांत शनिवारची आवडीची रात्र मग काय पुसतां. नामस्म-रणांत व उड्डाणें घेऊन भुभुःकार करण्यांतच सारी रात्र उलटावयाची. दैवव-शात् शनिवारीं भजनाचा योग न च आला तर सारी रात्र एकान्तांत ध्यानांत घालवीत.

महाराजांची निजण्याची पद्धत अशी असे कीं ज्या कुशीवर ते निजत त्या बाजूचा हात कानाखालीं घ्यावयाचे. उशी किंवा गिर्दी असली तरी कानाखालीं हात हा असावयाचाच. यांतील वर्म असें तर नसेल ना ? कीं

बाहू असतां आपणापाशीं । मग कशास पाहिजे उशी ।
काय अडचण महदाकाशीं । ठाव न दे काय पृथ्वी कुशीं ।
अखंड हरि हरि वदारे बापांनों अखण्ड० ।

अमृतराय

४ महाराज गुरुसमागमें हिमालयांत गेले होते त्यासमयीं व वाडीक्षेत्रीं महा-राजांस साक्षात् श्रीदत्त दर्शन झालें होतें असें ते सांगत. गुरु ब्रह्मीभूत झाल्या-वर महाराज आपल्या गुरुबंधूसह वाडीस गेले होते त्यावेळीं देखील त्या शिष्य-द्वयांना श्रीगुरुदत्तांचें यतिवेषांत दर्शन झाल्याचेंहि ते सांगत. श्रीविठ्ठल; राम;

मारुति यांचीं दर्शनें त्यांना भजनांत प्रेमानें उड्डाणें घेत असतां होत हें ते भजनांत कोणास तरी वारंवार गच मिठ्या मारीत यावरूनच सिद्ध होतें. मिठ्या दिसण्यांत पोकळ परंतु एखाद्यास घट्ट आवळून धरावें अशा उघड दिसत.

"दोंवरी दोनी । भुजा आलों घेउनी ।
आलिंगावया लागोनी । तयाचें आंग ॥"

ज्ञान. १२–१९

ईश्वरदर्शनाचा लाभ संत ज्या वेळीं इच्छा करितील त्यावेळीं त्यांना सहज लीलेनें होत असतो. ईश्वर केवळ प्रेमस्वरूप आहे.

"स ईश्वरो अनिर्वचनीयः प्रेमस्वरूपः" याप्रमाणें संतांनीं ईश्वरास अढळप्रेमानेंच वश करून आपल्या हृदयमंदिरांत सांठवून ठेविला असतो. व म्हणूनच कृष्ण-परमात्मा म्हणतात—

" नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ
मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद "

समुद्रामध्यें लवण ( मीठ ) तद्रूप होतें त्याप्रमाणें संत व ईश्वर यांची तद्रूपता करणारें असें हें प्रेम कितीतरी अलौकिक असतें त्याचें वर्णन तुकोबारायांनीं आपल्या रसाळ वाणींत खालीलप्रमाणें केलें आहे.

"विधवेसी एक सुत । अहर्निशीं तेथें चित्त ।
तैसा तूं मज एकला । नको मोकलूं विठ्ठला ॥
सुपुत्रालागिं बाप । अवघे तेथेंचि संकल्प ।
तुका ह्मणे चित्तीं । पतिव्रते जैसा पति ॥

अशा प्रेमपाशांत गोंवून घेतल्यावर तोच हरिः—

पार्थरथीं सारथ्य करी जो । निजपद दे बळिला ॥ १ ॥
प्रऱ्हादास्तव प्रगटुनि स्तम्भीं । दानव निर्दळिला ॥ २ ॥
रुक्मिणीनें एक्या तुळसी दलानें । गिरिधर प्रभु तुलिला ॥ ३ ॥

असा वश कां होणार नाहीं? व ही संत मंडळी त्या अनंतकोटब्रह्मांड नायकास वाटेल तेव्हां दर्शनास आणून त्यास मिठी कां मारणार नाहींत? श्रीक्षेत्र पंढरपूर येथें कार्तिकी पौर्णिमेच्या काल्याच्या वेळीं दहीं हंडी फोडण्याचा मान देठणकर यांचा आहे. हंडी फोडण्याचे सुमारास एक अष्ट वर्षे बाल-

काची मूर्ति गर्दींतून येऊन नेत्रपाती लवते न लवते तों दैठणकर यांचे खांद्यावर चढून हुंडी फोडून जाते. तसेंच नाथ षष्ठीचे दिवशीं पैठणास नैवेद्य प्रसादाचे वेळीं हौदांत अखेरची गंगोदकाची घागर याच अष्ट वर्षे बालकाच्या मूर्तीनें आणून टाकिल्या खेरीज तो हौद भरत नाहीं व ही मूर्ति एकंदर जमावांत एकाएकीं येऊन हौदांत घागर ओतून अदृश्य होते अशी प्रसिद्धि आहे. या दोन्ही ठिकाणीं त्या परब्रह्माच्या सगुण मूर्तीचें दर्शन घेण्यास संत मंडळी अवश्य जात असते व असला अपूर्व दर्शनलाभ ज्या महात्म्यास दिव्य दृष्टी असेल त्यासच मिळणार. हीं दोनही दर्शनें महाराजांना अनेक वार घडलीं असल्याबद्दल ते सांगत असत.

---

## प्रकरण ५ वें.


# महाराजांचे सद्गुरु श्रीबालमुकुंद महाराज स्वामी.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥

[१ श्री बालमुकुंद स्वामी. २ सद्गुरु साक्षात्कार. ३ सद्गुरुभेट. ४ गुरुभक्ति व गुरुकृपासंपादन. ५ श्रीपंढरीनाथ महाराज व श्री गोंदे येथील गादी. ]

महाराजांची गुरु परंपरा उपलब्ध आहे ती येणे प्रमाणें:—

आदिनाथं च मच्छेंद्रं गोरक्षं गहिनिं तथा ।
निवृत्तिं ज्ञानदेवंच देवं चूडामणिं नमः ॥
अखंडानंदरूपाय सर्वज्ञान प्रदायिने ।
भवध्वांत दिनेशाय गुंडाख्य गुरवेनमः ॥
नमः श्रीबालमुकुंदाय गुरवे परमात्मने ।
यत्प्रसादादिदं सर्वं जगद् ब्रह्मैव भासते ॥
नमः श्रीराम मारुतये द्वैतध्वांत विभेदिने ।
परावरविदेशांतविग्रहाय दयालवे ॥



श्रीबालमुकुंद स्वामी.

१ महाराजांचे गुरु **श्री बालमुकुंद स्वामी** व त्यांचे गुरुबंधु **श्री पंढरीनाथ महाराज** हे श्री गुंडो महाराजांचे शिष्य. श्री गुंडो महाराजांचे गुरूस प्रत्यक्ष श्रीदत्तात्रेयाचे हस्तें अनुग्रह झालेला होता. यांची गादी ( मठ ) निझाम संस्थानांत हैद्राबाद येथें असून तेथें अजून त्यांची सांप्रदायिक गादी आहे. श्री गुंडोजी महाराजांच्या अनेक शिष्यांपैकीं प्रसिद्ध असलेल्या आठ शिष्यांचीं नांवें आढळतात, तीं खालील प्रमाणें—

| | |
|---|---|
| १ श्री नारायण शिवराम महाराज. | ५ श्री रामेश्वर महाराज. |
| २ श्री जयसखादास महाराज. | ६ श्री गुरुदेव दत्त. |
| ३ श्री ज्ञानदास महाराज. | ७ श्री बालमुकुंद स्वामी. |
| ४ श्री एकनाथ महाराज. | ८ श्री पंढरीनाथ महाराज |

श्री बालमुकुंद स्वामी यांचा मठ मुंबई येथें कांदेवाडींत जीवनजी महाराजांच्या चाळीच्या मागील पटांगणांत एक मोठा अश्वत्थ वृक्षाचा पार आहे त्याचे बाजूस होता. शके १८०५ पर्यंत या मठाचा उत्कर्ष होता, व पुढें स्वामी ब्रह्मीभूत झाल्यावर कांहीं काळ त्यांचे शिष्य श्री महेन्द्र महाराज हे तो मठ चालवीत होते. त्यांचे मागें तो मठ कांहीं वर्षें तसाच राहिला. ज्या ठिकाणीं एका काळीं हरिनामाचा गजर होत असे त्या ठिकाणीं आतां शुक्र आहे !

बालमुकुंद स्वामींच्या शरीराचा बांधा सुरेख, सशक्त, उंच, स्थूल ना कृश असा होता. छाती रुंद, केश लांब, पातळ व सोनेरी रंगाचे तेजस्वी होते व अंगकान्ति सुवर्णाप्रमाणें पिंवळट गोरी होती. या मठांत नित्य रात्रौ ११ ते २ वाजे पर्यंत भजन होत असे. स्वामी पायांत चाळ बांधून भजनांत नाचत त्या वेळीं ते तारुण्याच्या भरांत आहेत असा भास होई. स्वामींची गणना योगी जनांत होत असे. ध्यान धारणा, नित्य शिवलिंग पूजन अशा प्रकारचें त्यांचें नित्य नैमित्तिक असे. स्वामींनीं राममारुती सहवर्तमान अनेक तीर्थ यात्रा करून हिमालयामध्यें बराच काळ तेथील महात्म्यांच्या समागमांत घालविला. श्रीगुरुकृपेनें आपल्या महाराजांसहि थोर सत्पुरुषांचा सहवास घडला. तेथून हे गुरुशिष्य नेपाळ, चीन, जपान येथें तीर्थयात्रा करीत गेले ! योगबलानें या गुरुशिष्यांनीं हिमालयांतील कांहीं अवघड ठिकाणीं प्रवास केल्याचें महाराज स्वतः सांगत असत. योगबलानें प्रवास कसा होतो हें साधारण माणसाला हल्लींच्या काळीं समजणें दुर्घट आहे

परंतु त्या मार्गांतील माणसास तें असंभवनीय वाटणार नाहीं. योगीजनांस ह्या गोष्टी सहज अवगत असतात.

"पाण्यामध्यें मासा झोंप घेई कैसा ।
जावें त्याच्या वंशा तेव्हांचि कळे ॥

किंवा

तुका ह्मणे येथें पाहिजे जातीचें ।
येर गबाळाचें काम नाहीं ॥"

राममारुति महाराजांस आपल्या सद्गुरुसमागमांत ह्या सुखाचा अनुभव घेतलेला काळ किती अमोल व आनन्दमय गेला असेल याची जाणीव ज्या सच्छिष्यास सद्गुरुसमागमाचा योग आला असेल त्यासच असणार. त्या आनन्दाचें वर्णन शब्दांनीं होणें शक्य नाहीं, तो केव्हांहि "मूकास्वादनवत्" असाच असतो.

नवानवसानें झालेल्या एकुलत्या एक लाडक्या मुलावर आईबापाचें असलेलें प्रेम ज्या प्रेमापुढें फिकें पडेल असें अलौकिक प्रेम स्वामी हे राममारुति महाराजांवर करीत.सद्गुरुमातेचें हें बालक अगदीं लहानपणीं—अर्भक असतांना—स्वामीपासून दूर अन्तरावर वृद्धि पावत असतांना त्या माउलीची कासवीप्रमाणें कृपादृष्टि या बाळावर होतीच. ( प्रकरण ३ बालपण, ४ प्यारा पहा ) आणि आतां तर उभयतांचा अतिनिकट सम्बन्ध झालेला, मग त्या प्रेमास पूर आल्याचें काय नवल ?

स्वामींचें मठांत ज्याप्रमाणें भजन होत असे त्याप्रमाणें गवयांचें गाणेंहि होत असे. त्यावेळीं महाराज देखील सुरेल व मधुर आवाजांत त्यांचे बरोबरीनें गात असत व गातां गातां देहभान विसरून तन्मय होत. या मठांत त्या वेळीं येत असलेल्या मंडळीनें मोठ्या आदरानें व प्रेमानें घेतलेले श्री बालमुकुंद स्वामीचे फोटो मुंबईत कांहीं पाठारे प्रभू ज्ञातींतील त्यांच्या शिष्य मंडळीच्या घरीं अद्यापि आहेत. ह्या मठांत श्री गुंडो महाराजांची पुण्यतिथि फार व थाटानें साजरी केली जात असे. ह्या समयीं ग्रामांतराहून सामानसुमान येऊन पडे व वर्गणी गोळा केल्याशिवाय व पट्टीवांचून हजारों मंडळीस पुरेल इतकें सामान जमा होत असे. सारांश हा मठ म्हणजे त्या काळीं मुंबईत नामसंकीर्तनाचें आदिस्थान होतें.

२ बालमुकुंद स्वामी ह्यांस आपल्या शिष्याची योग्यता पटलेली असून त्यांचें कृपाछत्र महाराजांवर झळकत होतें हें बालपणाच्या एका प्रसंगांत मागें दिलें आहेच. परंतु महाराजांस आपल्या गुरूची जाणीव झाल्यानंतर त्यांची भेट कशी झाली हें आतां आपण पाहूं.

आपल्या महाराजांचें शंकर हें पूर्वींचें नामाभिधान, परंतु त्यांस 'राममारुति' हें नांव केव्हां प्राप्त झालें व कोणीं दिलें याचा कांहींच शोध लागत नाहीं. तस्मात् महाराजांना राम मारुति ह्याच नांवानें संबोधणें श्रेयस्कर आहे.

ह्या प्रकरणांतील खालीं दिलेली व पारिग्राफ ४ मध्यें दिलेली हकीकत स्वतः महाराजांच्या तोंडून सांगण्यांत आली होती हें प्रामुख्यानें नमूद केलें पाहिजे.

राम मारुति उर्फ महाराज हे नित्याप्रमाणें एके रात्रीं भिवंडी येथील श्रीरामेश्वराचे देवळांत ध्यानस्थ बसले असतां त्यांचे कानांत मंजूळ दिव्य वाणी पडली ती ही कीं "मुंबईस बालमुकुंद म्हणून सत्पुरुष आहेत त्यांचें दर्शन घे म्हणजे तूं कृतार्थ होशील." ही वाणी श्रवणीं पडतांच महाराज देहभानावर आले व सद्गुरुदर्शनाची त्यांना सारखी तळमळ लागून राहिली. मुंबई हें ठिकाण कळलें, पण जावें कोठें व पत्ता कसा लावावा ह्या विचारांत महाराज पडले. मुंबई म्हणजे कांहीं भिवंडीसारखें खेडें किंवा लहानसें गांव नव्हे. त्यांत त्यांनीं मुंबई कधीं पाहिलेली नाहीं व वय अगदीं सुकुमार. महाराजांना बहुतेक निराशाच वाटूं लागली. परंतु ईश्वरी लीला अगाध आहे. समर्थानीं म्हटल्याप्रमाणें भूमिका तयार असल्यावर सद्गुरूकरितां विशेष परिश्रम करण्याचें प्रयोजनच रहात नाहीं. सद्गुरु स्वतःच शिष्याचे भेटीस अधीर झालेले असतात मग ते येऊन त्यास भेट देतील किंवा लोहचुंबकाप्रमाणें त्यास आपणांकडे आकर्षण तरी करून घेतील. अस्तु.

३ महाराजांचे वडील हे शेट वरीम करीम नांवाच्या इसमाकडे नोकरीस होते व त्यांची हुशारी व नेकी पाहून शेटजीनीं आपल्या मुंबई येथील मुख्य ऑफिसांत मुनीमाच्या जागेवर त्यांची नेमणूक केली होती हा भाग मागें आलाच आहे. आश्चर्य इतकेंच कीं ही नेमणूक वरील साक्षात्काराचे सुमारासच झाली व तेणेंकरून मुंबईस सद्गुरुंचे दर्शन होण्याची संधि जवळ आली. अर्थात् वडीलांचें व त्याबरोबर महाराजांचें बिऱ्हाड भिवंडीहून उठलें. परंतु तें सरळ मुंबईस न येतां मध्यंतरीं शींव नांवाच्या मुंबईनजीकच्या खेडें वजा गांवीं आलें. तो प्रकार झाला तो असाः—वडीलांचे मामा रा० माधवराव खारकर हे त्या वेळीं

शींवास रहात होते व त्यामुळें त्यांनीं आपलें बिऱ्हाड शींव येथें नेऊन तेथून दररोज नोकरीवर मुंबईस जाऊं लागले. महाराजहि संधि साधून मुंबईस मधून मधून जाऊं लागले. मनांत हेतु हा कीं अशा जाण्या येण्यानें श्रीबालमुकुंद स्वामींचा पत्ता तरी लागेल. व तो ईश्वरी नियमानें पुढें लागलाही.

रा. माधवराव खारकर यांचें स्वामींकडे मुम्बईस जाणें येणें असे. परन्तु राममारुति महाराजांस तें पक्कें ठाऊक नव्हतें. महाराजांच्या मुम्बईस दोन चार खेपा झाल्या तरी पण पत्ता कांहीं लागेना. शेवटीं हा पत्ता मिळणार कसा हे निराशाजनक विचार मनांत येऊन महाराजांना गहिंवर आला व एकान्तात जाऊन स्फुंदस्फुंदून करुणस्वरानें सद्गुरु धांवा करीत बसले. हृदय पिळून कळवळ्यानें केलेला धांवा देवास पावायाला वेळ कां लागतो ? ज्ञानोबाराय म्हणतातः—

“ पैं रंकु एक आडलेपणें । काकुळती धांव गा धांव ह्मणे ।
तयाचिये ग्लानि धांवणें । काय न घडे मज ॥ ज्ञाने. ८. १४. १२८

नाथ महाराजांचें देखील आश्वासन असेंच आहे. कसें तें पहाः—

“ जीवु अत्यन्त अडलेपणें । ईश्वरासी धांव धांव ह्मणे ।
तो तत्काळ पावे धांवणें । करी सोडवणं जीवाचें ॥”

एक. भाग ११. ६. १७२

महाराज मनाच्या उद्विग्न स्थितींत घरीं गेले तों रा. माधवराव खारकर कपडे चढवून मुंबईस जावयाला निघालेले त्यांनीं पाहिलें. त्यासरशीं सहज स्फूर्तीनें “मी तुमच्या बरोबर मुंबईस येऊं का” म्हणून विचारिलें. रा. माधवरावांनीं आनंदानें हो म्हटलें व पुढें म्हणाले कीं आज शनिवार आहे तेव्हां रात्रीं बालमुकुंद स्वामींचे मठांत मला जाणें आहे. उद्यां रविवारची सुट्टी आहे तेव्हां आजची सारी रात्र तेथें काढून सकाळीं परत येऊं. हे आनंददायी पर्जन्यरूपी शब्द या बाल चातकाच्या श्रवणांत पडतांच त्यांना कल्पनातीत आनंद झाला. दोघेहि तत्काळ निघाले व मुंबईस स्वामींचे मठांत गेले. मठांत पाय ठेवतांच राम मारुति पुलकित तनु झाले व अंतःकरण सद्गदित होऊन ऊर भरून आला. तेथून स्वामीसन्निध गेले व रा. माधवरावांचें दर्शन होतांच राममारुतीनें स्वामींच्या चरणांवर धाड्कन् आंग टाकलें. मायलेकांचीच भेट ती. बराच वेळ दिसत नसलेली आई मुलास दिसली ह्मणजे त्यांची जशी स्थिति होते, तशी स्थिति ह्यांची झाली. स्वामींनीं

महाराजांच्या डोक्यावर हात ठेवून पोटाशीं धरिलें व जवळच आसन घेण्यास सांगितलें व हा मुलगा कोण वगैरे माधवरावांकडे औपचारिक विचारपूस केली. त्या सबन्ध रात्रीं स्वामीची वृत्ति विशेष आनंदाची होती. सर्व रात्र तेथें राहून पूर्व संकेताप्रमाणें रा. माधवराव महाराजांसमवेत रविवारीं सकाळीं शींव येथें परत आले.

४ शरीरानें महाराज शींवास परत आले पण मन सारें मुंबईस स्वामीचरणीं लागून राहिलें व त्यामुळें पुनः पुनः मुंबईस जाण्याचा महाराजांनीं दृढ निश्चय केला. व त्याप्रमाणें एक दोन दिवसांनीं मुंबईस मठांत जाण्याचा त्यांनीं क्रमही ठेविला. पूर्व जन्मींचा ठेवा सद्गुरुसमागमच तो; त्याचें वर्णन आम्हां सारख्या विषयपंकांत लोळणाऱ्या दर्दुरांनीं काय करावें. म्हटलें आहेः—

सेवा दो भली एक संत एक राम ।
राम है दाता मुक्तिका संत जपावे नाम । (कबीर)

उपजतच भक्ति वैराग्य व ईश्वरप्रेम अंगीं अगदीं मुरलेलें, त्यावर सद्गुरुहस्तें ज्ञानामृत जलाचें सिंचन होतांच संतरोपा झपाट्यानें वाढूं लागला ह्यांत आश्चर्य कसलें. पुढें महाराजांचा बराच वेळ गुरुसमागमांत जाऊं लागला व थोड्याच दिवसांत सुमुहूर्तावर महाराजांचें मौंजीबंधन स्वामींनीं आपल्या मांडीवर करविलें. त्या प्रसंगीं मठांत मोठा उत्सव झाला. गुरुसन्निध राहून जपतपादि साधनांचा दृढ अभ्यास करून महाराजांनीं योगांत प्राविण्य संपादन केलें. स्वामींनीं गुरु बरोबर हिमालयांत प्रवास करून अनेक साधुसंतांचीं व महात्म्यांचीं दर्शनें घेऊन त्यांचीहि कृपा मिळविली.

महाराजांनीं सेवाव्रत इतकें उत्तम तऱ्हेनें आचरिलें कीं स्वामी यांना क्षणभर विसंबत नसत. व स्वदत्तविद्येंत शिष्य किती प्रवीण झाला हें पहाण्याची संधि स्वामींनीं आणून त्यांत महाराज पूर्णपणें उत्तीर्ण झालेही. ती संधि—तो प्रसंग—खालील प्रमाणें:—स्वामीचा एक शिष्य काशीस गेला होता तो तेथें पाय घसरून गंगोदकांत बुडूं लागला, हें स्वामींनीं कांदेवाडींतील मठांत एके दिवशीं रात्रौ भजन चालू असतां अंतर्ज्ञानानें जाणलें व राममारुतीकडे सहेतुक पाहिलें. गुरूचा आशय ध्यानांत येण्याला महाराजांना क्षणाचाहि विलंब लागला नाहीं. त्यावेळीं भजनाला रंगहि बराच आला होता, परंतु गुरूचा आशय ध्यानांत येतांच योगबलानें काशीस जाऊन गुरुबंधूस हात देऊन तीरावर आणलें व तो सुर-

क्षित आहे असें पाहून मठांत परतले. स्वामींनीं शाबास म्हणून शिरीं वरदहस्त ठेविला. हजर असलेल्या मंडळीस ह्या साऱ्या प्रकाराचें आश्चर्य वाटलें याचा अर्थ काय हें समजून सांगण्याचा मंडळीनें आग्रह केला म्हणून स्वामींनीं इत्थंभूत हकीकत निवेदन केली. मग काय विचारितां, महाराजांच्या चरणाचें दर्शन घेण्याची एकच गर्दी उडून राहिली व अवशिष्ट रात्र पूर्ण भजनांत घालविली. अशा रीतीनें महाराजांनीं गुरुसेवा करून त्यांची कृपा संपादन केली.

साधुवर्य दादू यांनीं म्हटलेंच आहे.

**दादू भृंगी कीट ज्यौं सतगुरुसेती होय ।**
**आपसरीखे कर लिये दूजा नाही कोय ॥**

५ श्री बालमुकुंद स्वामींचे गुरुबंधु श्री पंढरीनाथ महाराज हे होत; त्यांचे शिष्य श्रीकृष्णानंद महाराज, श्री गोंदेकर; व श्री गोंदेकर महाराजांचे शिष्यापैकीं या बाजूस प्रसिद्ध असलेले **श्री नाना महाराज** हे होत. श्री सद्गुरु कृपेनें हे मुंबई, पुणें, गुजराथ, माळवा प्रांत वगैरे ठिकाणीं ज्ञानेश्वरीवर प्रवचनें करून कीर्तनेंही करीत असतात. या सेवारूपानें मिळालेल्या द्रव्याचा विनियोग हे आपल्या सद्गुरुच्या समाधी मंदिराकडे करीत असतात. ‘ एक पंथ दो काज ’ या न्यायानें गुरुसेवा करून जगास आपल्या ज्ञानाचा हे लाभ देत आहेत. हे पूर्वाश्रमीचे चां. का. प्रभु होत.

**ज्याचे नारायण गाठीं । भरला हृदय संपुटी ॥**
**अवघेंची गोड । त्याचें पुरेल सर्व कोड ॥**

(श्री तुकाराम.)

## प्रकरण ६ वें.

# गुरुसमाधि व तीर्थपर्यटनानन्तर भाषात्याग.

स्नान संध्या जपध्यान । तीर्थ यात्रा भगवद्भजन ।
नित्यनेम पवित्र पण । अन्तर शुद्ध असावें ।
दृढ निश्चयो धरावा । संसार मिथ्या जाणावा ।
विश्वजन उद्धरावा । संसर्ग मात्रें ॥

दास. द. २ स. ९

[ १ गुरुसमाधि २ तीर्थपर्यटण ३ भाषात्याग व त्रिदंडीसन्यास ४ शिष्यसंप्रदाय. ]

१ स्वामीबरोबर हिमालयांत जाऊन अनेक महात्म्यांचीं दर्शनें घेऊन कृपाप्रसाद मिळविल्यावर शके १८०५ चे पौष महिन्यांत महाराज मुम्बईस आले. बरोबर स्वामी होतेच. मुम्बईस येऊन कांहीं दिवस उलटले नाहीं तोंच म्हणजे त्याच महिन्याच्या वद्यपक्षांत सांगली नजीक हरिपूर येथें जाण्याची इच्छा स्वामींनीं प्रदर्शित केली, व बेत निश्चित केला. बेत कायम होतांच १५ शिष्य व महाराज यांना बरोबर घेऊन स्वामी हरिपुरास गेले. तेथें गेल्यावर स्वामीस किंचित् ज्वराची भावना झाली व प्रकृति अस्वस्थ होऊं लागली. सुमारें ४-५ दिवस याप्रमाणें प्रकृतींत फरक दिसूं लागला पण चिन्ता करण्यासारखी स्थिति नव्हती, असें होतां होतां पौष वद्य ९ स स्वामींनीं महाराजांस जवळ बोलावून सांगितलें कीं "उद्ईक आमची यात्रा संपणार." वज्रादपि कठोर असे हे मर्मविघातक शब्द कानीं पडतांच महाराजांस विजेचा धक्का बसल्याप्रमाणें झालें व किंचित्काल पावेतों कसेसेंच वाटून उद्विग्नता प्राप्त झाली परन्तु मरक्या गुरूचा रडका चेला अशांतला ह्या गुरुशिष्यांचा प्रकार नसल्याकारणानें महाराजांनीं धीर खचूं न देतां सावध अन्तःकरणानें वागून गांवांतील भाविक व श्रद्धाळू लोकांस पाचारण केलें. ही मण्डळी येतांच बरोबरील १५ मण्डळीसह भजनाचा सारखा जयघोष चालविला. बाहेरून अशा रीतीनें नामस्मरणाचा गजर सर्व रात्रभर चालवून स्वतः स्वामीजवळ गीता-पुरश्चरण करीत बसले. सकाळीं अवतार समाप्तीची वेळ जवळ येतांच स्वामींनीं महाराजांच्या अंकावर मस्तक ठेविलें व आनन्दानें ह्या नश्वर देहाचा त्याग केला. तो दिवस शके १८०५ पौष वद्य १० होय.

## प्रकरण सहावें.

२४. स्वामींचा संप्रदायानुरूप तीर्थभंडारा झाल्यावर महाराज पुनः तीर्थाटनास निघाले व स्वामीचें स्मरण हृदयांत, चित्तांत, मनांत वगैरे सारखें कायम रहावें एतदर्थ व्यावहारिक भाषेचा महाराजांनीं त्याग केला. त्यांनीं प्रथमतः हिमालयांत प्रयाण केलें व तेथें कांहीं वर्षें—सरासरी ३–४ वर्षें—काढिलीं व तो सर्व काळ सत्पुरुषसेवेंत व समागमांत घालविला. हिमालयांत असतां यांना शिष्यशाखा करण्याची आज्ञा तेथील महात्म्यांकडून झाली. पुढें अनेक तीर्थयात्रा करून महाराज स्वदेशीं परत आले. हें पर्यटण एकंदर १०-१२ वर्षें झालें असें अनुमान आहे.

३ सद्गुरु–स्वामी निर्गुणरूपीं झाल्यावर भाषेविषयीं एकंदर मौनव्रत धारण करून ईश्वरनांवावांचून इतर उच्चार वाणीनें करावयाचा नाहीं असा कडकडीत नियम महाराजांनीं शेवटपर्यंत पाळिला. व हा नियम करण्यांत त्यांनीं त्रिदंडी संन्यास धारण केला असें म्हणण्यास हरकत नाहीं. व्यावहारिक दृष्टया संन्यास धारण करून बाह्यात्कारी लक्षणांनीं जगांत मिरविण्यापेक्षां अंतर्लक्षणांनीं युक्त असा संन्यास घेणें महाराजांस इष्ट वाटलें असेल असेंच म्हणणें भाग पडतें. ग्रंथांतरीं वर्णिलेल्या लक्षणांनीं युक्त असा हा संन्यास कसा होता तें क्षणभर पाहूं.

१ मौन व नामस्मरण हा वाग्दंड.

२ प्राणायामानें प्राणाचा विरोध हा देहदंड,

३ ब्रह्मानुसंधान ठेवणें हा मनोदंड.

या अखंड नामस्मरण वगैरे वृत्तींचें माहात्म्य तुकोबारायानें वर्णिलें आहे तें—

राम ह्मणे वाट चाली । यज्ञ पाउलें पाउली ।
धन्य तें एक शरीर । तीर्थव्रतांचें माहेर ।
राम म्हणे करितां धंदा । सुखसमाधी त्या सदा ॥
राम म्हणे ग्रासोग्रासीं । तोचि जेविला उपवासी ॥
राम म्हणे भोगीं त्यागीं । कर्म न लिम्पे त्या अंगीं ॥
ऐसा राम जपे नित्य । तुका म्हणे तो जीवन्मुक्त ॥

समर्थांनींही ह्मटलें आहे:—

श्रीराम जयराम जयजयराम । अखंड स्मरे जो सप्रेम ॥
तो स्वयेंचि असे पुरुषोत्तम । ह्मणौनि राम न विसरावा ॥

तुलसीदास ह्मणतात.

**चहुँ जुग तीन काल तिहुँ लोका । भये नाम जपि जीव विसोका ॥**
**वेद पुरान संतमत यहू । सकल-सुकृत-फल राम सनेहू ॥**

चारही युगांत, तिन्ही काळांत व तिन्ही लोकांत कोणी जीव जर शोक रहित झाला असेल तर तो नामजपानेंच होय. वेद, पुराणें व संत यांचें मत तरी असेंच आहे कीं रामभक्ति हेंच सर्व सुकृताचें फल होय.

हरिपाठांत तर स्पष्ट ह्मटलें आहे कीं—

**नामापरतें तत्व नाहींरे अन्यथा । वायां आणिका पंथा जाशील ह्मणीं ॥**

**रामचन्द्रके भजन बिनु जो वहपद निर्बान ।**
**ज्ञानवंत अपि सो नर पसु बिनु पूछ बिखान ॥** —सुंदरदास.

रामनामाव्यतिरिक्त जो मोक्षाची हांव धरील तो ज्ञानी असला तरी देखील पुच्छविषाणहीन पशूच समजावा. अस्तुः

अनेक तीर्थाटणें करून महान् महान् महात्म्यांच्या आज्ञानुरूप महाराज इकडे आल्यावर शिष्य वर्ग तयार करूं लागले. त्यांचा शिष्य समुदाय बराच असून तो मुंबई, ठाणें जिल्हा, कुलाबा जिल्हा, गुजरात प्रान्त, बडोदें वगैरे ठिकाणीं पसरला आहे. अज्ञानांधःकारांत बुडत असलेल्या भाविक जनांस आपल्या दैवी सामर्थ्यानें ज्ञानामृत पाजून त्यांचे ठिकाणीं ईश्वरभक्ति व ईश्वर प्रेम वृद्धिंगत केलें. शिष्य वर्गाखेरीजहि ज्या ज्या भाविक मंडळीकडे महाराजांचें जाणें झालें तेथें तेथें भक्तिरोप्याचें त्याहीं बीजारोपण केलें. महाराजांचे ठिकाणीं अढळ प्रेम करणारी मंडळी सर्व ज्ञातींत आहे. ब्राह्मण, प्रभू, गुजर, इतकेंच नव्हे तर पारशी व मुसलमान मंडळींतहि आहेत. सर्व ज्ञातीमध्यें महाराजाविषयीं अति आदर असे व आहे, हें प्रकरण १३ मध्यें विनंतिपत्राची नक्कल दिली आहे त्यावर असलेल्या भाविक गृहस्थांच्या सह्यांवरून स्पष्ट व्यक्त होतें. अशा प्रकारें धर्मजागृति करून ईश्वराविषयीं निष्ठा वाढवून व अज्ञ जनांस त्यांच्या अधिकारानुरूप वळण लावून महाराजांनीं आपलें इहलोकींचें कर्तव्य पुढें दिलेल्या उक्तीप्रमाणें सार्थ केलें.

**आडमार्गीं कोणी नर जे जातील । त्यांतुनि काढिल तोचि ज्ञानी ॥ १ ॥**
**तोचि ज्ञानी खरा तारील दुजियासी । वेळोवेळां त्यासी शरण जावें ॥२॥**
**आपण तरेल नव्हे तें नवल । कुळें उद्धरील सर्वांचीं तो ॥ ३ ॥**

३६ प्रकरण ७ वें.

# महाराजांची ईश्वरनामभाषा.

………… भाषाव्यवहार चालवी सकळ ।
………… जाय न भाषेशिवाय एक पळ ॥

[ १ महाराजांनीं स्वकार्यार्थ बसविलेली ईश्वरनामभाषा. ]

ईश्वराच्या अनंत नामापैकीं कोणत्या तरी नामाव्यतिरिक्त मुखानें उच्चार करावयाचा नाहीं व आपण बोललेलें दुसऱ्यास समजलें तर पाहिजे कारण भाषेवांचून नित्याचे व्यवहार चालणें जरी अशक्य नसलें तरी कठीण तर खरेंच म्हणून महाराजांनीं एक स्वतंत्र भाषाच बसवून टाकिली होती. व त्या स्वनिर्मित भाषेंत व्यावहारिक विषयांवर तर असो पण पारमार्थिक विषयांवर सुद्धां ते अस्खलित बोलत. त्यांच्या बोलण्याचा अर्थ प्राकृत जनांना अल्पसहवासानें स्पष्ट समजत असे. आश्चर्याची गोष्ट ही कीं या भाषेंतच ते शाळेंतील मुलांस अवघड उदाहरणें सोडवून त्यांच्या रीती देखील समजावून सांगत. एवंच ही भाषा सर्व साधारणपणें महाराजांचे विचार सुव्यक्त करण्यास उपयोगी पडे. ही महाराजांची भाषा ईश्वरनामाची होती खरी तरी पण ते विवक्षित नांवेंच विवक्षित अर्थी उच्चारीत. त्याचें स्पष्टीकरण खालीं लिहिल्याप्रमाणें आहे. ते केवळ "शंकर" म्हणत नसत. 'शंकर' नांवाला 'शिव' नांवाची जोड देऊन 'शिवशंकर' असें म्हणत. विठोबाचे नांवांत सुद्धां फक्त तीन नांवांचा उच्चार होत असे. तीं म्हणजे विठ्ठल, विठोबा व पांडुरंग. पंढरीनाथ किंवा इतर विठ्ठल दर्शक नांवें वर्ज्य असत. 'गणपति' नांव घेत परंतु त्या देवतेची व्यवहारांत प्रचलित असलेलीं इतर नांवें–गजानन; हेरंब, मोरेश्वर, मोरया वगैरे उच्चारीत नसत. सर्वांत विशेष लक्षांत बाळगण्यासारखी गोष्ट ही कीं जीं ईश्वरवाचक नांवें ते घेत नसत तीं नांवें स्वप्नांतहि त्यांच्या मुखावाटे आलीं नाहींत किंवा जलद बोलण्याच्या आवेशांत त्यांचा उच्चारहि झाला नाहीं.

या भाषेमध्यें ज्या नावांचा उच्चार होत असे तीं नांवें खालीं दिल्याप्रमाणें होतः—

१ श्रीराम, २ जयराम, ३ जय जयराम, ४ रामचंद्र, ५ रघुवीर, ६ रघुपति, ७ शिवशंकर, ८ भीमाशंकर, ९ हरहर महादेव, १० शिव शिव, ११ विठ्ठल, १२ विठोबा, १३ पांडुरंग, १४ गोविंद, १५ गोपाळ, १६ गणपति, १७ हरि, १८ गोपाळकृष्ण, १९ हरिनारायण, २० दत्तात्रेय, २१ मारुति, २२ बलभीम.

एवंच महाराजांची भाषा म्हणजे ह्या २२ समष्टिव्यष्टि रूपानें बनलेली भाषा होय. ह्या भाषेमध्यें लिंग दर्शविणारीं नांवेंहि होतीं. उदाहरणार्थ पुल्लिंगी पदार्थास "विठोबा" म्हणत. जसें भात; केशरी भात; नारळी भात; श्रीखंड; वडा; आंबा वगैरे. स्त्रीलिंगी पदार्थ दर्शविण्यास " जयजयराम " नांवाचा उपयोग करीत. जसें भाजी, आमटी, कढी, चटणी, दशमी, पोळी, कॉफी, बासुंदी, जिलबी, कोशिंबीर, काकडी, साखर वगैरे.

ह्या २२ नांवांचा कसा व कोणत्या अर्थी उपयोग करीत ह्याची साधारण ठोकळ कल्पना यावी ह्मणून निर्देश करितों.

**'श्रीराम'**—आनन्दमय स्थिति दर्शविण्याकरितां ह्याचा उपयोग होत असे. उदाहरणार्थ बागेंत फिरावयास गेल्याचें सांगून तेथें गार वारा लागून चित्तास आल्हाद झाला, असली स्थिति वा आरामाचें वर्णन करितांना "श्रीराम" वापरला जात असे.

दृढतर आत्मविश्वास दर्शविणें झाल्यास तर हा शब्द " श्रीरॉम " अशा घुमणाऱ्या आवाजांत उच्चारला जात असे.

**'जयराम'**—कोणी भेटल्यास वा कोणाची गांठ पडल्यास "कसें काय" ह्मणून विचारण्याची पद्धत असते, त्या प्रश्नास "बरें आहे" उत्तर द्यावयाचें ह्मणजे "जयराम" शब्द योजीत. "बरें आहे ना" असें विचारणें झाल्यास हाच शब्द किंवा हेंच नांव प्रश्नोद्गारानें विचारीत. जसें "जयराम ?"

**जयजयरामः**—लहान व अविवाहित मुलगी तसेंच विवाहित स्त्रीलाहि हाच शब्द योजीत. जसें गणपतरावाचें कुटुम्ब ह्म०गणपति विठ्ठल जयजयराम. हें येथें सांगणें अवश्य आहे कीं कोणत्यहि पुरुषाच्या नांवापुढें " विठ्ठल " हें पालुपद असावयाचें. नुसतें नांव घेण्याचा प्रघात नसे. म्हणून "गणपति" हें गृहस्थाचें नांव त्याच्यापुढें "विठ्ठल" हें पालुपद आलें आहे.

**'रामचन्द्र'**—या नांवाचा उपयोग ईश्वर नाम घेण्यांतच होत असे

**'रघुवीर'**—ईश्वराची करुणा भाकण्याच्या कामीं ह्या नांवाची योजना करीत. कोणाचें कांहीं वाईट झालें, किंवा कोणाला नुकसान आलें तसेंच कोणी आजारी असून वेदना होत असल्या तर दुःखदर्शक उद्गार म्हणजे 'रघुवीरा' असें करुण स्वरानें म्हणत व 'रघुवीर' किंवा 'जयरघुवीर' ह्मटलें ह्मणजे समजावें कीं हें आश्वासनात्मक आहे, ह्मणजे भिऊं नको. ईश्वर काळजी दूर करणारा समर्थ आहे. ह्या प्रसंगीं "वीर" या पदावर जोर असे.

**'रघुपति'**—वरीलप्रमाणें.

**'शिवशंकर'**—ईश्वरनाम घेण्यांतच या नांवाचा उपयोग होई.

**'भीमाशंकर'**—वहकलेला, व्यसनी, वेडा, उनाड, लठ्ठ वगैरे व याच प्रत्येक स्थितीचा अतिरेक झाला म्हणजे जय भिमाशंकर ह्मणत. उदाहरणार्थ अति वहकलेला, अतिव्यसनी, निखालस वेडा.

**'हरहर महादेव'**—कांहीं आपत्ति येणें. जसें मरणें, पडणें, बहिर्दिशेस जाणें (ह्या स्थितीचाहि अन्तर्भाव होत असे), अपयश येणें, घराचें पडणें, वगैरे.

**'शिवशिव'**—तो; अमका; घाण; दूर करणें; वगैरे अर्थी प्रसंगाप्रमाणें हा शब्द योजीत.

**' विठ्ठल '**—कोणाहि पुरुषाच्या नांवापुढें त्याच्या वडिलांच्या नांवाऐवजीं पालुपदाप्रमाणें ह्या शब्दाची योजना करीत. तसेंच कोणताहि अवघड विषय समजावून सांगितल्यावर तो समजला असें म्हणून पुनश्च म्हणून दाखविला व महराजांना तें पटलें म्हणजे 'विठ्ठल' असें दर्शवीत. व्यवहारांत आपण जसें 'हं' ह्मणून म्हणतों तद्वत्.

**'विठोबा'**—घरचा यजमान किंवा वडील पुरुष, वयोवृद्ध पुरुषास "विठ्ठल विठोबा" म्हणत.

**'पांडुरंग'**—ईश्वर नामांतच या शब्दाचा उपयोग करीत.

**'जयपांडुरंग'**—मनाजोगें कांहींही काम झाल्याबद्दल शाबासकी दाखल अगर आनंदप्रदर्शक या शब्दाची योजना होत असे.

**'गोविंद'**—एक.

**'गोपाळ'**—दोन.

**'गोविंद गोपाळ'**—जोडी

**'गणपति'**—लठ्ठ. ' भीमाशंकर ' म्हणजे देखील लठ्ठ. अंतर इतकेंच कीं तो लठ्ठपणा कुरूप व हा लठ्ठपणा गणपतीप्रमाणें भव्य व सुंदर.

**'गोपाळकृष्ण'**—वस्तूचा लहानपणा दर्शविण्यांत याची योजना होत असे.

**' हरि '**—१ नामस्मरण. २ केवळ श्वास सोडतांना. ३ क्वचित दुःखोद्गार काढतांना हा शब्द उच्चारून श्वास सोडीत.

**' हरि नारायण '**—नामस्मरणार्थ हें नांव योजीत.

**'दत्तात्रेय'**—विद्याविहीन, कफल्लक, निर्धन, भिकारी, व्यापारांत बुड येणें.

**' मारुति '**—लहान व अविवाहित मुलगा, पैसा, लाडू.

**'बलभीम'**—पिळदार बांधा, तालिमबाज वगैरे अर्थी याचा उपयोग करीत. भोजन दर्शकही हा शब्द वापरीत परंतु त्यावेळीं उच्चार बलीम् असा अस्पष्ट होत असे.

**वारांचीं नांवें येणेंप्रमाणें:—**

सोमवार—शिवशंकर.
मंगळवार—जयजयराम.
बुधवार—विठोबा.
गुरुवार—दत्तात्रेय.
शुक्रवार—शिवशिव जयजयराम.
शनिवार—मारुति.
रविवार—नारायण.

उपरि निर्दिष्ट अर्थांशिवाय प्रसंगोपात्त निरनिराळया अर्थी त्या त्या नांवांची योजना होत असे. अर्थ धोरणास अनुसरून तत्काल लक्षांत येई. कोणालाहि दुःखांत पडलेलें पाहिलें कीं यांचें कोवळें मन फारच कळवळे व 'रामा,' 'रघुपते,' 'मारुते' असें मोठ्यानें बोलत. किंवा 'रामा,' 'हरेरामा' असें ह्मणून सुस्कारा टाकीत. कोणाचेंहि चांगलें झालेलें ऐकिलें किंवा साधी विचारपूस करितांना सर्वत्र कुशल आहेसें कळलें म्हणजे समाधानदर्शक ' जयराम ' किंवा 'रामराम' असे सावकाश व आनन्दित वृत्तीनें ह्मणत.

कोणाकडून त्रासदायक वर्तन झालें कीं 'शिव शिव' ह्या शब्दानें आपलें मनोगत व्यक्त करीत.

सारांश ही भाषा महाराजांनीं विवक्षित रीतीनें बसविली होती व ते इतके जलद बोलत कीं जणूं काय आपली व्यवहारांतीलच ही भाषा आहे असा भास होई व प्राकृतजनांस अल्पसायासानें ती समजत असे. इतकेंच नव्हे तर ही कर्णमधुर भाषा अशीच त्यांच्या तोंडून ऐकत रहावी अशी प्रबल इच्छा उत्पन्न होई. विशिष्ट व्यक्तीचें नांव वा क्वचित् प्रसंगीं न समजलेलें वाक्य पेनसिलीनें पाटीवर किंवा बोटानें जमिनीवर बालबोध लिपींत लिहून दाखवीत. या त्यांच्या स्वनिर्मित भाषेंत ते उदाहरणें सोडवून मुलांना समजाऊन देत असत हें प्रकरणारंभीं आलेलें आहेच. ह्या विषयांतहि त्यांची गति होती अशाबद्दल भिवंडी येथील डॉक्टर त्र्यंबक बाळकृष्ण मराठे यांच्या वडील चिरंजिवानें स्वानुभवाची म्हणून हकीकत आम्हांस सांगितली. ते हल्लीं भिवंडी येथें तलाठी आहेत. त्यांस व त्यांचे सहाध्यायी मुलांस महाराज वेळोवेळीं उदाहरणें सोडवून सांगत.

महाराजांस सुरांचें देखील ज्ञान होतें. स्नानास किंवा जेवणास उठण्याची सूचना केल्यास ते चट्कन उठत नसत. नाकपुडीस हात लावून लहर लागल्यावर उठावयाचे. महाराजांना संस्कृत भाषेचेंहि ज्ञान होतें; पण तो भाग पुढें येणार आहेच. सारांशः—

" त्यांसी वेद विद्या विराजमान ।
ज्योतिष ज्ञान परिछिन्न ।
शास्त्रचर्चा पुराण श्रवण ।
घटित प्रश्न यथोक्त । १ ।
ॐ कार मंत्रशक्ति असाधारण ।
धर्मशास्त्रविचार परिज्ञान ।
नित्यानित्य विवेक संपन्न ।
अखंड विवरण अध्यात्माचें । २ ।
यमनियमेसी प्राणायाम ।
प्रत्याहार ध्यान धारणा निःसीम ।
आसनेसी समाधि संभ्रम ।
हे अष्टांगेसी निभ्रम साधन त्यासी ।

या लक्षणांनीं युक्त महाराज होते यांत संशय नाहीं.

प्रकरण ८ वें

# महाराजांची रहाणी.

आचारः प्रथमो धर्मो धर्मस्य प्रभुरच्युतः ॥ —विष्णु स. ना.

[ १ शरीर बांधा, आहार व कर्ममार्ग. २ पोषाख. ३ लहान मुलांवर प्रेम. ४ भाविक मंडळ व त्यांचा समागम. ]

महाराजांची शरीर काठी उंच होती. बांधा पिळदार असून कांति सुवर्णासारखी तेजस्वी होती. छाती रुंद होती पण हातपाय मात्र कमी जोरदार होते व त्यामुळें बाळपणीं यांना पांगळें समजलें जात असे.

मिताहार हें एक योगसाधनापैकीं साधन गणिलेलें आहे; पण जे स्वयंभू योगी असतात त्यांना अशा साधनांची अपेक्षा नसते. याचें उदाहरण महाराजांचे ठायीं दृष्टीस पडे. यांचा आहार चांगलाच असे. लहानपणापासून तों तरुणपणापर्यंत भाजी, आमटी, भात व गोड रुचकर पक्वान्नेंसुद्धां एकत्र कालवून जेवीत. वाढणें चालू असतां पुरे ह्मणून म्हणत नसत. जितकें पानावर वाढलें जाई तितकें सर्व खाऊन टाकावयाचें असा यांचा नियम होता; व पानांत शिल्लक असें कांहींसुद्धां टाकीत नसत.

या नियमामुळें एखाद्यानें अल्लडपणानें वाढलेलें अन्न संपविण्यांत त्यांना केव्हां केव्हां फार त्रास होई. हा नियम अलीकडे दहा वर्षें प्रकृतिमानामुळें सुटला होता, तरी पण यांचे समागमांत आहारासंबंधीं एक विशेष चमत्कार नजरेस पडत असे. अलिकडे ते स्वतः जरी मिताहारी झाले होते तरी ज्या ज्या वेळीं ह्यांच्या पंक्तीचा लाभ घेण्याची सुसन्धि येई तेव्हां बरोबर असलेल्या मंडळीस नित्यापेक्षां जेवण जास्त जात असे. आग्रह वगैरे न करितां सहज लीलेनें दुप्पट निदान दीडपट अन्न जात असे असा अनुभव आहे. व त्यामुळें कोणांस कसलाहि विकार होत नसे. विशेष स्मरणांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे महाराज गृहस्थाश्रमी नसल्यामुळें यांचें सारें आयुष्य जरी शिष्यवर्ग व भाविक मंडळीकडे गेलें तरी यांचें भोजन राजयोगास अनुरूप असें मोठ्या थाटाचें व उत्तम प्रकारचें असे. शिळें किंवा कमी दर्जाचें अन्न सेवन करण्याचा यांना कधींच प्रसंग आला नाहीं. यांना

फलांची फार आवड होती. त्यांतल्या त्यांत आंब्यावर विशेष भक्ति होती व हापूस खेरीज दुसऱ्या इतर जातीचे आंबे ते क्वचित खात. त्यांना शिवाय केळीं, संत्रें व सफरचंदें ही फळेंसुद्धां आवडत.

महाराज सदैव सहज समाधिस्थितींत असल्या कारणानें त्यांना नित्यकर्में ह्मणजे पूजा अर्चा वगैरे करण्याचें प्रयोजनच उरलें नव्हतें; तरी पण जनास वळण लावण्याकरितां केवळ हे संध्या करीत; नाहींपेक्षां यांची स्थिति खालीं वर्णिल्याप्रमाणें बनलेली होती.

" मृता मोहमयी माता जातो बोधमयः सुतः ।
उभयं सूतकं प्राप्तं कथं संध्या प्रवर्तते ॥ "

"आचारः प्रथमो धर्मः " म्हणून दोन्ही वेळचें जेवण हे सोवळ्यानें घेत व यांनीं आजन्मपर्यंत ब्राह्मण किंवा चांद्रसेनीय कायस्थ प्रभू ज्ञातीखेरीज कोणाच्याहि हातचें अन्न सेवन केलें नाहीं. हलवायाकडीलसुद्धां पेढे व बर्फी याशिवाय अन्य पदार्थांचें सेवन केलें नाहीं. इतकें करण्याचा हेतु इतकाच असावा कीं साधारण जनास वळण लागावें. कारण म्हटलेलें आहे—

" यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।"


भ. गी. ३. २१

संतांचें स्वतःचें नित्य नैमित्तिक बाह्य स्वरूपांत नसून अंतःस्वरूपांतच असतें व ते तें नेमानें आचरत असतात. यांचें जप, तप व याग सर्वच कांहीं वेगळें असतें.

ऐकाग्र्यं परमं तपः । ब्रह्माहमितिवैजपः ।
आत्मज्ञानी च सोमपः ॥

यांचें स्तंभन, मोहन, वशीकरण, उच्चाटण, संततिसंपत्ति वगैरे कांहीं विलक्षणच असतें. कसें तें पहाः—

जेथें जेथें वेदा पडलें मौन । यातें बोलती स्तंभन ॥
भक्तिभावें हरिमोहन । वशी करण तें इंद्रियांचें ॥ १ ॥
विषयापासोनि उच्चाटण । अहंकाराचे मारण ॥
फलश्रुतीची अन्तरखूण । गुह्य जाणा गुरुमुखें ॥ २ ॥




श्रीराममारुती महाराज ( संध्येच्या वेळचा फोटो )

पुत्रादिकांची प्राप्ति होती । बोधपुत्र तो जाणा चित्तीं ॥
दिव्य कन्या क्षमा शान्ति । फलश्रुति हे जाणावी ॥ ३ ॥
साध्वीदारा स्वानुभूति । विमल ज्ञानाची सम्पत्ति ॥
ऐशा अनेक फलश्रुति । गुह्य असती वेदांच्या ॥ ४ ॥

असा वेदप्रमाण ज्यांचा कर्ममार्ग ते बाह्य कर्मांचा खटाटोप करतील तरी कशाला ?

२ महाराजांचे ठायीं तीव्र वैराग्य होतें; परंतु बाह्य वर्तन एखाद्या राजयोग्याप्रमाणें होतें. पोषाखासंबंधीं पहातां तो साधापण उंची असे. बालपणीं अंगांत बंड्या व कोट घालीत, पण ते अंगांत कितपत टिकत हा मोठा गूढ प्रश्नच. कारण गरीब अनाथ मुलगा पाहिला कीं त्याला अर्पण व्हावयाचें. ज्याप्रमाणें मौल्यवान् कपडे वापरले त्याप्रमाणें मौल्यवान् दागिनेहि वापरले. कानांत पाणिदार मोत्यांची भिकबाळी, गळ्यांत गोफ, हातांत कडी व बोटांत आंगठ्या असत. सारांश यांचें लहानपण श्रीमंती थाटांत गेलें. तरुणपणीं देखील सद्गुरु समागमांत हा थाट कायमच होता. सद्गुरु ब्रम्हीभूत झाल्यावर मात्र सर्वच कांहीं फिरलें. भाषेचा त्याग केला व त्याबरोबर दागिन्यांचाहि त्याग केला. कपडे मात्र तात्पुरतेच घालीत. त्यानंतरचा पोषाख म्हणजे—डोकीला जरीकांठी रुमाल, अंगावर जरीकांठी उपरणें व नेसावयास उत्तम बारीक तलम सुताचें साधें शुभ्र कांठी धोतर. पायांत मऊ वहाणा ( जोडा घालीत नसत ) येवढाच काय तो पोषाख होता. हातांत छानदार पण साधी काठी घेत असत. ( फेटा ) रुमाल बांधण्याची तऱ्हा म्हणजे पाठीमागें एक हातभर लांब सोगा सोडलेला असे. धोतर कास मारून नेसत.

३ महाराज बालब्रह्मचारी होते. तेव्हां मुलांवर प्रेम कसें करितात ह्याची जाणीव त्यांना नव्हती असें वाटण्याचा संभव आहे. पण तसें नव्हे. त्यांना मुलें फार आवडत व त्यांचें मुलावर निरतिशय प्रेम असे. त्यांच्या बरोबर हांसणें, नाचणें, खेळणें, उड्या मारणें, वागडणें वगैरे वृत्तींत ते रंगून जात. महाराज मुलांवर प्रेम करीत पण मुलांना त्याची जाणीव होती काय ? ह्याचा विचार करणें अवास्तविक होणार नाहीं. महाराजांचें मुलांवर व मुलांचें महाराजांवर अन्योन्य प्रेम होतें ह्याबद्दल शेंकडों उदाहरणें देतां येतील परंतु विस्तार भयास्तव एकच अन्तिम उदाहरण दिलें तरी पुरे. महाराजांचें देहावसान झालें व अन्तिम

यात्रेची मिरवणूक कल्याण गांवांतून ज्या ज्या घरावरून गेली त्या त्या घरांतील समंजस मंडळी तर बोलूंच नका, पण लहान मुलें स्वतःच्या जिव्हाळ्याचें गेल्या प्रमाणें धाय मोकलू लागली. त्या वेळच्या प्रसंगाचें नुसतें स्मरण झालें तरी अजून भडभडून येतें व अक्रूर श्रीकृष्ण भगवंतास गोकुळांतून नेत असतां गोकुल-वासी जनांनीं जो विलाप केला त्या प्रसंगाचें चित्र डोळयांपुढें उभें रहातें एवंच संतांच्या प्रेमाची छाप लहान मुलांवर देखील एवढी बसते हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. कदाचित् कोणी अशी शंका काढील कीं महारा-जांनीं मुलांस खाऊ वगैरे देऊन हें प्रेम संपादन केलें असेल तर तशांतील प्रकार मुळींच नव्हता. दर्शनोत्सुक मंडळी त्यांच्या समोर फळफळावळ व मेवा मिठाई ठेवीत पण त्यांतून मुलांस व इतरांस वांटून देण्याची गोष्टच नको. मनांत आल्यास महाराज त्या वस्तूंपैकीं वाटेल तें खात, त्या वेळीं आपल्यासमोर मुलें व इतर असामी बसले आहेत ह्याची त्यांना कल्पना देखील शिवत नसे. त्यांचें खाणें चाललें असताना व त्या वेळच्या हाताच्या बोटांचा लवलवितपणा, तोंडाची मारुतीप्रमाणें आकृति, मिटक्या मार मारून खाण्याची रीत व तोंड वेडेंवाकडें करणें वगैरे प्रकार पाहून उलट फार मौज वाटे. विशेषतः भुइमुगाच्या शेंगा, मक्याचीं कणसें, उंसाचीं कांडीं व सफरचंदासारखीं भरींव फळें खातांना त्यांचे वर निर्दिष्ट केलेले अंगविक्षेपाचे प्रकार तर हुबेहुब हनुमानाप्रमाणें दिसत असत. भरींव फळें कापून न खातां दातांनीं तोड तोडून खाण्यांत त्यांना मौज वाटे. सारांश "**न खलु बहिरुपाधीन् प्रीतयः संश्रयंते**" ह्या संस्कृतोक्तीप्रमाणें मुलांचें महाराजांवर निष्काम प्रेम होतें. बालपणीं अंतःकरण शुद्धच असतें व त्यांत संगतीही

**अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ । याचे गळा माळ असो नसो ॥ १ ॥**

अशा सत्पुरुषाची मग तेथें प्रेमाचा सुकाळ कां नसेल ?

४ मुलांप्रमाणें पूर्व संस्कारानुरूप महाराजांच्या समागमांत आलेल्या मंड-ळींच्या ठिकाणीं त्यांनीं प्रेम बसवून ठेविलें आहे. महाराजांस पूज्य भावानें मानणारी भाविक मंडळी अजून सर्व जातीमध्यें आहे. व ही एकदेशीय नसून ठिकठिकाणीं ह्मणजे भिवंडी, कल्याण, ठाणें, दादर, मुंबई, पनवेल, उरण, पेण, अलिबाग, नागोठणें, महाड, रोहें, माणगांव, कर्जत, बडोदें, श्रीवर्धन, मुरुड, नागपूर वगैरे गांवीं आहेत. ज्यांचा ज्यांचा महाराजांशीं परिचय झाला ते खरोखर भाग्यशाली

होत. यांचे रजःकण ज्या ज्या घरीं लागले त्या त्या घरीं ईश्वरोपासना, भजन, कीर्तन वगैरेबद्दलची कायमची आवड उत्पन्न झाली आहे. ही आवड उत्पन्न होऊन तेथेंच न थांबतां तिचें रूपान्तर नित्य नामघोषांत झालें आहे.

कित्येक होते बद्ध प्राणी । ते नाना साधनीं लावुनी ॥
कित्येक मुमुक्षुप्राणी । सिद्धचि करूनि ठेविले ॥ १ ॥
अनुग्रह मात्रें ब्रह्मसंवित्ति । जडजीवा झाली मोक्षप्राप्ती ॥
नाम मात्रें कित्येक तरती । महादोषी होती जीवन्मुक्त ॥ २ ॥

अशा रीतीनें गुरुपदास साजेसें धर्मजागृतीचें कार्य करून भक्तमंडळीमध्यें महाराजांनीं नामस्मरणाचा रोपा रुजविला.

यांची वृत्ति फार शांत असे. प्रसंगीं राग आल्यास ते इतके उग्र दिसत कीं जवळची मंडळी भीतीनें गडबडून जाई. पण ही वृत्ति क्षणिक असे. महाराजांना कीर्तीचा तिट्कारा असे; व आपली कीर्ति न होईल अशी खबरदारी घेऊन ते जन-कल्याणाचें उद्दिष्ट कार्य साधण्यांत फार दक्ष असत.

" परि वेडिवेमाजि दडे । महिमे भेणें ॥ "

अशी त्यांची वृत्ति असे.

मूर्ति तितक्या प्रकृति हें तत्व लक्षांत ठेऊन जो मनुष्य समोर येईल त्याचा विक्षेप न होतां त्याच्या अधिकारानुरूप त्याच्याशीं बोलून ईश्वरोपासनेकडे व नामस्मरणाकडे त्याचें मन वळविल्याखेरीज रहात नसत. चोवीस तासापैकीं थोडा वेळ तरी नामस्मरणांत घालवावा हा त्यानीं केलेला उपदेश किती उच्च दर्जाचा व आनंददायक आहे.

" यया आठां पाहारा माझारीं ।
मोटकें निमिष भरी । देतु जाय ॥
मग जें जें कां निमिख । देखेल माझें सुख ।
तेतुलें अरोचक । विपयीं घेईल ॥ " ज्ञा. १२–९–१० ५.

असा भगवान् ज्ञानदेवाचा ही उपदेश आहे.

महाराज पारमार्थिक विषयांवर चर्चा करूं लागले कीं कोणाची कसलीही शंका असली तरी विलंब न लावतां तिची निवृत्ति करीत व त्यांचेबरोबर बोलण्यांत मंडळीसहि फार प्रेम वाटे. अशा वेळीं थट्टा मस्करी करून हंशा पिकवून मनें रंझ-वून बोलण्याचा ओघ ठेवीत.

## प्रकरण ९ वें

# अवतार–महिमा

तुझ्या समचि हें गुणें अणु उणें नसे नाम हा।
दिसे अधिकही तसा गुण तुला असे ना महा ॥ ( केका )
नामाचे या सहस्रवरी । नावा इया अवधारीं ।
सजूनियां संसारीं । तारूं जाहलों ॥ ज्ञाने० १२–९०

[ १ श्रीसमर्थ रामदासस्वामीप्रमाणें नाम-महिमा वाढविला. २ भजनमार्गानें भक्तिप्रसार ३ महाराजांचे ठायीं पूर्ण वैराग्य. व अगाध ज्ञान ४ महाराजांचा अवतार–महारुद्र मारुतीचा किंवा नाथापैकीं–याबद्दल विवरण. ]

१ सोळावे शतकाचे सुमारास गोब्राह्मणप्रतिपालक श्रीछत्रपति शिवाजी महाराज व धर्माला उज्ज्वल स्वरूप देणारे श्रीरामदास समर्थ यांचे अवतार झाले व त्यांचे खांद्यास खांदा भिडवून उद्दिष्ट कार्य शेवटास नेण्यास सहायकारी ह्मणून चांद्रसेनीय कायस्थ प्रभू ज्ञातींत बाळाजी आवजी चिटणीस, सरदार बाजी प्रभू देशपांडे, मुरार बाजी देशपांडे वगैरे वीररत्नें जन्मास आलीं व त्यांनीं त्या अवतार.मूर्तिद्वयाच्या समागमांत आपलें नांव इतिहासांत अमर करून ठेविलें.

ईश्वर कृपेनें हें सत्पुरुष रत्नहि त्या ( देशपांडे ) कुळांत निर्माण होऊन उपरिनिर्दिष्ट वीर रत्नाप्रमाणें श्री समर्थांच्या पारमार्थिक कार्यास नेटानें पुढें चालविण्याकरितांच जणूं अवतीर्ण झालें.

श्रीरामदासस्वामी हा महारुद्र मारुतिरायाचा अवतार असून त्यांनीं ठिकठिकाणीं मठ स्थापिले व गांवोगांवीं मारुतीचीं देऊळें बांधिलीं. तसेंच कथा कीर्तनें व भजनसंप्रदाय सुरू करून रामनामाचा महिमा वाढविला तो इतका कीं हें रामनाम शूद्रातिशूद्रापर्यंत त्यांनीं नेऊन पोहोंचविलें. खालच्या वर्णांत पूर्वीं एकमेकांची भेट होतांच "जोहार"—जय हरि या शब्दांचा अपभ्रंश–ह्मणण्याचा प्रघात असे तो बदलून श्रीसमर्थांनीं "राम राम" ह्मणण्याचा धडा घालून दिला व तो यावच्चंद्रदिवाकरौ चालेल असें मानण्यास हरकत नाहीं. कारण नामाचा महिमाच तसा आहे व विशेषतः कलियुगांत तरी तो फार तारक आहे. ह्मटलेंच आहे कीं,

ध्यायन्कृते यजन्यज्ञैस्त्रेतायां द्वापरेऽर्चयन् ।
यदाप्नोति तदाप्नोति कलौ संकीर्त्य केशवम् ॥

तुलसीदास रामायणांतहि यासंबंधीं उल्लेख केला आहे कीं:—

कृत जुग सब जोगी विज्ञानी । करि हरि ध्यान तरहिं भवप्रानी ॥
त्रेता विविधजज्ञ नर करहिं । प्रभुहिं समर्पि करम भवतरहीं ॥
द्वापर करि रघु-पति-पद-पूजा । नर भवतरहिं उपाउ न दूजा ॥
कलिजुग केवल हरि-गुन-गाहा । गावत नर पावहि भव थाहा ॥
कलिजुग जोग न जज्ञ न ज्ञाना । एक अधार राम-गुन-गाना ॥
सब भरोस तजि जो भज रामहिं । प्रेमसमेत गाव गुनग्रामहिं ॥
सोइ भवतर कछु संसय नाहीं । नाम प्रताप प्रगट कलिमाहीं ॥
कलिकर एकपुनीत प्रतापा ! । मानस पुन्य होइ नहिं पापा ॥

यावर वामन पंडित काय म्हणतात तें क्षणभर पाहूं.

" गाऊनियां मधुर हें हरिनाम नाचा ।
पाहीं मग श्रम कसा हरि ना मनाचा ॥
तत्रापि कीर्तनचि मुख्य कलौ करीतो ।
होतो तया प्रकट तारक लोकरी तो ॥

समर्थांनीं हें रामनामाचें बीं पेरिल्यावर त्याचा रोपा वाढविण्याकरितां श्रीसमर्थांच्या अवतार समाप्ती नंतर कांहीं संत होऊन गेले. पुढें हा रोपा वृद्धि पावून वृक्ष रूपास आला व फोफावण्याकरितांच जणूं काय वर दाखविलेल्या पूर्व संबंधानुरुप पावणे दोनशें वर्षांनीं आपल्या महाराजांचा अवतार झाला. कडकडीत ब्रह्मचर्य व राम नामाचा प्रसार ह्या दोन गोष्टींत तरी प्रथम दर्शनीं श्रीसमर्थांचें व श्रीराममारुतींचें साम्य दिसून येतें.

श्री राममारुतीचा अवतार नामस्मरणाचा महिमा वाढविण्याकरितां होता असें जरी आहे तरी प्राकृत जनांच्या समजुतीप्रमाणें तितकेंच मर्यादित ते अवतार कार्य होतें असें म्हणणें केव्हांही असमंजसपणाचें होईल. श्री समर्थ रामदास यांच्या धर्मजागृति या तत्वांतूनच राजकारणासारखीं कार्यें होऊन सिद्धीस गेलीं. सारांश संतमहिमाच असा आहे कीं त्याच्या एकदेशीय, दिसणाऱ्या बहुमोल उपदेशांत नाना प्रकारच्या कार्यांचा समावेश झालेला असतो. या वाहत्या

नदीच्या पाण्याचा उपयोग सुज्ञ बागवानानें गुलाब, मोगरा वगैरे सुवासिक फुलझाडें करण्याकडे मात्र केला पाहिजे. प्रत्यक्ष समागमापासून हे लाभ मिळतील यांत नवल तें काय परंतु **एकलव्य** नांवाचा कोळी भक्तिभावानें गुरुप्रतिभा पूजा करून गुरूची रहस्यविद्या पावला ही भारतांतील कथा सर्व श्रुतच आहे. सारांश—

> सामर्थ्य बहुत अथवा थोडे । हे धर्म तों उपाधीकडे ॥
> परब्रह्मीं हें न घडे । महाशक्ती निष्क्रिया ते ॥

हाच संतप्रभाव भजन मार्गानें भक्तिप्रसार करण्यांत गर्भित असतो व तो संतसमागमानेंच सुसंस्कृत जनास प्राप्त होत असतो.

२ महाराजांनीं भजन मार्गानें ईश्वरभक्ति करण्याचें साधन जनाच्या मनावर चांगलेंच बिंबवून दिलें. प्रकरण ४, ध्यारा ३ मध्यें यांची भजनांतील वृत्ति कशी असे याचें वर्णन आलें आहे. अशी वृत्ति पाहिल्यावर आपणांसहि तदाकार कसें होतां येईल अशी मंडळीस उत्कंठा लागे. व त्यांनीं दाखविलेला भजनमार्गच तारक आहे अशी दृढ भावना ठेऊन भाविकजन भजनांत तल्लीन होत. पंतोजी ज्याप्रमाणें मुलांदेखत फळ्यावर खडूनें उदाहरण सोडवितो, त्याप्रमाणें भजनानें कशी तन्मयता होते व ईश्वरप्रेम कसें दृढावतें हें आदर्शाप्रमाणें स्वच्छ पाहिल्यावर तोच मार्ग तात्काल स्वीकारण्यास भाविकजन उद्युक्त होणारच.

> " बोले तैसा चाले । त्याचीं वंदावीं पाउलें ॥ "

या तुकोबांच्या उक्तीची सत्यता पटविल्यावर त्या ठिकाणीं शंका न राहतां भाविक जनसमूह आपोआपच अशा सत्पुरुषाचें अनुकरण करितो. सत्पुरुषांचे बोल व कृती ह्या रोकड्या फलदायी असतात व त्याप्रमाणें महाराजांनीं भजनानें सत्यता पटविली होती.

"हें भजन व ही तन्मयता," "हें मनन व हें सगुणरूप दर्शन," "हा निदिध्यास व हा ब्रम्हाहमस्मि भाव" ह्या खुणा पटवून देण्याचें ज्यांच्या अंगांत सामर्थ्य त्यांनीं जो ईश्वर नामाचा मार्ग दाखविला तो श्रेष्ठ मार्ग कोण चोखाळणार नाहीं ? अधिकारानुरूप पुढील मार्गहि भाविक शिष्यमंडळीस दाखविण्याची महाराजांनीं कृपा केली, परंतु त्यांचा सर्व जोर नामस्मरण व भजन कीर्तन यावर असे.

तरी कीर्तनाचेनि नटनाचें । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्ताचे ।
जे नामचि नाहीं पापाचें । ऐसें केलें ॥

ज्ञा० ९, १४—१९७.

३ महाराज पूर्ण वैराग्यशील होते; कोणाजवळ कांहींसुद्धां मागत नसत. पैसा किंवा वस्त्र जरूरीपुरतें घेत. व भोजनसमयीं जे पदार्थ पुढें येतील ते आनंदानें स्वीकारावयाचे असा त्यांचा नियम असे. पदार्थांत कमी अधिक मीठ किंवा इतर मसाला असला तरी ते पूर्ण आदरानें खात असत.

"अन्नं न व्याचक्षीत—अन्नं वै विष्णुः" उपनि.

हें तत्व त्यांच्या ठायीं पूर्ण विंबलें होतें. या वैराग्याबरोबर दुसराहि योग असा होता कीं त्यांस कधींही कदन्न खाण्याचा किंवा हलकें वस्त्र वापरण्याचा प्रसंगच आला नाहीं.

महाराज सहज समाधि स्थितींत असत हें मागें आलें आहेच; व अशा स्थितींत असतांना कोणी कोणत्याही क्षेत्राची वा स्थलांची—मग तीं स्थळें हिन्दुस्तानांतील असोत वा बाहेरील असोत—विद्यमान व ब्रह्मीभूत साधुसंतांचीं किंवा अन्यपक्षीं एखाद्या साधारण व्यक्तीची माहिती विचारल्यास तत्संबंधीं सर्व वर्णन साद्यंत सांगत. तसेंच शास्त्रज्ञ मंडळीकडून कांहीं शंका विचारण्यांत आल्या तर त्यांचें निराकरण विलंब न लावितां करीत. जवळ पाटी पेन्सील असेच, व वरीलपैकीं शंकेचें विशेष स्पष्टीकरण करणें झाल्यास त्या लेखनसाहित्याचा उपयोग करीत.

संतांच्या वर्णनांतील कांहीं कांहीं विशिष्ट गोष्टी पुरातन काळच्याहि असत ह्मणजे शंभर शंभर, दों दोनशें किंबहुना जास्त वर्षांपूर्वीच्या असत व ग्रंथाधारें पहातां त्या तंतोतंत पटत.

त्यांच्या ज्ञानाविषयीं अगदीं अलीकडे घडलेली गोष्ट सांगतों. एकदां मुंबईतील पाठारे प्रभू ज्ञातींतील ब्यारिस्टरांस महाराजांची हकीकत कळली व ते चालू भाषेंत न बोलतां ईश्वरनाम भाषेत चर्चा करितात याचें त्यांना विशेष वाटलें. महाराजांच्या अगाध ज्ञानाबद्दल त्यांच्या मनांत क्षणैक ,सुद्धां कुकल्पना आली नाही. फक्त भाषेवांचून—शब्दांवांचून—चर्चा होते कशी याचें आश्चर्य वाटलें. अतएव महाराजांचें दर्शन घेण्याचें ठरवून महाराज दादरास होते तेथें आले. येतांना जाण्याची गाडीहि ठरवून आले होते. ते येतांच महाराजांच्या चरणावर

मस्तक ठेऊन बसले. आलांत कोठून ? काय निमित्तानें आलांत वगैरे महाराजांनीं प्रश्न विचारले. तेव्हां आपल्या मुखांतून कांहीं श्रवण करण्यास मिळावें हा हेतु मनांत वागवून आपल्या दर्शनास आलों आहेंसें सांगतांच बोलण्याचा ओघ बदलून पारमार्थिक विषयांवर बोलण्यास प्रारम्भ झाला. इतक्या अवधींत ब्यारिस्टरांच्या ध्यानांत महाराजांची ईश्वर-नाम-भाषा किंचित् किंचित् येऊं लागली होती. विषय पारमार्थिक "अमृताहुनि गोड " असा असल्या कारणानें बोलण्याच्या भरांत आपली ठरविलेली गाडी केव्हांच निघून गेली व संध्याकाळ झाली हें त्यांच्या लक्षांत देखील आलें नाहीं. मग कष्टानें महाराजांची रजा घेऊन ते परतले. ह्यानंतर दैववशात् महाराजांचा पुनश्च दर्शनयोग आला नाहीं म्हणून त्यांना अजून वाईट वाटत आहे, व महाराजांविषयीं बोलतांना त्यांची सर्वज्ञता, त्यांचा प्रेमळपणा, व त्यांची विषयप्रतिपादनाची शैली हे व इतर गुण आठवून त्यांच्या डोळ्यांला पाणी येतें. संतांचा समागमच असा आहे कीं तो किंचित्काल जरी झाला तरी स्मरणीयच राहील यांत नवल नाहीं; कारण म्हटलें आहे:—

> " हरि नामसे सब माया भूल ।
> सत्संगसे देखे आपहि आपना मूल ॥ "

महाराजांच्या अंगीं केवढी शक्ति होती हें पुढील हकीकतीवरूनहि ध्यानांत येईल. एकदां प्रसिद्ध श्री साधु गोदडेबुवा यांचे शिष्य कीर्तन करण्याच्या उद्देशानें कल्याणास आले. कांहीं खासगी कारणानें कीर्तनास प्रारंभ होण्यापूर्वी त्यांच्या वृत्तींत क्रोधाची झुळुक आली व त्यामुळें कीर्तनास आवश्यक अशा शुद्ध सात्विक वृत्तींत तमाचे मिश्रण झालें व कीर्तनास कांहीं केल्या रंग येईना. श्रोतृसमुदाय बराच ७-८ शेंपर्यंत होता. त्यांत महाराजहि होते. त्यांच्या नजरेस हा सर्व प्रकार पडला. "कृपाळु सज्जन तुह्मीं संत जन" अशा कोटींतील ते, त्यांनीं लागलेच भुःभुःकार करून उड्डाण केलें मात्र तों तात्काल त्या कीर्तनकार शिष्याच्या वृत्तींत फरक दिसूं लागला व कीर्तनविषय मंडळीपुढें योग्य रीतीनें पद्धतशीर सुसंगत असा मांडला गेला व कीर्तन वर्णनीय झालें. कीर्तन समाप्ति झाली व मंडळी शिष्याच्या ज्ञानाची व गुणाची प्रशंसा करीत घरोघर गेली. कीर्तन २ वाजेपर्यंत झालें. त्या शिष्यानें तो सर्व प्रकार पूर्णपणें ओळखून बिन्हाडीं जाऊन महाराजांचें दर्शन घेतलें व आपली लाज राखल्याबद्दल गहींवरून त्यांच्या चरणीं विलीन झाला.

असेंहि घडत असे कीं केव्हां केव्हां मंडळी महाराजांच्या दर्शनास येत ती केवळ महाराजांची परीक्षा पहाण्याच्या उद्देशानें येत. अशा वेळीं ते विशेष आनंदमय वृत्तींत दिसत व समोरील मंडळी बरोबर विशेष सलगीनें बोलत. बोलणें चालू असतां प्रचीति पहाण्यास आलेल्या मंडळीस अशी कांहीं अचूक खूण पटवीत कीं आश्चर्यचकित होऊन ती स्तब्धच बसत. असल्या मंडळीची वृत्ति तुकोबारायानें वर्णन केल्याप्रमाणें उंबरांतील कीटकाची असते. तुकोबा महाराज ह्मणतातः—

उंबरांतील कीटका। हेंचि ब्रह्मांड ऐसें लेखा॥
ऐसीं उंबरें किती झाडी। ऐसी झाडें किती नवखंडी॥
हेंचि ब्रह्मांड आह्मांसी। ऐसी अगणित अंडे कैसी॥
विराटाचे अंग तैसें। मोजूं जातां अगणित केश॥
ऐशा विराटांच्या कोटी। साठवल्या ज्याच्या पोटीं।
तो हा नन्दाचा बाळ मुकुंद। तान्हा ह्मणवी परमानन्द॥

अशा ईश्वररूपी संतजनांपुढें साधारण अहंकारादि वृत्तीनें फुगलेल्या मानवांचा काय टिकाव लागणार? मूळस्वरूप व अंश यांत तरी भेद आहे कोठें? कारण

आदम खुदा नहीं। खूदाके नूरसे आदम जुदा नहीं॥

याप्रमाणें संत व ईश्वर यांमध्यें भेद आहे तरी कोठें?

कांहीं विवक्षित पदार्थ मागणें व तितकाच-केवळ तितकाच-घरांत असणें किंवा बाजारांत तो अनपेक्षित रीतीनें मिळणें वगैरे गोष्टी महाराजांच्या समागमांत घडलेल्या नजरेस येत. परंतु त्याजबद्दल ऊहापोह करून कीर्ति वाढेल असें करीत नसत; उलट विषयांतर करून त्या घडलेल्या गोष्टीचें विस्मरण करवीत. त्यांच्या ठायीं वसत असलेल्या अंतर्ज्ञानाबद्दल अनेक गोष्टी नमूद करण्यासारख्या आहेत. त्यांपैकीं एकच नमूद करून त्यांच्या अवतारनिर्णयाकडे वळूं.

शके १८३२ त महाराज शिरडी येथें श्रीसांई महाराजांकडे गेले असतां कल्याणचे रा. त्र्यंबक आनंदराव कर्णिक हेदेखील तेथें दर्शनास आले होते. कर्णिक हे श्रीसांईबाबांच्या शिष्यांपैकीं असल्या कारणानें दर्शन घेऊन नित्याप्रमाणें जवळ बसले. श्रीबाबांनीं त्यांना ईशावास्योपनिषदाचें त्रिकाल पठन करीत असावें व त्याचेंच श्रवण, मनन व निदिध्यास चालू ठेवावा अशाविषयीं आज्ञा केली. महाराज बाबांजवळ

असल्या कारणानें ही वरील आज्ञा त्यांनीं ऐकिली होती, व तें त्यांच्या लक्षांत होतें. पुढें महाराजांचा मुक्काम कल्याणास असतां हे त्यांच्या दर्शनास जात व त्यामुळें त्यांच्या गांठी पडत. पुढें १८४० त रा. कर्णीक दर्शनास आले असतां १८३२ सालच्या गोष्टीचें स्मरण देऊन महाराजांनीं रा. कर्णिकांस विचारिलें कीं श्रीबाबांच्या आज्ञेप्रमाणें ईशावास्योपनिषदाच्या पाठाबद्दल काय प्रयत्न चालला आहे वगैरे. त्यावर रा. कर्णीक उत्तरले कीं तो उपक्रम चालू आहे परंतु निदिध्यासास मदत व्हावी एतदर्थ त्याचें मराठींत समश्लोकी वृत्तांत रूपांतर करून मननाचा प्रयत्न चालू आहे. तें रूपांतर श्री. नानासाहेब चांदोरकरांकडे अभिप्रायार्थ धाडिलें आहे, तें आपणा दोघां समक्ष वाचून विचारांत घेऊं असें मला त्यांनीं लिहिलें आहे. माझ्या मतें हें रूपांतर समाधानकारक झालें नाहीं तर आपली कृपा दृष्टि त्यावरून फिरवून मनास पटेल असें सुधारून द्यावें. महाराजांनीं घेऊन येण्यास सांगितलें, त्याप्रमाणें तें सुधारून रा. कर्णिकांकडे दिलें व याचें मनन करून निदिध्यास लावून घे अशी आज्ञा केली. रा. कर्णिकांनीं ती आज्ञा शिरसावंद्य करून सुधारलेली प्रत आपल्याजवळ ठेविली.

शके १८३३ पासून १८४० पर्यंतच्या सात वर्षांत महाराजांस ह्या गोष्टीचें स्मरण कसें तें झालें नाहीं, परंतु अवतारसमाप्तीच्या समयीं मुद्दाम स्मरण करून समश्लोकी सुधारून स्वाधीन केली. याबद्दल रा. कर्णिकांस सादर अभिमान वाटत आहे व भाविक तज्ज्ञ जनांना पहाण्यास मिळावी म्हणून या चरित्रांत प्रसिद्ध व्हावी अशी त्यांची इच्छा असल्यामुळें ती खालीं समग्र दिली आहे.

॥ श्रीईशावास्योपनिषत् ॥

## मराठी समश्लोकी.

ॐ नमोजी महाराज । साइबाबा रमावर ॥
आनंद सच्चिदानंद । श्रीराम सद्गुरू शिव ॥
ज्ञान एक राम नाम । तुका श्रीराम मारुति ॥
सद्भाव दाविती ईश । नमीतों साच अंतरीं ॥
श्री ईशावास्योपनिषत् । वेदांतर्गत एकही ॥
यजुर्वेदी वाजसेनी । संहितोपसंहार हो ॥
आत्मानुभव सूत्रात्री । वेदान्तसार ही श्रुती ॥

सोपान मोक्ष कैवल्या । भवसागर नावसी ॥
वेदान्त गूढ त्याहून । भाषा वेदीय संस्कृत ॥
दुर्बोध, सुगमार्थाचें । मराठी रूप हें असे ॥
ॐ पूर्ण तें पूर्ण हें पूर्ण । पूर्ण पूर्णांतुनी निघे ॥
पूर्णांतुनी पूर्ण घेतां । उरे तो शेष पूर्णच ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्ति ॥
ईशाचें वसतिस्थान । सर्व जें या जगीं जगे ॥
या त्यागें भोगि वांछीना । कोणाचें धन हें असो ॥ १ ॥
कर्मेंच करुनी इच्छी । जगाया शतमान तो ॥
तुझे ठायीं न हें गैर । न कर्म डाग हे नरा ॥ २ ॥
आसूर लोक घोरां घे । व्याप्त नासूर्य नांव त्या ॥
प्रेतत्वें येति येथें ज्या । श्रद्धा ही आत्मतत्त्विना ॥ ३ ॥
तें स्थीरही चपल एक मनाहुनी तें ।
कोणासही मिळतना च पुढें असे तें ।
सर्वांपुढें पळत जाउनिही उभें तें ।
ब्रह्मांड व्यापि तयि वायुच धारि कृत्यें ॥ ४ ॥
हाले न हालतें तेंच । जवळीं दूर तेंच हो ।
सर्वांतरींच तें ऐसें । सर्वबाह्यहि तेंच तें ॥ ५ ॥
आत्मतत्त्वीं सर्वभूतें । पाहे स्वानुभवें अशा ।
सर्वभूतीं आत्मतत्त्व । असे हो नच संशय ॥ ६ ॥
ज्या ठायीं आत्मवत्सर्व । भूतें विज्ञान हो असे ।
त्या मोहशोक हा कैंचा । ऐक्यानुभविं दंग तो ॥ ७ ॥
तो सर्व व्यापूनि विदेहि स्वच्छ ।
नाड्या व्रणें पाप न त्यास शुद्ध ।
त्रिकालज्ञानीहि स्वयंभु स्वैर ।
यथार्थ दे शाश्वत कालचक्र ॥ ८ ॥
घोरांधारीं शिरती जे । देहप्रपंच सेविती ।
अंधारीं आणखी तैसे । वेदव्यासंग हाच ज्या ॥ ९ ॥
वेदें ना योग्यता तैसी । प्रपंचें नच योग्यता ।

सद्गुरू बोलले तेच । स्पष्ट हे तेच बोल हो ॥ १० ॥
वेद प्रपंच या दोघां । ज्ञान जोडोनि साधितां ।
प्रपंचें तरुनी मृत्यू । वेदें सेवील अमृत ॥ ११ ॥
घोरांधारीं शिरती जे । लयें शून्यत्व शोधिती ।
अंधारीं जास्त तैसे जे । सृष्टिसंभव शोधिती ॥ १२ ॥
संभवे योग्यता नाहीं । लये तों योग्यता नसे ।
सद्गुरू बोलले तेच । स्पष्ट हे तेच बोल हो ॥ १३ ॥
संभव लय या दोघां । ज्ञान जोडोनि साधितां ।
लयें तरुनि मृत्यूतें । संभवें सेवि अमृत ॥ १४ ॥
हेममय घटन्यायें । सत्याचें तोंड झांकलें ।
सद्गुरू दावि तें तूंच । सद्धर्मदृष्टि कारणें ॥ १५ ॥
हे श्रीसद्गुरु तारका यमनियम्या एक संचारका ।
ज्ञानें फांकुनि तेज आवरि करा ज्ञानार्क ब्रह्मात्मका ।
तूझें रूप अती सुमंगल असे कल्याणसें पाहतों ।
जो तो हा पुरुष स्वयेंच नटला विश्वार्थ मी होइ तो ॥ १६ ॥
वायू अमृतसूत्रात्मा । भस्मांत देह हा असे ।
ॐ यज्ञास्मर कृतकर्म । स्मर यज्ञाकृत स्मर ॥ १७ ॥
गुरो अग्निनेया सुमार्गें सुकर्मा ।
मला तूंच रे ज्ञानवान्सर्व वर्मा ।
लया नेइं माझ्यांतुनि नीच पापा ।
अनन्ता नमो या वचें गाउ बापा ॥ १८ ॥
श्रीसद्गुरु कृपा पूर्ण । पूर्ण श्रीराम तारक ।
अखंड करी जप त्या । कैवल्यमोक्ष पूर्णच ॥
शुभं भवतु । ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।

वरील समश्लोकी पाठवितांना रा. कर्णिक लिहितात कीं:—"महाराज पूर्ण ज्ञानी असल्यामुळें त्यांच्या ज्ञानाचा अंत लागणें शक्य नाहीं यापेक्षां या पामरानें काय बोलावें. शिरडी येथें साई बाबांच्या दरबारांत आपण हजर असतां बाबा आपणांशींच बोलत होते. ते बोलणें कोणासहि उद्देशून असें नव्हते. महाराजांनीं

मला बाबांचें तें सर्व बोलणें भागवत धर्माचा आधारस्तंभ असे जें चतुःश्लोकी भागवत याचें निरूपण होतें असें बजाविले. नंतर महाराज कल्याण येथें आमच्या घरीं आल्यावर माझ्या हस्तें श्री एकनाथ महाराज कृत प्राकृत चतुःश्लोकी भागवतांतील मुक्य आठ श्लोकांचे अनुष्टुप छंदांत रुपांतर समश्लोकी लिहून घेतली व साई बाबाच्या त्या बोलण्याचा मेळ या समश्लोकीशी तंतोतंत मिळवून दाखविला. ही समश्लोकीहि तज्ज्ञ जनांचें अवलोकनांत यावी या हेतूनें तीहि या सोबत पाठविली आहे. ”

## ॥ श्रीमच्चतुःश्लोकी भागवत संहिता व मराठी समश्लोकी ॥

ॐ ॥ यदंघ्रिकमल द्वंद्व । द्वंद्व ताप निवारकं ॥
तारकं भवसिंधौ च । श्रीगुरुं प्रणमाम्यहं ॥
जे पद पद्मसे दोन । द्वैत संताप हारक ॥
भवाब्धि पार नेणार । तो—मी सद्गुरु वंदितो ॥

### भगवान उवाच

ज्ञानं परम गुह्यंमे । यद्विज्ञान समन्विता ॥
स रहस्यं तदंगंच । ग्रहाण गदितं मया ॥
भगवान ह्मणे माझे । ज्ञानानुभव युक्त हे ॥
सर्वांग पूर्णसे गूढ । गुह्य घे बोलतो मि हे ॥
यावानहं यथा भावे । यद्रूप गुणकर्मकः ॥
तथैव तत्व विज्ञान । मस्तुते मदनुग्रहात् ॥
मी-तो असा जसा भाव । जें रूप गुण कर्मक ॥
तत्वानुभव तें साच । तूंतें हो माझिये कृपें ॥
अहमेवा समे वाग्रे । नान्यद्यत्सदसत्परम् ॥
पश्चादहं यदेतच्च । योऽवशिष्येत सोऽस्म्यहं ॥ १ ॥
मी असे आदि ते सत्य । मिथ्यापर न जे दुजे ॥
मग जें हें असें तो मी । मी तोच शेष होतसे ॥ १ ॥
ऋतेऽर्थं यत्प्रतीयेत । न प्रतीयेत चात्मनि ॥
तद्विद्यादात्मनो माया । यथा भासो यथा तम ॥ २ ॥
अधिष्ठानें प्रत्यया ये । आत्मी जे ये न प्रत्यया ॥

जाणावी आत्म माया ही । न सूर्य तम हो जसा ॥ २ ॥
यथा महांति भूतानि । भूतेषूच्चावचेष्वनू ॥
प्रविष्टान्य प्रविष्टानि । तथा तेषु न तेष्वहं ॥ ३ ॥
महाभूते जशी भूतीं । भूत कार्यांतिही मग ॥
रिघती निघती तैसा । मी त्यांतहि असे नसे ॥ ३ ॥
एतावदेव जिज्ञास्या । तत्वजिज्ञासुनात्मना ॥
अन्वय व्यतिरेकाभ्यां । यस्यात्सर्वत्र सर्वदा ॥ ४ ॥
जाणावे हे असे आत्म । तत्वजिज्ञासुनें सदा ॥
सर्वत्र भरले तेंच । कार्य कारण भाव हो ॥ ४ ॥
एतन्मतं समाविष्ट । परमेण समाधिना ॥
भवान्कल्पविकल्पेषू । न विमुह्यातिकर्हिचित् ॥
अन्तरी धरि हा बोध । एकाग्र चित्ति हो दृढ ॥
तुला येणें कल्पनेची । बाधा होणार ना कधीं ॥

शुभंभवतु.

✓ ४ महाराजांचें बाह्यस्वरूप व वागणूक हुबेहुब श्रीमारुतिरायाप्रमाणें असे. भुःभुः-कार करून उंचउंच उड्डाणें घेणें, फळफळावळ, भुइमुगांच्या शेंगा, उंस वगैरे खातांना हातांच्या बोटाची ठेवण, तसेंच खातांना मुखानें मीच मीच करणें व भजनांत नाचतांना अंगविक्षेप वगैरे प्रकार पाहून मारुतिरायाप्रमाणें यांचें ठाण-माण भासत असे. शिवाय दुसरें मारुतिरायाप्रमाणें ब्रम्हचर्य हाहि सादृश्यगुण यांच्या ठायीं वसत होता तरी ते नाथांपैकीं एक असावेत असें मानण्यास कांहीं सबळ कारणें आहेत. व पुढील भाग वाचून असें म्हणण्याला काय आधार आहे हें वाचकांच्या ध्यानांत येईल.

शिरडी येथील श्रीसांईनाथ ( बाबा ) महाराज यांस ते गुरुवत् पूज्य मानीत न ते आदिनाथ आहेत असें वारंवार ह्मणत; इतकेंच नव्हे तर कितीक वेळां श्री-सांईनाथ हे आमचे पंथांतील परात्पर गुरु आदिनाथ होत असें महाराजांनीं म्हणून दाखविलें आहे. महाराज म्हणत कीं श्रीसद्गुरु बालमुकुंद स्वामी हे आमचे सद्गुरु खरे परंतु नाथ पंथांतील आद्यगुरु श्रीसांईनाथ हे आम्हांस आदिनाथाचे ठिकाणीं होत. केव्हां केव्हां सद्गुरूविषयीं अति प्रेमांत आल्यावर असें स्पष्ट म्हणत कीं जन-दृष्टया आह्मीं हें अवतार स्वरूप दाखवितों परंतु वस्तुतः पहातां आमचें मूळ

स्वरूप भुजंगनाथाचें असून आम्हांस श्रीसद्गुरु बालमुकुंद स्वामींच्या बरोबरीनें श्रीसद्गुरु सांईनाथ ( बाबा ) महाराज हे आदिनाथ या स्वरूपांत परमपूज्य सद्गुरूचे ठिकाणीं आहेत. यावरून हा नाथांपैकीं अवतार असून भजनकीर्तन या रूपानें नामस्मरणाचा महिमा वाढविण्याकरितांच केवळ कलियुगास अनुरूप असा श्रीमारुतिरायाचा अवतार म्हणून भासविण्यांत आला हें अनुमान नसून प्रत्यक्ष महाराजांच्या तोंडचें म्हणून प्रमाण मानण्यास कोणतीही अडचण नाहीं. इतकें असूनही यांना मारुतिरायाचा अवतार किंवा नाथांचा अवतार म्हटलें तरी कांहीं बिघडत नाहीं. हे सिद्ध संत होते हें निर्विवाद आहे.

शिरडीचे श्रीसांईनाथ ( बाबा ) महाराजांविषयीं महाराजांनीं दर्शविलेल्या आदरभावास पुष्टि म्हणून या दोघांचीं दर्शनें झालीं त्या वेळीं त्या दोघांमध्यें उद्भूत होणारा प्रेमरंग वाचकांपुढें मांडला म्हणजे हे दोन्ही महाराज एकाच पंथांतील होते याबद्दल खात्री होईल. या भेटीचे प्रसंगीं श्रीसांईनाथांचें वर्तन एक संत दुसऱ्या संतास भेटतो असें नसून गुरुशिष्यांच्या भेटीपासून उत्पन्न होणाऱ्या आनंदाचा उपभोग श्रीसांईनाथ घेत असत. महाराज अगदीं बालपणीं श्रीसांईनाथांस भेटल्याचें सांगत होते. परंतु अलीकडे म्हणजे शके १८३२ त यांची भेट झाली तेव्हां यांच्याबरोबर ठाणें येथील कांहीं मंडळी, पेण येथील कै. रा. सीताराम बापूजी मोकाशी व कल्याण येथील रा. त्र्यंबक सदाशिव कुलाबकर व त्र्यंबक आनंदराव कर्णिक व इतर कांहीं मंडळी मुंबईहून श्रीसाईनाथांच्या दर्शनोद्देशानें निघाली मात्र तोंच शिरडी येथें श्रीसाईनाथांनीं बोलण्याचा सपाटा चालविला कीं " अरे माझा उद्यां सोन्याचा दिवस आहे रे " " अरे माझी उद्यां दिवाळी आहे " जणूं काय त्या दिवशींचें त्यांचें असलें भजनच होतें. दुसऱ्या दिवशीं उक्त समयीं ही मंडळी शिरडीस पोहोंचली. उतरण्याची सोय करून बरोबरील मंडळीसह महाराज मशिदींत गेले. तो ११॥–१२ चा भर दोन प्रहरचा सुमार होता. बाबांस ( श्रीसाईनाथ महाराजांस " बाबा " या नांवानें संबोधित. ) आरति होत होती. इतरांचीं दर्शनें झालीं व महाराज जों दर्शन घेण्यास सरसावले तों बाबांनीं आरति थांबविण्यास आज्ञा करून त्यांना घट्ट कवटाळून पोटाशीं धरलें व अनेक दिवसांनीं पिता-पुत्राची भेट झाल्यावर गहिंवर येतो तसे दोघे गहिंवरून एकमेकांस बाहूंनीं धरून शून्यवृत्ति झाले. सर्वांचें लक्ष या मूर्तीकडे सारखें लागून राहिलें होतें. अशा रीतीनें कडकडून

भेटल्यावर महाराजांस आपल्या अर्धा आसनावर बसवून बाबांनीं आरतीस प्रारंभ करविला. आरति-समाप्तीनंतर मंडळी घरोघर गेली व महाराज व त्यांची मंडळी बिऱ्हाडीं आली. बाबांना अर्पण करण्याकरितां शिऱ्याचा नैवेद्य व्हावा म्हणून महाराजांनीं सांगितलें. मंडळीची व्यवस्था थोड्या अवकाशांत नीट न लागल्या कारणानें पाकसिद्धि होण्याला वेळ लागला; इतक्यांत नित्याप्रमाणें गांवचे नैवेद्य चटसारे मशिदींत येऊन दाखल झाले व अर्पण करण्यास प्रारंभ होणार तों बाबांनीं सांगितलें कीं, "थांबा, आधीं माझ्या राम मारुति **नाथांचा** नैवेद्य येऊं द्या, मग सर्व नैवेद्य दाखवा." बाबांनीं स्वतः महाराजांना "नाथ" ह्या शब्दांनीं संबोधिलें हें प्रस्तुत प्रसंगीं ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. महाराजांचा नैवेद्य येऊन ताट खालीं ठेवतांच त्यांनीं तो सोहंश्वासानें अर्पण केला. बाबांनीं त्यांतील थोडासा शिरा तोंडांत टाकला व नंतर इतर नैवेद्य दाखविण्यांत आले. भोजनोत्तर महाराज बाबांकडे मशिदींत गेले तेव्हां पासून सायंकाळीं फिरणें, बोलणें, बसणें, वगैरे दोघांचें मोठ्याप्रेमानें होत असे. रात्रौ बाबा चावडींत विश्रांतीकरितां जात त्या वेळीं मशिदींपासून चावडीपर्यंत त्यांना वर छत्र धरून व मशालीचे उजेडांत नेत असत. ह्याप्रसंगीं ते महाराजांस हातांत हात घालून आपल्याबरोबर नेत. महाराज वाड्यांत आपल्या बिऱ्हाडीं निजत. अशा थाटानें बाबांनीं महाराजांस आपल्या जवळ १४ दिवस ठेवून घेतलें, कांहीं केल्या जाण्यास अनुमति देईनात. शेवटीं महाराजांनीं जाण्याची प्रबल इच्छा दर्शविल्यावर बाबांनीं मोठ्या कष्टानें जाऊं दिलें. हें प्रेम, बाबांनीं नाथ म्हणून संबोधिलें तें व महाराजांनीं आपण भुजंगनाथ आहोंत असें स्पष्ट सांगितलें तें या सर्व गोष्टी लक्षांत घेतां नामस्मरणाचा महिमा वाढविण्याकरितां केवळ लौकिकदृष्ट्या महाराजांनीं मारुतिरायाचें स्वरूप दाखविलें परंतु यांचें मूळ स्वरूप नाथांचें होतें व त्यांनीं व्यक्त केल्याप्रमाणें ते भुजंगनाथ होते हें सिद्ध होतें. कोणतीही भूमिका गृहीत धरिली तरी हे सिद्ध पुरुष होते यांत तिलप्राय संदेह नाहीं.

आतां हें नववे प्रकरण पुरें करण्यापूर्वीं दोन शब्द लिहिल्याबद्दल वाचक क्षमा करितीलच. नऊ हा शब्द किती खोल अर्थानें भरलेला आहे. नऊ म्हणजे स्वरूपीं अंतर्धान पावले. ह्मणजे सागरांत मीठाची बाहुली समरस होते त्याप्रमाणें ज्यांचें ब्रह्मीं ऐक्य झालें अर्थात् कांहीच न+उरलें हें दर्शविणारा असा हा नवांचा आंकडा महा सिद्ध आहे. यांत अधिक मौजेचा योग म्हणजे महाराजांची जन्म-

तिथि नवमी, प्रयाण तिथिहि नवमीच व त्यांच्या अगाध ज्ञानसागरांत बुडी मारून अंत पहातां ते नवविधा भक्तीच्याही पलीकडील नाथस्वरूपांत होते हा अनुभव नमूद करण्याचा सुयोग या नवव्याच प्रकरणांत आला यावरून ईशावास्योपनिषदांतीलमूल मंत्राप्रमाणें हा नऊ पूर्ण अंक होय यांत शंका नाहीं. सद्गुरुलीला अगाध आहे यापेक्षां जास्त काय लिहावें.

अवघा बोले चाले हरी ।
ज्याचि कथा तोचि करी ॥

---

## प्रकरण १० वें.

## ब्रह्मचर्य व्रत.

ब्रह्मचारिव्रते स्थितः । युक्त आसीत मत्परः ॥ भ. गी. ६

महाराज ब्रह्मचारी होते व त्यांनीं हें व्रत नुसतें कायेनें पाळिलें असें नाहीं तर काया–वाचा-मनानें तरवारीच्या धारेप्रमाणें प्रखर असें हे व्रत त्यानीं आजन्म राखिलें. या व्रतास बळी पाडणारीं इन्द्रियें म्हणजे नेत्र व हस्त; व म्हणूनच तुकोबारायानें म्हटलें आहे कीं, "पापाची वासना नको दाऊं डोळा." महाराजांनीं तर हीं इंद्रियें प्रथमतः अंतर्मुख करून टाकिलीं होतीं. यांच्या दर्शनास स्त्रीवर्ग आल्यास ते त्यांकडे दृष्टि जाऊं देत नसत व नमस्कार करण्याच्या प्रसंगीं महाराजच त्यांना उलट नमस्कार करीत. याप्रमाणें नेत्र व हस्त यांना "माते समान अवघ्या नारी" हा नीतीचा उच्च धडा पढवून ठेविला होता व ह्या धड्याचें त्यांना कदापिहि विस्मरण न पडतां हाच निदिध्यास त्यांना अखंड रहावा एतदर्थ त्यांजवर एका खंबीर शिक्षकाची कडक नजर ठेविली होती. हा शिक्षक म्हणजे "वैराग्य" होय व त्यानेंहि या दोन इंद्रियांस फितूर होऊं नये ह्मणून त्यावर अजपा मंत्राचा अभिषेक अहोरात्र चालू ठेविला होता. केवळ बाह्यभगवन्नामानें जरी चित्तशुद्धि होते, तरी पण मनास वेष्टण घालून विषय कामना बारीक रीतीनें रहातेच. त्या कामनेलाच जाळून टाकण्याकरितां अन्तर्नागस्मरणाचा अग्नि प्रज्वलीत ठेवून तिला जाळून भस्म केलें पाहिजे म्हणूनच महाराजांनीं राम महा मंत्र रूप

अग्नि अन्तर्यामीं सारखा प्रज्वलित ठेविला होता व अशा रीतीनें नुसता वरवर मळ झाडून न बसतां तीव्रतर वैराग्यानें सर्व कामना भस्म करून टाकिल्या होत्या.

धातूवरी अनल नेणत बाळ घाली ।
तो अग्नि धातुमळ तो अतिशीघ्र जाळी ।
ताम्रादि भस्महि तया अनळेंचि जेव्हां ।
कर्ता अभिज्ञ बहु जाळिल धातु तेव्हां ॥ —नामसुधा.

मन महाद्वाड आहे त्यास ओढाळ गुरूं असें ह्मटलें आहे.

न करुं पातक निश्चय हा घडे ।
मन तथापिहि पापपथीं पडे ।
जरि धरी हरिनामक वित्त हें ।
अशुभ ही शुभ होइल चित्त हें ॥

—नामसुधा.

ह्मणून अशा स्वैर मनावरील अशुद्धवृत्ती काढून टाकण्याकरितां महाराजांनीं त्याचें ज्ञानमार्गानें आकलन करून कायिक व मानसिक तप साध्य केलें. आतां राहिलें वाचातप त्याचाहि विचार करूं:—

महाराजांनीं स्त्री नामाचा उच्चारहि आपल्या वाणीवाटे काढिला नाहीं. यांचें उपास्यदैवत श्रीरामचंद्र; तत्रापि मातुश्री सीतामाईचेंहि नांव यांनीं घेतलेलें नव्हतें. त्यांना सीताबाईचा उल्लेख करणें झाल्यास श्रीराम जयजयराम अशा तऱ्हेनें करीत असत. जयजयराम ह्मणजे स्त्रीः पत्नी; [ ह्या विषयीं विशेष खुलासा प्रकरण ७ ईश्वर नामभाषा यांत सविस्तर आहे तो जिज्ञासु वाचकांनीं अवश्य पहावा ] त्या प्रकरणांत उल्लेख केल्याप्रमाणें कोणाहि पुरुषाच्या बायकोचा नाम निर्देश करणें तो अमक्याची जयजयराम, असा करीत. देवादिकासंबंधीं बोलतांनाहि हाच नियम पाळीत. सितामाई, पार्वती वगैरे नांवें याच नियमानुसार घेतली जात. पार्वतीचें नांव घेणें झाल्यास "शिवशंकर जयजयराम" असें म्हणावयाचें. सारांश कोणत्याही स्त्रीनामाचा प्रत्यक्ष उच्चार करून महाराजांनीं आपली वाणी विटाळविली नाहीं. हेंच वाचा तप. एवंच महाराजांनीं काया-वाचा-मनेंकरून ब्रह्मचर्यव्रत आमरणान्त पाळिलें; या व्रताचीं लक्षणें सांगितलीं आहेत तीः—

दर्शनं स्पर्शनं केलिः कीर्तनं गुह्यभाषणम्
संकल्पोऽध्यवसायश्च क्रिया निष्पत्तिरेवच
एतन्मैथुनमष्टांगं प्रवदन्ति मनीषिणः
विपरीतं ब्रह्मचर्यमेतदेवाष्टलक्षणम् ॥

ज्ञानसमुद्र नामक पुस्तकांत यासंबंधीं खालील प्रमाणें म्हटलें आहेः—

नारी समरन श्रवन सुनि
दृष्टि रु भाषन होइ । गुह्य वृत्तांत रु हास्यरति ।
बहुरी स्पर्शहि कोई ॥
सिष्य सुनहु यद भेद । मैथुन अष्ट प्रकार तजि ।
कह्यो मुनीश्वर वेद । ब्रह्मचर्य तब जानिये ॥

उपर्युक्त लक्षणें महाराजांच्या अंगीं पूर्णत्वानें विलसत होतीं. ह्यांच्या ब्रह्मचर्याची परिक्षा पहाण्याबद्दल एका इसमानें प्रयत्न केल्याची हकिकत रा. रा. आत्माराम रामचन्द्र ताह्मणे पनवेलकर हल्लीं मुक्काम पुणें यांजकडून लिहून आलेली येथें दिली असतां अप्रासंगिक होणार नाहीं; ते लिहितात.

शके १८१६ चे सुमारास महाराज भिवंडी येथें असतांना एका पोलिस अमलदाराची व यांची गांठ पडली—हे पोलिस अमलदार हयात असून ठाणें येथें आपल्या पेन्शनचा उपभोग घेत कालक्रमणा करीत आहेत—ह्या अमलदाराला कळलें कीं हे साधु ब्रह्मचारी आहेत व ईश्वरनामाव्यतिरिक्त एक अक्षरहि मुखावाटे काढीत नाहींत. त्याला वाटलें हें सर्व बनावट आहे. अर्थात याबद्दल स्वतःची खात्री करून घेण्याकरितां उद्युक्त झाला. महाराजांची सेवा करण्याच्या मिषानें त्यानें एका वेश्येस तयार करून, पढवून यांच्याकडे पाठविण्याचें ठरविलें. तिची ह्यांच्या ठिकाणीं श्रद्धा असल्यामुळें व तिला यांचा लौकिक माहित असल्यामुळें ती या निन्द्य कामास तयार होईना; पण द्रव्याच्या आमिषानें व त्या अमलदाराच्या अधिकाराच्या भीतीनें ती तें नीच कृत्य करण्यास तयार झाली. महाराज त्या वेळीं मेकलांचे श्रीराम मन्दिरांत निजत असत. तेथें ही बाई रात्रौ १२ वाजतां गेली व महाराजांस जागें करून स्त्री स्वभावसुलभ असे हावभाव व चेष्टा करूं लागली. महाराज खडखडीत जागे झाले व पहातात तों काय कोणी स्त्री सन्निध असून विपरीत चेष्टा करीत आहे. ह्या साऱ्याचा

अर्थ महाराजांच्या ध्यानांत येतांच ते हांसले व त्यांना त्या बाईची कींव आली. ती आपल्याकडून शिकस्त करून पहात होती. महाराज मात्र "रामा रामा" असें अनेक वेळां उच्चारून तिची निर्भर्त्सना करीत होते, तों थोड्याच वेळांत असा विलक्षण प्रकार झाला कीं ती एकदम दचकल्यासारखी झाली व तिच्या एकंदर वर्तनांत फरक दिसूं लागला. तशीच मागल्या पाउलीं ती आपल्या बिऱ्हाडीं परतली. घरीं जातां जातां तिला ताप भरूं लागला व सर्वांगाचा भडका होऊं लागला. तिच्या घरांतील मंडळी घाबरली व त्या पोलीस अमलदाराकडे ताबडतोब जाऊन त्यास त्यांनीं सर्व हकीकत निवेदन केली. ती ऐकतांच त्याला वाईट वाटलेसें दिसलें. यास आपणच कारणीभूत झालों व विनाकारण साधु पुरुषाचा छळ करण्याच्या दुर्बुद्धीला थारा दिला असें वाटून दुःखित अंतःकरणानें श्रीराममंदिरांत जाऊन महाराजांच्या पायीं लोटांगण घातलें व "क्षमस्व भगवन्" म्हणून करुणा भाकूं लागला. सर्व अपराध माझा आहे त्या बाईचा कांहींच दोष नाहीं वगैरे भाषणानें महाराजांस विनवूं लागला. महाराज हांसले मात्र व त्याच्याकडे कृपापूर्ण दृष्टीनें अवलोकन केलें, तोंच तिकडे काय चमत्कार झाला पहा. त्या बाईचा दाह शांत होऊं लागला व तापाचा जोर कमी झाला. त्या अमलदारास मात्र बजाविलें कीं पुनः अशा मोहांत पडूं नकोस. त्या दिवसापासून ह्याची महाराजांच्या ठिकाणीं अचल श्रद्धा बसली व तो त्यांच्या भक्तांपैकीं आपण एक आहोंत असें मानण्यांत अभिमान बाळगूं लागला. पुढें एका प्रसंगीं आपली कोणती भूमिका आहे हें त्या अमलदाराच्या निदर्शनास आणण्याचा आणखी योग आला तो प्रकार असाः—

शके १८३६ त महाराज ठाण्यास असतांना हाच अमलदार दर्शनास आला होता. रीतीप्रमाणें महाराजांनीं चौकशी करून सध्यां कोठें आहांत म्हणून विचारिलें. सातारा जिल्ह्यांत असल्याचें त्यानें सांगितलें त्यावर महाराजांनीं विचारिलें कीं मसूर गांवीं भगवान म्हणून एक साधु आहेत त्यांचें केव्हां तरी दर्शन घडलें होतें काय ? त्यांचें दर्शन अवश्य घ्या, ते मौन-व्रत आहेत. त्या व्रताचा परित्याग करविण्याकरितां मी स्वतः येत्या चातुर्मासांत त्यांजकडे जाणार आहें. इतकें बोलणें होऊन तो अमलदार तेथून निघाला व मसूर गांवीं जाऊन भगवान साधूंचे दर्शन घेतले व तेथून पुढें तासगांवाकडे गेला. महाराज येतील म्हणून यानें चातुर्मासांत वाट पाहिली परंतु ह्यांचें कांहींच वर्तमान कळेना. एके दिवशीं त्याच्या

मनांत असा विचार आला कीं मसूर गांवीं जाऊन भगवान साधूंचें दर्शन घ्यावें व राममारुति महाराजांचें आगमन झालें किंवा नाहीं ह्याचा तपास करावा. मनांत हा विचार येतांच तो मसूर गांवीं जाण्यास निघाला तों वाटेंत त्यास असें समजलें कीं भगवान् साधु सारखेच कोणी एक वेडसर (?) साधु अगदीं अलीकडे एके रात्रीं आले होते व त्यांचें आणि भगवान् साधूंचें हांसणें नाचणें बागडणें सर्व रात्रभर चाललें होतें व पहांटेस ते भेटीस आलेले साधु कोठें निघून गेले व भगवान् साधूंनीं त्याच दिवशीं आपला नश्वर देह ठेविला. हें त्या अमलदारास कळतांच पुढें मसूरीस जाण्याचा बेत रहित करून त्यास परतणें भाग पडले. थोड्या दिवसांनीं ठाण्यास आल्यावर महाराजांच्या दर्शनास आला व विचारूं लागला कीं पूर्व संकेताप्रमाणें आपण भगवान् साधूच्या दर्शनाला गेला होतां काय ? त्यावर महाराज हांसले व एवढेंच म्हणाले कीं तूं ऐकलेंस तेंच खरें व तुझा जो भाव झाला आहे तोच अढळ ठेव. यापासून काय बोध घ्यावयाचा तो सुज्ञ भाविक वाचक घेतीलच.

---

## प्रकरण ११ वें.

**आइकें देह होय सोनियाचें । परि लाघव ये वायूचें ।**
**जे आप आणि पृथ्वीचें । अंशु नाहीं ॥**
**मग समुद्रा पैलीकडील देखे । स्वर्गींचा आलोचु आइके ॥**
**मनोगत वोळखे । मुंगियेचें ॥** —ज्ञाने. ६.

[ १ महाराजांच्या साधुत्वाच्या गोष्टी. ]

श्री अक्कलकोट स्वामी वा श्री साईनाथ महाराज यांच्या प्रमाणें महाराज एका ठिकाणीं मठांत बसून नसल्या कारणानें अज्ञ जनांस ज्ञान होण्याकरितां जे जे उपदेशाचे धडे दाखविले ते एकत्र उपलब्ध होण्यास मार्ग नाहीं. हें चरित्र-लेखन चालू असतां रा. ताम्हणे ह्यांच्या आगमनामुळें मागें १० व्या प्रकरणांत दिलेले दोन दाखले त्यास लेखकांकडे पाठविण्याची बुद्धि झाली, असे अनेक चमत्कार ठिकठिकाणीं कित्येक गृहस्थांजवळ राहून गेले असावेत असा भरंवसा आहे. हें चरित्र अशा विलक्षण परिस्थितींत प्रसिद्धीस येत असल्या कारणानें फार थोड्या ठिकाणांहून माहिती उपलब्ध झाली आहे. येथें इतकें नमूद करणें आवश्यक

आहे कीं महाराजांनीं प्रकट केलेले चमत्कार त्या त्या प्रसंगानुरूप तर खरेंच, पण ते दाखविण्यांत आपली कीर्ति व्हावी असा महाराजांचा मनागपि हेतु नसे. त्यांच्या सान्निध्यांत रहाणाऱ्या मंडळीचा असा पूर्ण अनुभव आहे कीं चमत्कार प्रकट झाल्याबरोबर त्या बद्दल वाच्यता होईल व आपणांस लोकांची जास्त उपाधि सहन करावी लागेल म्हणून महाराज तावडतोब विषयांतर करवून त्या वेळे पुरतें तरी त्या गोष्टीचें विस्मरण करवीत. त्यांना कीर्तीचा मनःवूर्वक तिर-कारा असे. म्हणूनच

परि वेडिवे माजि दडे । महिमें भेणें ॥

ही वृत्ति त्यांना फारच आवडे व तदनुरूप त्यांचें वर्तन असे. चमत्कार प्रसिद्धीस आणणें त्यांच्या स्वभावाविरुद्ध जरी आहे तरी चरित्र या नात्यानें त्यांनीं भाविक जनांस व शिष्यांस दाखविलेले चमत्कार अथवा नीतीचे दाखले प्रसिद्ध झाल्यानें हानि न होतां उलट चरित्रास पुष्टिच मिळणार आहे. हे चमत्कार अगदी अलीकडे घडलेले उपलब्ध आहेत याशिवाय इतरत्र घडलेले चमत्कार लेखका-कडे लिहून आल्यास पुढील आवृत्तींत प्रसिद्ध होतीलच.

( १ ) शके १८३५ त महाराज रा. वामन रामचंद्र प्रधान यांचे घरीं दाद-रास एकादशीच्या भजनानिमित्त रात्रीं वस्तीस होते. दुसरे दिवशीं सकाळीं १० वाजतां महाराजांनीं मक्याचीं कणसें खाण्याची इच्छा प्रदर्शित केली व कणसें आणविण्यास रा. प्रधान यांस सांगितलें. रा. प्रधानांनीं सुचविलें कीं उपोषण सोडण्यापूर्वीं कणसें खाणार काय ? तेव्हां कणसें आणण्याची आज्ञा झाली. मग दोन आणे देऊन रा. प्रधानांनीं आपल्या भाच्यास बाजारांत पाठविलें. इतक्यांत जवळच मागल्या बाजूस असलेल्या मळ्याची आठवण होऊन त्यास परत बोलाविण्यांत आलें व लांब बाजारांत न जातां कणसें मळ्यांतूनच आण-ण्यास सांगितलें. त्यावर भाच्यानें उत्तर दिलें कीं मळ्याचा मालक उमेंठ असून त्याला पर्वा कशी ती माहित नाहीं, मी बाजारांतच जातों असें म्हणून तो निघाला. जातांना तो मळा लागला व त्याच्या मनांत पुन्हा काय विचार आला न कळे तो त्या मळ्यांतच शिरला. तोंच त्याला मालक व नोकर भेटले. तेव्हां पुढें होऊन त्यानें मालकास "कणसें मिळतील काय ?" असें विचारतां त्याचा तो मुळचा उमेंठपणा पार गेलेला दिसला, व सौम्य शब्दानें त्यानें उत्तर दिलें कीं, कणसें आतांच बाजारांत पाठविलीं तरी पण झाडावर असल्यास पहा बरें म्हणून त्यानें

आपल्या नोकरास सांगितलें. नोकरानें कणसें आणून ह्याच्या रुमालांत ओतलीं ती पहातांच हा विचार करूं लागला आपल्या जवळ सारे आणे दोन व हीं तर ४–६ आण्याचीं कणसें दिसतात तेव्हां भीत भीत जवळ असलेले २ आणे पुढें केले, तों चमत्कार असा कीं मालकानें उलट १ आणा परत दिला. व भाचा घरीं आला. झालेला वृत्तांत ऐकून व या मालकाचा वृत्तिपालट पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें.

( २ ) महाराजांनीं भाषात्याग केल्यावर शके १८१३–१४ चे सुमारास त्यांचें पेण गांवीं प्रयाण झालें होतें. त्यावेळीं ते रा. वढावकर यांच्या ओटीवर रात्रीचें निद्रासुख घेत. लहानपणीं हे पेणेस असतांना उनाड मुलांमध्यें यांची गणना झालेली तेव्हां आतां हे सन्तपदाला पोहोंचले असतील अशी कल्पना-सुद्धां त्यांना शिवली नाहीं. इतकेंच नव्हे तर भाषात्याग केल्यावर तेथें जातांच हें कांहीं तरी ढोंग आहे असें तत्रस्थांना वाटूं लागलें व ह्यांत सत्यांश किती आहे हें पहाण्याचें तेथील मंडळीनें ठरविलें. मराठी भाषा बोलणाऱ्यानें गुजराथ्याचा वेष घेतला किंवा ज्यास बऱ्याच भाषा अवगत असतात त्याची मूळ भाषा ओळखण्याकरितां तो गाढ झोंपेंत असतां त्यास घाबरवून उठविल्यानें तो आपल्या मूळ भाषेंत बोलत उठतो असा नियम आहे तद्वत महाराजांचें हें ईश्वरनामाच्या भाषेचें ढोंग आहे कीं काय हें अजमावण्याकरितां ते गाढ झोपेंत असतां त्यांच्या आंगावर मंडळींनीं गार पाणी ओतिलें. त्या सरशीं 'रामा' 'मारुते' वगैरे नांवें उच्चारीतच महाराज जागे होऊन उठून बसले. मंडळीनें जाणलें कीं हें सोंग नाहीं खास व त्यांनीं तेथून पोबारा केला.

असलाच दुसरा प्रयोग महाराज मुंबईस ठाकुरद्वारीं रा. ब. वैद्यांचे वाडींतील श्रीविठ्ठलमन्दिरांत निजत असत त्यावेळीं झाला होता; परंतु ज्यांचीं हाडें देखील राममय झालेलीं त्यांच्या मुखांतून रामनामाशिवाय दुसरा कसला उच्चार होणार?

( ३ ) शके १८३८ त महाराजांचा मुक्काम खालापुर येथें रा. गणेश लक्ष्मण सुळे ह्यांच्या येथें होता. त्यावेळीं दादरहून शिवराम गणेश गुप्ते हेही महाराजांच्या सान्निध्याचा लाभ मिळावा ह्या हेतूनें गेले होते. त्यावेळीं ईश्वरनामस्मरणांत व वेदांतचर्चेत मंडळीचा वेळ आनंदानें जात होता. फाल्गुन महिन्यांत महाराजांनीं शिवरामभाऊस अष्ट विनायक करून येण्याविषयीं आज्ञा केली. त्यास त्यांनीं फाल्गुन वद्य १४ ला निघून राम नवमीस परत यावें असें फर्माविले होतें;

त्याप्रमाणें निघून अष्ट विनायक करून शिवराम भाऊ परत आले. यांत चमत्काराची गोष्ट घडली ती ही कीं अष्ट विनायक करण्यांत एकंदर खर्च हिशेब करितां किमान पक्ष ३२–३३ रुपये लागला असें मागाहून टांचण करितां ध्यानांत आलें, परंतु खालापुराहून निघतांना शिवराम भाऊ जवळ अवघे रु० १३–१४ होते. वाटेनें गाडी भाडें, रेलवे भाडें, हमाली, पुजारी यांस प्रत्येक ठिकाणीं अल्प देणगी, अष्ट विनायका पुढें रौप्य दक्षिणा वगैरे खर्च करण्यांत आला. महाराजांची अगाध लीला ही कीं या सर्व गोष्टीची शिवरामभाऊस कल्पनाही झाली नव्हती. शके १८४१ सालीं म्हणजे महाराज निजधामास गेल्यानंतर एक वर्षानें सहज शिवरामभाऊस या गोष्टीचें स्मरण होऊन हिशोब पहातां हा असंभवनीय प्रकार लक्षांत आला. सद्गुरुमाय वत्सा मागें कशी धांवते व संतलीला किती अगम्य आहे याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे.

(४) शके १८३९ त पौष वद्य १० स महाराज आपले गुरु श्रीबालमुकुंदस्वामी यांच्या पुण्यतिथीनिमित्त रा. त्र्यंबकराव कुलावकर ह्यांच्या येथें कल्याणास आले होते. बरोबर श्री. केशवस्वामी पारनेरकर हेहि होते. पूजा अर्चा होऊन नैवेद्य आरतीचा समय प्राप्त झाला व आरतीस प्रारंभ होणार तोंच घरांतून निरोप आला कीं दोन मुलांस असह्य ताप भरला आहे व मांडीच्या जांघाड्यांत गांठी आल्या असून मुलें अस्वस्थ आहेत तर आरती सुरू करण्यापूर्वीं त्यांना एकदां पहावें. हीं मुलें १५–१७ वर्षांचीं व रा. त्र्यंबकरावांच्या निकटच्या आप्तेष्टांचीं, त्या उत्सवाला मुद्दाम आलेलीं होतीं. महाराजप्रभृति ह्या उत्सावांत अगदीं आनंदांत होतीं तों हें अनपेक्षित विघ्न मध्येंच दत्त म्हणून उभें राहिलें, व सर्वांच्या तोंडाचें पाणी पळालें. महाराज व केशवस्वामी ताबडतोब आंत गेले व मुलांस हात लावून पहातात तों ताप अनावर चढलेला व त्यांत गांठी आलेल्या. श्री केशवस्वामींनीं स्वहस्तांतून तीर्थ देण्यास महाराजांस सुचविलें त्यावर महाराजांनीं उत्तर दिलें कीं तसें करण्याची आवश्यकता नाहीं, आजचा माझ्या गुरूचा पुण्यतिथीचा दिवस व या दिवशीं विघ्न उपस्थित होणें केवळ अशक्य आहे; हीं मुलें बरीं झालींच पाहिजेत. तीर्थ देणेंच असेल तर आपण द्यावें असें म्हणून महाराजांनीं आपला अमृत तुल्य हात मुलांच्या अंगावरून व गांठीवरून फिरविला, यावेळीं त्यांची चर्या गंभीर शांत व समाधानाची होती. हात फिरवून झाल्यावर म्हणाले कीं घाबरण्याचें कारण नाहीं, सर्व कांहीं ठीक होईल. चालू उत्सव पूर्ण

आनंदानें करा. रात्रौ १२ वाजतां गांठीं नाहींशा होऊन तापही जाईल. त्यानंतर साला बादाप्रमाणें ब्राह्मणभोजन वगैरे होऊन तीर्थ प्रसाद रात्रीं १० वाजेपर्यंत चालूच होता. नंतर सर्व मंडळी भजनास उभी राहिली. भजनांत श्री केशवस्वामी व महाराज तल्लीन होऊन भजनास इतका कांहीं रंग आला होता कीं त्या घरांत असें कांहीं विघ्न असेल अशी कोणास शंका देखील आली नाहीं. होतां होतां १२ वाजले व भजन पूर्ण रंगांत आलें तों घरांतून निरोप आला कीं दोन्हीं मुलांच्या गांठी जागच्याजागीं नाहींशा होऊन ताप उतरला. ताप किंचित् मात्र होता पण प्रातःकाळ होई तों नेहमींप्रमाणें तीं मुलें चांगलीं हिंडूं फिरूं लागली. त्या मुलांस यमाजी भास्कराचें बोलावणें आलें होतें खरें, परंतु संतांच्या आनंदपर्वणीच्या समयीं आल्यामुळें त्याचें संत लीलेपुढें कांहींच वळलें नाहीं. यापेक्षां जास्त काय समजावें. श्री साधुवर्य तुकाराम महाराजांनीं म्हटलें आहेच कीं:—

यमधर्म सांगे दूतां । तुह्मां नाहीं तेथें सत्ता ।
जेथें होय हरिकथा । सदा घोष नामाचा ॥ १ ॥
नका जाऊं तया गांवा । नामधारकाच्या शिवा ।
सुदर्शन यावा । घरटी फिरे भोंवती ॥ २ ॥
चक्रगदा घेउनी हरि । उभा असे त्यांचे द्वारीं ।
लक्ष्मी कामारी । ऋद्धि सिद्धि सहित ॥ ३ ॥
ते बळिया शिरोमणि । हरिभक्त ये मेदिनी ।
तुका ह्मणे कानीं । यम सांगे दूतांचे ॥ ४ ॥

ही यमाजीभास्करांनीं निक्षून केलेली आज्ञा मोडल्याबद्दल त्यांना दरबारांत काय शिक्षा भोगाव्या लागल्या असतील याचें केवळ कल्पनाचित्र काढून वेळ न गमावितां दुसऱ्या भागाकडे वळूं.

( ५ ) पेण नजीक हमरापूर येथील कुळकर्ण्यांकडे महाराजांचें जाणें झालें होतें, व तन्निमित्त उत्तम भोजनाचा थाट करण्याचें कुळकर्ण्यांनीं ठरविलें. त्यावेळीं महाराजांचा प्रघात असा होता कीं जें कांहीं म्हणून पानावर पडेल तें सारें संपवून टाकावयाचें, पानांत अवशिष्ट कांहीं राहूं देत नसत. व वाढप्यास "पुरें" वा "नको" म्हणत नसत. त्यांना वाढणारा चाणाक्ष लागत असे. असो, कुळकर्ण्यांची इच्छाहि अशीच कीं महाराज

संतृप्त होईपर्यंत त्यांनीं आपणांकडे भोजन करावें. लाडू हें होतें ते दिवशीचें पक्वान्न, व ते साधारण प्रमाणानें न वांधतां थोरलेच बांधले होते; हेतु हा कीं थोड्याच वाढण्यांत महाराजांनीं पुष्कळ खावें. महाराज येऊन पानावर बसले व लाडूच्या आकृतीकडे बघून महाराजांची खात्री झाली कीं, आपल्या भोजन-सामर्थ्याची परीक्षा पहाण्याचा आजचा समय आहे. महाराजांनां काय अशक्य होतें? आला लाडू फस्त. असें चाललें व २०-२९ लाडू संपले तरी महाराजांचें लाडू आणा हें मागणें होतेंच. आण म्हटलें खरें पण घरांत शिल्लक असतील, तेव्हां ना आणवयाचे. बराच वेळ झाला लाडू कांहीं आपलें स्वरूप प्रकट करीनात तेव्हां महाराजांनीं दरडावून लाडू मागितले. कुळकर्णी घाबरून गेले व असें करण्यांत माझा हेतु वाईट नव्हता असें म्हणून क्षमा मागूं लागले. महाराज दयाळुच ते, लागलीच शांत झाले व म्हणाले कीं असें पुन: करूं नको, आमची परीक्षा पाहून तुला काय प्राप्ति. असें म्हणून आचमन घेऊन उठले. कुळकर्ण्यांचा हेतु स्तुत्य होता पण तो अमलांत आणण्याचा प्रकार विलक्षण होता म्हणून महाराजांनीं हा त्यांना धडा दिला.

( ६ ) रा. रामचंद्र वामन पाटणकर ठाणें यांजकडून:—शके १८३९ सालीं एकदां रामभाऊ पाटणकर ठाणें येथें पोलीस खात्यांत नोकरीस असतां महाराज त्यांच्या येथें गेले व तेथें त्यांचा मुक्काम १०–१२ दिवस होता. ठाण्यास मीटरांतून पाणी मिळतें व जसें संपेल तसें पाहून कर आकारण्यांत येतो. महाराजांस पाणी भरपूर लागत असे. शौचविधि, तदनंतर हातपाय धुणें, तोंड धुणें, स्नान वगैरे प्रत्येक विधि उरकण्यांत घागरीवारी पाणी लागे. महाराजांनीं कितीही पाणी वापरलें व त्याबद्दल कांहींही आकार झाला तरी तो देण्यांत रा. रामभाऊंस आनंदच वाटता. पण त्याच घरांत रा. राजे ह्यांचें बिऱ्हाड होतें व मीटर मात्र दोन्हीं बिऱ्हाडांना एकच होता. तेव्हां राजे यांवर कराचा बोजा बसूं नये म्हणून असें ठरलें कीं दर महिन्याच्या कराप्रमाणें रा. राजे यांनीं कर द्यावा व जास्त होईल तो रामभाऊंनीं द्यावा. रामभाऊंना वाटलें होतें त्याप्रमाणें जास्त पाण्याचा खप झाला खराच. कांहीं दिवसांनीं महाराजांचें प्रयाण झालें व महिना अखेर रिवाजाप्रमाणें म्युनिसिपालिटीकडून मिटर पाहून बिल करण्यांत आलें. परंतु बिल पहातात तों दर महिन्याप्रमाणें—किंचिन्मात्र जास्त कमी नाहीं व पाणी तर मुबलक संपलेलें तेव्हां त्यांना—रामभाऊ व राजे या दोघांना—असें वाटलें कीं मिटर

विघडला असेल व म्हणून (बिल) आकार कमी आला असेल. त्यांनीं त्याप्रमाणें अधिकाऱ्यांस सांगितलें व तें मिटर तपासविलें. मिटर बरोबर आहे अशी खात्री झाली तेव्हां बिलांत कमीजास्त होणें शक्य नाहीं असें अधिकाऱ्यानें त्यांना कळविलें. तेव्हां रामभाऊ व रा. राजे यांना फार आश्चर्य वाटलें. व या गोष्टी-विषयीं आपण इतका खल केला म्हणूनच महाराज असला चमत्कार दाखवून गेले. अशी त्यांची खात्री झाली. त्यापुढेंहि पाण्यावरील कर नेहमीं प्रमाणें येत असे त्यावरून खात्री झाली कीं महाराजांच्या सेवेला लागलेलें पाणी मिटरास दाखवितां आलें नाहीं. हेंच ह्यांतील रहस्य व हाच संतमहिमा.

(७) शके १८३९ त श्री गणेशचतुर्थीच्या उत्सवप्रसंगीं महाराज कल्याणास रा. शिवराम भाऊ गुप्ते यांजकडे होते. सणानिमित्त दिवसा भोजन जरा उशिरां झालें होतें, त्यामुळें रात्रौ फराळास काय करावयाचें म्हणून विचारतां महाराज म्हणाले कीं, भूक नाहीं, तेव्हां आम्हांला फराळ करणें नाहीं. त्यावर थोडें तरी खावें असा आग्रह केल्यावर महाराज म्हणाले तुझ्या आग्रहास्तव " तीन लाडू आण जास्त कांहीं नको हो" त्यावर घरांत तसें कळविलें. सणाचा दिवस तो व दिवसा जेवण्यास मंडळी व मुलेंहि बरींच होती तेव्हां लाडू सरले ह्यांत आश्चर्य नव्हतें, पण चमत्कार असा कीं घरांत पहातात तों लाडू सारे तीनच शिल्लक—चौथा कांहीं मिळेना. अशा प्रसंगीं महाराजांचें कौतुक वाटलें तर काय आश्चर्य.

## आईची आज्ञा श्रेष्ठ.

(८) १८३९ च्या फाल्गुनांत होलिका उत्सवांत दादरकर मंडळीनीं एका शनिवारीं शिवरामभाऊस कल्याणाहून बोलाविलें होतें. ऑफिसांतून परतून उपास सोडून संध्याकाळच्या सुमारास दादरास जावयाचें असा त्यांचा बेत. घरीं आले व फराळास बसले तों ४-४॥ झालेले व त्यांत ऐन उन्हाळ्याचे दिवस ते. शिवरामभाऊंनीं आपला जाण्याचा बेत आईस जेवतांच कळविला. उन्हांतून आलेला व उपास सोडून तसाच उन्हांतून जाणार व रात्रीं जागरण होऊन त्रास होणार हें त्यांच्या आईस न रुचून त्यांनीं जाऊं नये म्हणून आईनें सांगितलें. आईचें हृदय तें? तिनें रागाचा आविर्भाव आणला तरी त्यांतून तें प्रेमच डोकावीत असतें. शिवरामभाऊ पडले पेचांत. जावें तर आई रागावलेली व तिची आज्ञा जाऊं नये अशी; न जावें तर मित्रमंडळींचें आग्रहाचें आमंत्रण; करावें कसें अशा विचारांत ते पडले. एक मन सांगे कीं जावें. आईच ती, तिचा राग शांत कर-

ण्याला वेळ लागणार नाहीं; न गेल्यास मित्रमंडळींचा रोष होईल व पुन्हा एक वर्षाशिवाय असा योग येणें नाहीं. अशा मनःस्थितींत शिवरामभाऊ बाहेर पडले खरे पण ती आईची क्रुद्ध मुद्रा डोळ्या समोरून जाईना. ह्या शनिवारीं महाराज कल्याणांतच रा. केशवराव दळवी यांजकडे होते व त्यांचे प्रकृतीस आराम नव्हता. दादरास जाण्यास स्टेशनवर जाण्याकरितां शिवरामभाऊ निघाले पण चमत्कार हा कीं त्यांच्या पाऊलांनीं त्यांना महाराजांकडे–रा. दळवी यांच्या घराकडे नेलें. बरोबरच आहे "चाले हें शरीर कोणाचीये सत्तें"–माडीवर जाऊन महाराजांच्या चरणाचें दर्शन घेतलें व समोर आसनावर बसले. महाराजांनीं–सद्गुरु मावलीच ती–प्रेमानें "ये बैस–उपास विपास सुटला कां"–म्हणून म्हटलें. होय म्हणतांच पारमार्थिक विषयावर महाराजांचें नेहमीप्रमाणें बोलणें निघालें व रस इतका कांहीं वाढला कीं वेळ कसा जात होता ह्याचें भानच रहिलें नाहीं. शिवरामभाऊ ६ वाजतां गेलेले पण रात्रीचे अकरा वाजले हें कळलें देखील नाहीं. मध्येंच महाराजांनीं विचारलें "अरे वाजले तरी किती" घड्याळांत पाहून ११ वाजले म्हणून सांगतांच महाराज लगबगीनें म्हणाले कीं "आतां घरीं जा. रात्र फार झाली जाग्रण होऊन त्रास होईल व आई रागावेल." नंतर महाराजांना पुनः साष्टांग प्रणिपात करून शिवरामभाऊ निघाले. वाटेंत आपण दादरास जाण्यास निघालों व इकडे आलों कसे याचें आश्चर्य वाटून आईची आज्ञा उल्लंघून दादरास जाणें गैर आहे हें पटविण्याकरितांच केवळ महाराजांनीं ११ वाजेपर्यंत आपणास नजर कैदेंत ठेविलें अशी त्यांची खात्री झाली व स्वामी महाराजांच्या सर्वसाक्षित्वाबद्दल व कृपाकटाक्षाबद्दल त्यांस धन्यता वाटून आंगीं रोमांच उभे राहिले. शब्दानें उलगडा करण्याचें कारणच उरलें नव्हतें व महाराजांना स्वतःला कीर्तीचा तिटकारा असल्या कारणानें त्यांनीं असल्या गोष्टींची वाच्यता देखील केली नाहीं व म्हणूनच पुष्कळसा चमत्कारसंग्रह अद्यापि गुप्तवासांत आहे. तो जगाच्या निदर्शनास आणून महाराजांची कीर्ति-ध्वजा सर्वत्र पसरविणें हें प्रत्येक भक्ताचें कर्तव्य आहे ह्मणून त्यांना व भाविक मंडळीना तशी विनंति मागें एकदां केलेली आहेच. त्याकडे ते लक्ष पुरवितील अशी आशा आहे. अस्तु.

(९) शके १८४० चे श्रावण महिन्यांत दादर येथें एके दिवशीं रा. वामनराव प्रधानांकडे भजनाचा बेत होता. भजनास बसावयाचें म्हणजे महाराज उजाडेपर्यंत

बसावयाचे व असें सर्व रात्रभर भजन झालें कीं यांना परमावधीचा आनंद व्हावयाचा. भजनास प्रारंभ होण्यापूर्वी महाराजांनीं जमलेल्या मंडळीस पृथक् पृथक् विचारलें कीं "तूं उजाडेपर्यंत बसशील तर ठीक, नाहीं तर बाहेर सोप्यांत जाऊन नीज व जे रात्रभर, भजनांत असतील त्यांनाच कॉफी मिळेल" ह्यापूर्वीच चार सहा दिवस सारखीं जागरणें झाल्याकारणानें बरीच मंडळी पेंगूं लागून सोप्याच्या आश्रयास गेली. महाराजां समोर शिल्लक राहिले असे तीन इसम. त्यांत भजनांस प्रेम आणणारे एक वृद्ध गृहस्थ यांचें नांव रा. गोपाळ रामचंद्र कुळकर्णी हे मूळ श्रीवर्धनचे रहाणारे असून प्रसिद्ध भजनकार व ईश्वर भक्त होते. यांची व महाराजांची मूळ भेट १८३८ त पेण मुक्कामीं झाली व तेव्हां पासून यांनीं महाराजांच्या सांनिध्यांत सर्व काळ घालविला. हे उत्कृष्ट भजनकार असल्यामुळें ह्यांच्या भजनांत महाराज तल्लीन होत व त्यांच्या वांचून महाराजांस चैन पडत नसे. त्यामुळें भजनाच्या प्रेमरंगांत इतका सुद्धां कमी पणा आला नाहीं. मंडळीकरितां २०–२५ पेले कॉफी तयार करण्यांत आली होती पण वेळ बराच झाला म्हणून कॉफी करणारे गृहस्थ निद्रावश झाले व इतर मंडळींनेंहि त्यांचेंच अनुकरण केलें. पुढें ३–३॥ च्या सुमारास महाराजांनीं भजनांत असलेल्या तीन इसमापैकीं एकास कॉफी आणण्यास सांगितलें, तो पेटीवर होता व ती थांबवून तो जाऊं लागला त्यावर महाराज म्हणाले 'नको पेटी बंद करूं नको' मंडळी जागी होईल." तेव्हां तो विचारांत पडला कीं पेटी चालू ठेवावी कीं कॉफी आणावी. ह्या विचारांत आज्ञेप्रमाणें पेटी चालूच ठेवावी हाच विचार कायम झाला व त्यानें सुरवात केली तोंच एक इसम बाहेरील सोप्यांतून अनायासे आंत आला त्याला कॉफी आणण्यास सांगितलें; त्यानें चौघांस चार पेले आणले व ते परत ठेऊन तो निजला. भजनास पुनः सुरवात झाली व थोड्याच वेळानें नंतर बाहेरील मंडळीपैकीं एक एक असे येऊन भजनांत सामील झाले व एक दोन अभंग म्हणून मंडळी कॉफीकडे निघाली तों काय पातेल्यांत एक थेंबहि नव्हता म्हणून जो तो जाग्यावर बसला. महाराजांनीं त्यांना म्हटलें कांरे! भजन करायाला मागें मागें व कॉफीला मात्र तयार? इतकें म्हणून भजन जोरानें करण्याची आज्ञा केली. पूर्वी म्हटल्याप्रमाणें भजन उजाडेपर्यंत चाललें व जे आरंभापासून शेवट पर्यंत नव्हते त्यांना प्रथम बजाविल्याप्रमाणें कॉफी मिळाली नाहीं. २०–२५ पेल्यापैकीं जणूं काय मोजून ४ च पेले कॉफी रहावी व बाकींची नाहींशी व्हावी हें आश्चर्य नव्हे काय?

(१०) शके १८४० च्या गोकुळ अष्टमीच्या काल्याच्या दिवशीं दोनप्रहरीं १२-१ वाजतां रा. गोपाळ रघुनाथ राजे ह्यांच्या येथें महाराजांच्या दर्शनाकरितां रा. यशवंत धोंडदेव गुप्ते आले होते. दर्शन घेऊन ते परत जाऊं लागले तेव्हां महाराजांनीं सांगितलें कीं "घरीं जातोस तर नैवेद्याकरितां चिबूड व काकडी घेऊन ये बरें." आज्ञा प्रमाण म्हणून रा. यशवंतराव निघाले. खिशांत पैसे नसल्या कारणानें महाराजांस न कळतां त्यांनीं तेथून ओळखीच्या इसमाकडून ४ आण्याचे पैसे घेतले. व परस्पर बाजाराकडे गेले. ती बाजाराची-भाजी पाल्याची-वेळच नव्हती. तरी पण हे गेले व पहातात तों एकच इसम पाटींत एक भलें थोरलें चिबूड व २ काकड्या घेऊन बसलेला. त्या पाटींत दुसरें कांहीं सुद्धां नव्हतें. तें पाहून रा. यशवंतरावांस आनंद वाटला व महाराजांच्या इच्छेप्रमाणें फळें मिळण्याची संधि आली म्हणून त्यांना बरें वाटलें. त्या इसमास मोल विचारितां त्यानें बिन दिक्कत १२ आणे सांगितलें व जवळ तर खिशांत चार आण्याचे पैसे. घरीं जाऊन पैसे आणावे तर घर लांब व इतकें करून माल विकून हा इसम मोकळा होऊन गेला तर? ओळखीचा इसम अशा अवेळीं भेटणें शक्यच नव्हतें तेव्हां रा. यशवंतरावांनीं विचार केला कीं यास चार आणे देऊन पहावें काय म्हणतो तें; हा विचार येतांच त्यांनीं त्याला तसें विचारलें व त्यानेंहि अंमळ विचार करून घ्या म्हटलें. तीं फळें घेऊन रा. यशवंतरावांनीं महाराजासमोर ठेविलीं. अशा अवेळीं त्याच वस्तू खिशांत असणाऱ्या पैशालाच मिळाल्या हें ह्यांतील रहस्य.

(११) एका सणाचे दिवशीं महाराजांकरितां पुरण पोळी करावी असा रा. गोपाळ रघुनाथ राजे व त्यांच्या कुटुंबाचा संकल्प झाला व त्याप्रमाणें त्यांनीं आपला मनोदय महाराजांस कळविला. तें ऐकून महाराज हांसले. हांसण्याचें कारण विचारितां " विशेष कांहीं नाहीं सहज हांसलों " असें म्हणून त्यांनीं ती वेळ टाळली. पुढें योग असा आला कीं त्या ठराविक सणाच्या दोन दिवसांपूर्वींच महाराजांस पेण येथें जावें लागलें. त्या सणास महाराज नाहींत व त्यामुळें आपली पुरणपोळीच्या प्रसादाची मनःकामना पूर्ण करितां येत नाहीं म्हणून रा. राजे व त्यांच्या कुटुंबास वाईट वाटलें; परन्तु त्यांनीं असें ठरविलें कीं पोळ्या करून महाराजांच्या तसबिरीला नैवेद्य दाखवून आपली मनीषा अल्प प्रमाणानें तरी पुरी करावी व त्याप्रमाणें त्यांनीं तसें केलेंहि. पुढें कांहीं कालानें महारा-

जांचें दादरास येणें झालें. क्षेमकुशल विचारून झाल्यावर रा. राजे व त्यांच्या कुटुंबास म्हणाले कीं "अरे ते दिवशीं तुम्हीं पोळीचा नैवेद्य मला दाखविलांत तो मला पोहोंचला बरें." हें ऐकून आपला हेतु परिपूर्ण झाल्याबद्दल व महाराजांच्या अंतर्ज्ञानाबद्दल कौतुक वाटून त्या उभयतांस आनंद झाला.

(१२) संसाराचा गाडा चालवितांना किरकोळ संकटें येतातच व त्याप्रमाणें रा. राजे त्यांत सांपडून काळजींत होते. महाराजांनां कळलें तर योग्य नाहीं म्हणून रा. राजे वरपांगीं कांहीं नाहीं असें दाखवीत पण मनांतून चलबिचल होतीच. अशा स्थितींत रा. राजे स्नान करून आले व महाराज होते त्या खोलींत धोतर नेसण्यास गेले. महाराज दोघां गृहस्थांजवळ त्यावेळीं कांहीं बोलत होते. इतक्यांत ते रा. राजे यांस म्हणाले कीं "अरे भीतोस काय पैशाची काय किंमत आहे. कोपरानें खणीन तर पैशाचा ढीग पाडीन, घाबरूं नकोस" ते जवळील गृहस्थ चपापले व रा. राजे यांना अंतरींची खूण पटली.

(१३) एकदां महाराजांचा दादरहून पेणेस जाण्याचा बेत झाला. बरोबर कल्याण येथील रा. केशवराव दळवी यांस नेण्याचें ठरलें. त्याप्रमाणें ते दादरास आले. त्यादिवशीं सकाळीं रा. राजे ह्यांनीं महाराजांस खर्चास लागणारे पैसे आपल्या कुटुंबाजवळ देऊन ठेविले व महाराजांस विनंति केली कीं मी कचेरीस जात आहें तर घरांतून पैसे घ्यावेत. त्यावर महाराज ह्मणाले "नको. मी पैशाची तजवीज केली आहे." तोंच ॲग्युमिक्श्चरवाले रा. कर्णीक व रा. त्र्यंबकराव कुलाबकर मुंबईहून महाराजांच्या दर्शनास आले. क्षेम कुशल विचारणें झाल्यावर महाराजांनीं सांगितलें" आम्हीं आज पेणेस जातों आहोंत पैसे दे पाहूं" रा. कर्णीक खिशांत हात घालून सर्व पैसे बाहेर काढूं लागले, त्यावर महाराज म्हणाले तुझ्या नोटीचें विंडोळें तुलाच ठेव. बंडीच्या खिशांत सुटे पैसे असतील तितके पुरे," इतक्यांत रा. राजे बाहेर आले व त्यांनीं हा प्रकार पाहिला तेव्हां त्यांच्या ध्यानांत आलें कीं महाराज तजवीज केली म्हणाले तीही. कर्णिकांनीं सुटे पैसे पुढें ठेविले. मोजून पहातां दोघांच्या वाट खर्चापुरतेच ते होते. अस्तु, रा. केशवरावकडे ते देऊन महाराज ठरल्याप्रमाणें पेणेस गेले.

(१४) केव्हां केव्हां महाराज १०–१५ दिवस पर्यंत सारखे तापानें बेफाम पडत, तें इतकें कीं ज्यांनीं स्नानावांचून एक दिवस देखील जाऊं दिला नाहीं ते दिवसाचे दिवस स्नानांवांचून रहात, परंतु चमत्कार असा होत असे कीं पाय चेपतां

चेपतां पहावें तों एक पाय अति उष्ण तर दुसरा पाय अति थंड लागावयाचा व दुसऱ्याच क्षणीं दोन्ही पाय सारखे गरम व्हावयाचे.

दुसरें असें कीं १०–१५ दिवसांनीं ताप निघाला कीं तावडतोब दुसऱ्याच दिवशीं महाराज अगदीं गार पाण्यानें स्नान करीत व जेवणास पक्वान्नें खात. साधारणतः पहातां असा १०–१५ दिवसांचा ताप निघाला कीं मग ऊन पाण्यानें बेतानेंच स्नात करून जेवण देखील विशेष जड नसेल असें असावयाचें पण महाराजांचें सर्व कांहीं विलक्षणच. हें काय असेल बरें ? बोलून चालून परोपकारार्थ योग सामर्थ्यानें दुसऱ्याचें दुखणें उसने आणून पांघरुणासारखें अंगावर घेतलेलें तें दूर सारितांच मूळ निकोप प्रकृतीच शिल्लक राहून त्या प्रकृतीस अनुरूप असे व्यवहार सुरू होत हेंच उघड सिद्ध होतें.

(१५) शके १८४० त महाराज पेणचे कै. सीताराम बापुजी मोकाशी यांच्या येथें गंगा पूजनाकरितां गेले होते. जातांना रा. यशवंत धोंडदेव गुप्ते ( दादर ) यांस "तूं गंगापूजनास अवश्य ये" असें सांगून गेले होते. त्याप्रमाणें आपल्या मनांत रा. यशवंतरावानें जाण्याचा निश्चय केला होता, परंतु गंगापूजनाचे दोन दिवसा पूर्वीच त्यांच्या ऑफिसांत कामाचा चेप आला तो इतका कीं, वरिष्ठांकडे रजा मागण्यास त्यांना धैर्य होईना. काय करावें हें त्यांना सुचेना; न जावें तर, 'हो' ह्मणून कांहीं तरी सबब काढून आला नाहीं असें महाराजांस वाटेल काय ? वगैरे विचार मनांत आले. शेवटीं त्यानीं असें ठरविलें कीं महाराजांस पत्र लिहून कळवावें कीं रजा मिळणें शक्य नाहीं सबब येतां येत नाहीं. असा विचार करून ते पत्र लिहिण्यास बसले. प्रारंभ करितांच त्यांस शंका प्राप्त झाली कीं "रजा मिळणें शक्य नाहीं" हें अनुमान आहे सत्य नव्हे. रजा विचारून न मिळाल्यास तसें म्हणणें सत्य होईल. असें मनांत येऊन त्यांनीं तें तसेंच ठेविलें व ऑफिसांत जाऊन वरिष्ठांकडे खरें कारण सांगून रजा मागितली. एका क्षणाचा विचार न करितां वरिष्ठानें "बरें आहे जा, दोन दिवसांची रजा दिली आहे," असें उत्तर दिलें. त्या सरशीं बोटीचा रस्ता धरून रा. यशवंत राव पेणेस जाऊन महाराजांच्या चरणांजवळ हजर झाले. यावरून असें सिद्ध होतें कीं संतांच्या इच्छा केवळ आज्ञाच होत व त्या सर्वत्र पाळल्या जातात; व दुसरें असें कीं अनुमान हें असत्यांत जाण्याचा संभव असतो हा धडा सहज शिकविला.

(१६) कल्याण येथें रा. नानासाहेब घाटवळ पोलिस इन्स्पेक्टर यांच्या येथें विशेष प्रसंगीं गायनाचा जलसा होता. त्यावेळीं मंडळीस पान सुपारी देऊन अत्तर लाविलें, महाराजांनीं हाताचा वास घेतला व तोंड वांकडें करून म्हणाले "काय रे हें अत्तर चांगलें नाहीं." अत्तर होतें चांगल्यापैकींच तेव्हां नानासाहेबांस स्वाभाविक वाटलें कीं महाराज सहज विनोदानें असें म्हणत असतील म्हणून ते तसेंच पुढें इतर मंडळीस अत्तर लावूं लागले, तरी पण महाराज तोंड मुरडून " अत्तराचा वास चांगला येत नाहीं रे " असें नानासाहेबांस पुनः पुनः म्हणवून दाखवीत; तेव्हां हें काय गूढ आहे हे नानासाहेबांस उमगेना. त्यांनीं आपल्या हाताला तें अत्तर लावून वास घेतला तर अत्तर सुरेख पैकींच होतें. मग महाराज असें कां ह्मणतात बरें, हा विचार त्यांचे मनात येतो आहे तोंच त्यांना चट्कन स्मरण झालें कीं त्या दिवसाच्या उत्सवाकरितां ह्मणून खास निराळें चांगलें अत्तर त्यानीं खरेदी केलेलें तसेंच त्यांच्या कोटाच्या आंतल्या खिशांत राहून गेलें. इतकें स्मरण नानासाहेबांस होतांच महाराजांच्या अंतर्ज्ञानाबद्दल आश्चर्य वाटलें व त्यांनीं तें अत्तर महाराजांस लावून इतर मंडळीस लाविलें. वास घेतांच महाराज म्हणाले कीं "यास वास चांगला आहे रे." महाराजांनीं पाहिलें कीं याची आतां विशेष वाच्यता होऊं देऊं नये ह्मणून गोष्ट फिरवून थट्टा करून मंडळीत हंशा पिकविला व गायनास प्रारंभ करण्यास आज्ञा केली.

हे वर दिलेले सर्व चमत्कार अथवा महाराजांनीं दिलेले धडे साधारण जनांस मनन करण्यासारखे आहेत. या गोष्टी प्राकृत जनांस बोधपर होत. प्रत्येक दाखल्यांत कांहीं तरी गुप्त सार भरलेलें आहेच. ह्या धड्यांचें मनन करून त्यांतील रहस्याचा निदिध्यास केल्यास हे संत काय देणार नाहींत. तुलशीरामायणांत ह्मटलें आहे कीं:—

संतनको जु प्रभावहि ऐसो ।
जो कोउ आवत है उनके ढिग ।
बाहि सुनावत शब्द संदेसो ।
ताहिको तैसेहि औषधि लावत ॥
जाहिको रोगहि जानत जैसो ।
कर्म कलंकहि काटत है सब ।
शुद्ध करे पुनि कंचन तैसो ।

सुन्दर वस्तु विचारत है नित ।
संतनको जु प्रभावहि ऐसो ॥

या उक्तीप्रमाणें सत्पुरुष हे ब्रह्माच्या सगुण मूर्ति–अवतार होत. इतकेंच नव्हे तर ज्यांची भूमिका तयार झाली असेल त्यांस परब्रह्म स्वरूपीं नेण्यासहि या सत्पुरुषांचें अंगीं सामर्थ्य असते.

जो परब्रह्म मिल्यो कोउ चाहत ।
तो नित संतसमागम कीजे ।
अंतरमेटि निरंतर व्है करि ।
ले उनको अपनो मन दीजे ।
वे मुखद्वार उचार करे कछु ।
सो अनयास सुधारस पीजे ।
सुंदर शूर प्रकाश भयो जब ।
और अज्ञान सबे तम छीजे ॥

( सुंदरविलास. )

---

## प्रकरण १२ वें

# अखेर साधिली.

गेले बहुत वैभवाचे । गेले बहुत आयुष्याचे ॥
गेले अगाध महिमेचे । मृत्युपंथें ॥
असो ऐसे सकळही गेले । परंतु एकचि राहिले ॥
जे स्वरूपाकार झाले । आत्मज्ञानी ॥

दासबोध द. ३ स. ९

[ १ शके १८४० चा श्रावणमास. २ अखेर. ]

१ महाराज तीर्थयात्रेशिवाय बहुधा अन्य ठिकाणीं जास्त दिवस रहात नसत. तीर्थयात्रा करून परत आल्यावर मुम्बईस ठाकुरद्वारीं किंवा भिवंडीस श्रीमंत भाऊ साहेब धनवटवर यांजकडे रहात. अलीकडे अलीकडे १०–१२•वर्षांत लांबवर

फिरणें महाराजांस होत नसे. सुमारें पांच वर्षांपासून तर पनवेल, पेण, भिवंडी कल्याण मुम्बई व दादर यांपैकीं कोठें तरी एका ठिकाणीं मुक्काम करून असत. मुंबईस ठाकुरद्वारीं असतां यांचें भोजन ह. भ. प. विष्णु चि. अत्रे ऊर्फ अत्रे-बुआ यांजकडे होत असे.

कांदेवाडींतील उरणकरांचे चाळींत रा. दत्तात्रेय महादेव वढावकर–प्रसिद्ध पगडबंद–यांच्या घरीं स्नानसंध्या करीत व रात्रौ ठाकुरद्वारनजीक रा. ब. वैद्यांचे वाडींतील श्रीविठ्ठलमंदिरांत निजत. अलीकडे शके १८३८, ३९ व ४० या तीन वर्षी चातुर्मासांत दादर येथें त्यांचें राहणें होत असे. १८३८ सालीं रा. गोविंद नारायण राजे यांजकडे होतें. शके १८३९ व ४० सालीं चातुर्मासांत रा. गोपाळरावांकडे होते. या दोन्ही वर्षी गुरुपौर्णिमेचा उत्सव फारच थाटानें, प्रेमानें व आनंदानें होत असे. अशा रीतीनें ज्यांचा काल महाराजांचे सेवेंत व समागमांत गेला ते धन्य होत. यांच्या समागमांत मंडळीस अनेक साधुसंतांचा परिचय झाला असून त्यांच्या पुण्यप्रभावानें त्यांच्या पश्चात्‌हि संतसमागम घडत आहे. वास्तविक 'पश्चात्' शब्द महाराजांसारख्याविभूतीला लागतच नाहीं. हें बोलणें केवळ देहदृष्ट्या जनसमजुतीकरितां होय कारण—

"आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां ।
तो जाहला सोहळा अनुपम्य ॥"

ह्या तुकोबांच्या उक्तीप्रमाणें संतांचें मरण देहांत असतांनाच झालेलें असतें. वस्तुतः संत अमर असून कार्यकारणपरत्वें जगाच्या कल्याणासाठीं देह पालटून पुनः पुनः येत असतात.

महाराजांचें इहलोकींचें आगमन केवळ नामस्मरणाचा महिमा वाढविण्याकरितांच होय असें एकंदर त्यांच्या जीवनवृत्तावरून कळून येईल. ईश्वरनामस्मरणाचे दोन प्रकार; एक सकाम व दुसरा निष्काम. मनुष्य संकटांत विपत्तींत असतां अगर एखादें कार्य हातीं घेतल्यावर त्यांत यश प्राप्ति व्हावी व इच्छित वस्तु साध्य व्हावी एतदर्थ नामस्मरण त्या वेळेपुरतें नेटानें करीत असतो. अशा प्रकारचें नामस्मरण सर्व साधारणपणें नेहमीं होत असतें. बहुजनसमाज याच मार्गाचें अवलंबन करितांना आपण पाहातों. श्रीकबीरांनीं म्हटलें आहेच.

दुखमें समरन सब करे ।
सुखमें करे न कोय ॥
जो सुखमें समरन करे तो ।
दुःख कहांसे होय ॥ १ ॥
सुखमें समरन ना किया ।
दुःखमें किया याद । °
कहे कबीर तो दास की ।
कोन सुने फरियाद ॥ २ ॥

संतमंडळीचा नामस्मरणाचा प्रकार वरप्रमाणें नसून केवळ निष्काम असतो. त्याबद्दल त्यांना ईश्वराजवळ कांहींच मागणें नसतें. अर्थात अंतःकरणावर वृत्तीच उठत नसतात व समाधानाखेरीज तेथें कशाचाहि रिघाव होणें शक्य नसतें. याप्रमाणें नामस्मरण वाढविण्याचा प्रभाव, अज्ञजनांस ज्ञानामृत पाजून त्यांच्यामध्यें भक्तिभाव वाढविण्याची शक्ति, व सगुण आणि निर्गुण उपासनेच्या मार्गांत अधिकारानुरूप भक्तवर्गाची गति वाढविण्याची कला वगैरे लोकोत्तर गुण महाराजांचे अंगीं वसत होते,व त्यांचे तेजःपुंज किरण चहूंकडे पसरले होते.याप्रमाणें महाराजांचें इहलोकींचें कर्तव्य १८४० पर्यंत अव्याहत चाललें होतें; परंतु आमच्या दुर्दैवानें त्यांची समाधिवेळा याच वर्षी जवळ आली. ती वेळ ह्मणजे १८४० मधला भाद्रपद महिना, महाराजांच्या प्रत्येक भक्ताला चिरसंस्मरणीय आहे. दिव्याची ज्योति जातांना मोठी होते त्याप्रमाणें या श्रावण महिन्यांत महाराज निरतिशय प्रसन्नवृत्तींत होते. इतकी प्रसन्न मुद्रा व प्रेममय वर्तन तत्पूर्वी कधींच अनुभविण्यांत आलें नव्हतें. भजनांत ते तत्पूर्वी प्रसन्नवृत्ति असत पण या वेळची प्रसन्नता अगदीं अनुपमेयच होती. त्या प्रसन्नतेस उपमा देणें म्हणजे “ सागरः सागरोपमः ” या न्यायानें तीच ती वृत्ति इतकेंच ह्मणून स्तब्ध बसलें पाहिजे. प्रेमानें डवडवलेला तो आनंदी चेहरा. कै. रा. गोपाळ रामचंद्र कुळकर्णी—महाराजांचे आवडते प्रसिद्ध भजनकार—यांचें दररोज काकडआरतीसह नियमानें होत असलेलें तें भजन, झांज, पेटी व मृदंग यांच्या सुरांत ती तल्लीन वृत्ति, शिष्यवृंदाबरोबर तीं सहभोजनें व पारमार्थिक चर्चा, कांसवीप्रमाणें शिष्यमंडळावर कृपादृष्टि अशा आ-

टीपः—रा कुळकर्णी १८४१ च्या आश्विन महिन्यांत कैलासवासी झाले.

जन्म लक्षांत रहाण्यासारख्या अनेक गोष्टी ह्या महिन्यांत घडल्या. यापूर्वी महाराजांनीं आपल्या सभोंवती आरती ओंवाळून घेतल्याचें कोणाच्याहि स्मरणांत नाहीं. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं ह्या महिन्यांत आरती ओंवाळून घेण्याचे अनेक प्रसंग आले. भजनांत नाचणें, उड्डाणें घेऊन भूःभूःकार करणें व मोठमोठ्यानें "रामा" "रघुपते" "विठोबा" "मारुते" अशा करुणस्वरानें ईश्वरास आळविणें व असें आळवीत असतां त्या त्या देवतांस मिठ्या मारणें वगैरे गोष्टींचें स्मरण झालें ह्मणजे तो काल दिव्याची ज्योति जातांना–नाहींशी होतांना–मोठा प्रकाश होण्याचाच होता यांत संशय नाहीं. ह्या कालाचें स्मरण झालें, म्हणजे अंतःकरण भरून येतें. अशा अवर्णनीय प्रकारानंतर थोड्याच अवकाशांत महाराजांचा वियोग झाला त्या प्रसंगाची आठवण पडली म्हणजे हृदय दुभंग होऊन शून्यवत् स्थिति होते. या श्रावण महिन्यांतील भजनांत उड्डाणें घेतांना महाराजांचे मस्तकाभोवतीं लख्ख विजेसारखा प्रकाश पडे. हा उजेड नेहमीं पडणाऱ्या प्रभेपेक्षां जास्त तेजस्वी असा असे. ह्या आनंदमय वृत्तीचा लाभ या प्रांतांतील मंडळीप्रमाणेंच धुळें नजीक सोनगीर येथील श्रीसद्गुरु गोविंदबाबा ऊर्फ बापजी यांचे गादीवर हल्लीं असलेले श्रीकेशवदत्त यांनांहि मिळाला –महाराजांच्या दर्शनार्थ केवळ हे दादर येथें बुद्ध्या आले होते. महाराजांचा व गोविंदबाबांचा विशेष प्रेमसंबंध असल्यामुळें यांची आपल्या शिष्यवर्गाकडून पाद्यपूजा करवून व श्री गोविंदबाबास योग्य मान ह्मणून श्री केशवदत्तांना आपल्या शेजारीं आसन देऊन फलाहारसमारंभ केला होता. त्या वेळचें तें आनंदस्वरूप आपल्या दृष्टीसमोरून अंतर्धान पावल्याबद्दल खेदजनक उद्गार ते अद्यापि काढीत आहेत. यांना व मुंबईचे एका ब्यारिस्टरास एकाच भेटीनें हा असा चटका लागला, तर ज्या शिष्यवर्गास व भाविक जनांस सबंध श्रावण महिना महाराजांचे सानिध्य भोगण्यांत मिळाला त्यांची अवस्था काय होत असेल याची फक्त कल्पनाच करावी. अशा आनंदमय तल्लीन वृत्तींत महाराज रममाण झाल्यावर त्या भरांत त्यांना आपल्या अवतारसमाप्तीच्या कालाचें निखालस विस्मरण झालें; अशा परिस्थितींत आदिनाथ श्री साईबाबा ( शिरडी ) यांना महाराजांना स्मरण द्यावें लागलें असें पुढें नमूद केलेल्या प्रसंगावरून वाटतें.

२ याच श्रावण महिन्याच्या वद्यपक्षाचे अखेरीस मुंबईहून दोन पारशी गृहस्थ दादरास महाराजांचा शोध करीत आले. महाराजांचें नांव सुद्धां पूर्वीं त्यांनीं

ऐकिलेलें नव्हतें. दादरास येऊन शोध करितां–राममारुति या नांवानें शोध करितां–त्यांना महाराजांचा पत्ता लागला. चरणावर मस्तक ठेवून गळ्यांत फुलांचे हार घातले व हात जोडून सामोर उभे राहिले. व प्रार्थना केली कीं, "श्री साईनाथ महाराज ( शिरडी ) यांचा आम्हांस असा दृष्टांत झाला आहे कीं आतां मजकडे येण्याचें तुम्हांस कारण उरलें नाहीं, दादर येथें राममारुति म्हणून संत आहेत त्यांचें दर्शन यापुढें घेत जा. तर आम्हा पामरांवर कृपादृष्टि असावी. या दृष्टांतांत श्री साईनाथ महाराजांकडून काय संदेश आला असेल तो त्यांचा त्यांसच ठाऊक; इतकें खरें कीं वरील प्रमाणें प्रार्थना ऐकतांच महाराजांची चर्या एकदम पालटली व एखाद्या विस्मृत गोष्टीचें स्मरण व्हावें अशी त्यांची वृत्ति बनली. 'आतां ह्या पुढेंहि असाच दर्शन लाभ घडावा" अशी प्रार्थना करून ते पारशी गृहस्थ गेल्यावर महाराजांच्या वृत्तींत विलक्षण फरक दिसूं लागला.

आपल्या पश्चात् राममारुति महाराजांनीं आपलें कार्य पुढें चालवावें किंवा आपणा दोघांचाही प्रयाणकाल समीप आला आहे, चला तयारीस लागा अशा आशयाचा तर हा अंतर्गत संदेश नसेल ना? कारण दोघेही जवळ जवळ बरोबरच—केवळ १८ दिवसांचे फरकाने—निर्गुण रूपी झाले. कसेंही असो महाराजांनीं देह विसर्जनाचा बेत मात्र निश्चित केला यावरून श्रीरामरायास आपल्या अवतार कार्याचे भरांत अवतार समाप्तीच्या वेळेचें स्मरण न राहिल्यामुळें यमरायास ब्राह्मण वेषानें श्रीरामचंद्र प्रभू समोर उभें रहावें लागलें व रामानें अवतार समाप्ति केली या गोष्टीचें स्मरण होतें.

यापूर्वी महाराजांचा बेत शिष्य वर्गासह दिपवाळीस पंढरीरायाच्या दर्शनास जाण्याचा होता यावरून त्यांना देह विसर्जनाच्या काळाचें विस्मरण झालें होतें खरें. परंतु ह्या नंतर मात्र तो बेत कायम झाल्याचें निदर्शनास आलें. तो शोकदायक प्रसंग पाऊण महिन्यानेंच केवळ घडवून देहांतर्गत पंच महाभूतांवर संत कसा तावा चालवितात हें महाराजांनीं पटवून दिलें.

संत मरणास मुळींच भीत नाहींत उलट ते त्याचा आनंदच मानितात कारण उघडच आहे कीं ह्या शरीरात असतांनाच—

"आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां।
तो जाहला सोहळा अनुपम्य ॥"

या आनंदमय स्थितीचा त्यांनीं प्रत्यक्ष अनुभव घेतलेला असतो त्यांना "देह पाचांचा पांच जण नेतील" ह्या स्थीतीला भिण्याचें कारणच नाहीं. ठरलेल्या दिवशीं व ठरलेल्या ठिकाणीं आनंदानें ईश्वर नाम स्मरणांत महाराज स्वस्वरूपीं लीन झाले. ती हकीकत अशीः—

श्रावण संपतांच भाद्रपद शुद्ध तृतीयेला महाराज दादरहून कल्याणास जाण्याला निघाले. जाण्या पूर्वीं त्या श्रावण महिन्यांत ज्यांच्या ज्यांच्या घरीं महाराज होते व जेथें जेथें भजनोत्सव झाले होते तेथें तेथें जाऊन हातांवर दहीं साखर मागून घेऊन त्यांचे निरोप घेतले. दहीं साखर हें निरोप देण्याचें चिन्ह आहे खरें परंतु ह्यापूर्वीं एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं प्रयाण करितांना दहीं साखर मागितली नव्हती व तो त्यांचा परिपाठहि नव्हता. जातांना फक्त विचारून जात. पण हा प्रकार अगदीं वेगळाच झाला. यांतील मर्म इतकेंच नाहीं कां? कीं या स्वरूपांत पुनश्च दादरास येणें होणार नाहीं ! !

साधारण मनुष्यास मरणाचा समय कळला तर त्याची पांचावर धारण बसावयाची, परंतु महाराजांसारख्या धर्मवीरांना उलट आनंद वाटणें हेंच साहजिक कारण यांचें ध्येयच हें आहे कीं हा देह—जीर्ण झालेला देह—सोडून जातो केव्हां व सकल जनकल्याणाकरितां पुनः पुनः परत भूतलावर येतो केव्हां.

याप्रमाणें गणेश चतुर्थी करितां महाराज आपल्या वडीलांचे मामा कै. रा. माधवराव खारकर यांच्या घरीं कल्याण येथें आदले दिवशीं म्हणजे तृतीयेस आले. गणेश उत्सवांत तेथील शिष्य वर्गाकडे व भाविक लोकांकडे कीर्तनास व भजनास गेले. नेहमी प्रमाणें भजनांत नाचणें उड्डाणें घेणें वगैरे प्रकार करून गणेशोत्सव आनंदांत पार पाडला. अनंत चतुर्दशीच्या दिवशीं कल्याणासच रा. पांडुरंग वामन उर्फ तात्यासाहेब दुर्वे यांजकडे भोजनास होते. शनिवार भाद्रपद वद्य प्रतिपदेचे दिवशीं रा. रामचंद्र गजानन कणेकरांकडे उपवासाचे म्हणून सकाळींच गेले. दोन प्रहरी ३ वाजतां तापाची भावना झाली म्हणून तत्काळ ४ वाजतां टांग्यांतून आपले शिष्य रा. केशवराव दळवी यांच्या वाड्यांत गेले. रात्रीं ताप मनस्वी चढला व रविवारीं तर त्यानें आपल्या माऱ्याची शिकस्त केली. महाराजांना ताप मधून मधून येत असे त्याप्रमाणेंच हाहि असेल अशी प्रथमतः सर्वांची कल्पना झाली. याप्रमाणें वद्य ८ मी पर्यंत असा तापाचा जोर कमी जास्त प्रमाणानें होताच. वद्य ८ मीस शुक्रवारीं सायंकाळीं महाराजांनीं त्यांचे शिष्य रा. शिवराम गणेश गुप्ते यांस तांतडीनें

बोलावून आणविलें. यांचें महाराजांकडे रोज नित्य नियमानें येणें असे, पण येवढें उतावळीचें आमंत्रण येतांच ते व दुसरे शिष्य रा. वामन रामचंद्र प्रधान रा. केशवरावांच्या वाड्यांत गेले. महाराजांची प्रकृति पाहिली तों ताप बराच होता. त्यांना विचारतां "विशेष कांहीं नाहीं" असें उडवाउडवीचें उत्तर मिळालें. इतक्या तांतडीनें बोलाविलें आहे तेव्हां कांहीं तरी विशेष आहे असें वाटून डॉक्टर वगैरे आणविले व नित्याप्रमाणें औषधोपचार चालू ठेविले. त्या रात्रीं महाराजांजवळ वरील तिघे शिष्य व रा. त्र्यंबक खंडेराव कुळकर्णी नांवाचे गृहस्थ असे चौघे सेवेस होते. नऊ वाजतां प्रकृति भीतिप्रद झाली, व बसतां येत नसतांना सुद्धां औषध दूध वगैरे बसून घेत. यामुळें त्रास होतो व तो अनर्थावह आहे तेव्हां दुध पिणें वगैरे निजूनच झालेलें बरें म्हणून पुष्कळ समजावून सांगितलें, परंतु त्याचा कांहीं सुद्धां उपयोग झाला नाहीं. रात्रभर दुध वगैरे बसूनच घेत. घटकेघटकेनें किती वाजले म्हणून विचारीत व असें होतां होतां बारावर एक वाजल्याचें सांगतांच "हं मारुति" असें म्हणून मुद्रा प्रफुल्लित केली. "मारुति" हें शनिवाराचें नांव हें चाणाक्ष वाचकांच्या ध्यानांत असेलच. इत्यर्थ असा कीं "हं शनिवार लागला." नतर कांहीं तरी लिहून ठेवावयाचें आहे अशी त्यांनीं अडीचाच्या सुमारास इच्छा दर्शविली; हें ऐकतांच जवळील शिष्यांची वृत्ति दुःखमय झाली. कांहीं तरी लिहून ठेवायाचें ह्मणजे पुढील दुःखद चित्र मूर्तिमंत उभें राहिलें. हा अकस्मात् प्राप्त झालेला निरवानिरवीचा प्रसंग, पण आज्ञेपुढें चालतें कोणाचें? रा. शिवरामभाऊ गुप्ते कागद घेऊन लिहीत बसले. त्यावेळीं महाराज पूर्ण शुद्धींत होते; व त्यांनीं आपल्या ईश्वरनाम भाषेत सांगावयास प्रारंभ केला. आपलीं वस्त्रें व हातांतील सोन्याची आंगठी वगैरे जिन्नस पनवेल येथील श्रीलक्ष्मीनारायणाचे मंदिराकडे देणें; कवाड येथील श्री सखाराम महाराजांचे समाधीकडे सालीना देणगी; भिवंडी येथील अनाथ सहायक फंडास सालीना देणगी व पेण येथील श्रीराममन्दिराकडे शंभर रुपये देणें इत्यादि आज्ञा करण्यांत आल्या. हें सारें लिहून झाल्यावर त्यावर स्वहस्तें "श्रीराम" ही नाममुद्रा करून तो कागद शिष्यांचे स्वाधीन केला. नंतर प्रत्येक शिष्यास पुढें कसें वागावें, काय करावें, वगैरे पृथक् पृथक् उपदेश केला. नंतर पांच पांच मिनिटें दोन शिष्यांचे मांडीवर शिर ठेविलें. त्यावेळीं शिष्यांच्या वृत्ति द्विधा झाल्या होत्या. महाराजांचा लवकरच वियोग होणार म्हणून शून्यवत् होणें

च महाराजांचा तो प्रेमपूर्ण उपदेश ऐकून समाधान वाटणें या दोन परस्पर विरोधी वृत्तींचे तरंग येत जात होते. तरी पुढील प्रसंग डोळयांसमोर मूर्तिमंत उभा राहून जी मनाची स्थिति होत होती त्या स्थितीचें वर्णन लिहून करणें अशक्यच होय. शिष्यांची ही स्थिति अवलोकन करितांच महाराजांनीं "सपातळ आड लावणें" ह्याप्रमाणें युक्ति योजून शिष्यांस भ्रमांत पाडिलें. मागें ज्यांचा निर्देश केला आहे ते रा. गोपिळ रामचंद्र कुळकर्णी त्यावेळीं नागोठण्यास होते त्यांना तार धाडून लागलेंच वोलावणें पाठवावें अशी महाराजांनीं आज्ञा केली व "शिवशंकर" असें उद्गारले. तेव्हां मंडळीस थोडासा धीर आला. देह ठेवणार हें तरी निश्चितच पण तो "शिवशंकर" म्हणजे सोमवारापर्यंत ठेवीत नाहींत व तोहि रा. कुळकर्णी नागोठण्याहून आल्यानंवर अशी कल्पना होऊन पूर्वींचे विचारकल्लोळ क्षणभर स्तब्ध झाले. हे दुसरे विचार कायम रहावे म्हणून कीं काय दादराहून आतांच्या आतांच डॉक्टर आणावा अशीहि दुसरी आज्ञा केली व ह्या दोन गोष्टीवरून त्याच पहांटेस ह्या नश्वर देहाचा त्याग करितील अशी शंका उद्भवली सुद्धां नाहीं, त्यामुळें मनाला थोडासा धीर वाटला व लागलेच ह्या चौघांपैकीं दोघे जण आज्ञा घेऊन ४ वाजतां निघाले व तार करून दादरास जाण्याकरितां स्टेशनवर गेले. रा. कुळकर्णी हे आपल्या घरीं गेले व महाराजांनींहि आपणास बरें वाटत आहे असें दाखविलें. जवळ राहिले असे घरचे मालक रा. केशवराव दळवी. याप्रमाणें अंतर्बहि: शांत झाल्यावर जवळच मोरीवर जाऊन आले व बिछान्यावर पडले आणि पायांपासून डोकीपर्यंत उपरणें ओढून सोहं जप इतक्या जोरानें चालविला कीं तो सूर सर्व वाड्यांत ऐकूं जात होता. अशा ब्रह्ममय निर्विकल्प समाधिस्थितींत महाराज पहाटे सव्वापांच वाजतां ब्राह्मसुमुहूर्तावर रात्रीं १ वाजतां शनिवार लागल्याचा आनंद दर्शविल्याप्रमाणें स्वेच्छेनुरूप

"मिसळे नभ नभीं कीं तेजीं तें तेज तोय तोयांत"

(मोरोपंत)

याप्रमाणें पांच जणांना आपला नश्वर देह देऊन कैवल्य पदाप्रत गेले. हा चिरकाल स्मरणांत रहाणारा दिवस "शके १८४० भाद्रपद वद्य ९ शनिवार होय."

## प्रकरण १३ वें.

# समाधिस्थान.

१ देहयात्रा मिरवणूक २ समाधि व नित्य पूजा अर्चा ३ पुण्यतिथ्युत्सवः

मागील प्रकरणांत नमूद केल्याप्रमाणें महाराज निर्गुणरूपी झाल्यावर मुंबई, ठाणें, दादर, भिवंडी पनवेल वगैरे ठिकाणीं मनुष्यें रवाना करून, पत्रें पाठवून व तारा करून महाराजांनीं नश्वर कलेवर ठेविल्याची दुःखद वार्ता कळविण्यांत आली. दोन प्रहरीं १२ ते ३ पर्यंत त्या त्या गांवची मंडळी कल्याण येथें येऊन दाखल झाली व सर्वानुमतें असें ठरलें कीं महाराजांच्या देहाचें अन्तिम कार्य स्वतंत्र जागेंतच व्हावें व त्याप्रमाणें सरकारी परवानगी मिळवून कल्याण येथील भटाळेतळ्या नजीक कोटाचे भिंतीलगतच्या जागेंत तो विधि करण्यांत आला. ही जागा रा.रा. जनार्दन गंगाधर प्रधान व रा.रा. बाळकृष्ण वासुदेव प्रधान हल्लीं मु० बडोदें व रा.रा शंकर रामचंद्र मेढेकर मुक्काम कल्याण यांच्या मालकीची असून या सद्गृहस्थांनीं ती मोठ्या आदरानें महाराजांच्या चरणीं अर्पण करून सेवा बजाविली. या त्यांच्या परमौदार्याबद्दल शिष्यवर्ग त्यांचा अत्यंत ऋणी आहे. तसेंच सरकारी अधिकाऱ्यांनीं विशेष आढेवेढे न घेतां परवानगी दिली हेंही त्यांना साजेसेंच झालें. महाराजांची और्ध्वदेहिक मिरवणूक रात्रीं ८ वाजतां काढण्यांत आली व शेवटचें दर्शन व्हावें म्हणून आराम खुर्ची पालखीप्रमाणें फुलांनीं शृंगारून तींत महाराजांस बसविले होते. ती मिरवणूक रोषनाईंत व नामसंकीर्तनाच्या गजरांत गांवांतील मुख्य हम रस्त्यांतून फिरवून ठरलेल्या ठिकाणापर्यंत नेण्यांत आली. या यात्रेबरोबर सर्व जातींतील गृहस्थ होते व एकंदर जमाव फार मोठा होता. ठिकठिकाणीं महाराजांस आरत्या करून फुलांचे हार घालण्यांत आले. ही मिरवणूक स्वस्थानाप्रत रात्रौ १ वाजतां पोहोंचली. व यथाविधि दहन करण्यांत आलें.

२ ज्या जागेंत दहन झालें त्या जागेंत अस्थि ठेवून वर समाधीचें बांधकाम करण्यांत आलें व छायेकरितां कौलारू छपर उभारण्यांत आलें. त्या जागीं व ज्या खोलींत महाराजांनीं नश्वर देहाचा त्याग केला त्या खोलींत त्यांचे गादीसमोर तेरा दिवस भजन करून तेरावे दिवशीं भंडारा करण्यांत आला. त्या दिवशीं शेकडों मंडळी तीर्थप्रसादास आली होती.

या समाधिमंदिरास तसेंच श्रींची नित्यपूजा अर्चा दीप नैवेद्य व वार्षिक पुण्यतिथि-उत्सवास लागणारा खर्च स्वतंत्र उत्पन्नांतून व्हावा या सद्धेतूनें सर्व भाविक गृहस्थांनीं यथाशक्ति मदत करावी अशी सार्वजनिक विनंति त्या त्या ज्ञातींतील प्रमुख गृहस्थांकडून करण्यांत आलेली आहे व त्याप्रमाणें ठिकठिकाणीं समाधि फंड गोळा होत आहे. या धार्मिक कृत्यांत ज्या प्रमुख गृहस्थांनीं पुढाकार घेतला आहे त्यांचीं नांवें खालीं विनंतिपत्राचा उतारा दिला आहे त्यावरून ध्यानांत येईल.

## श्रीसमर्थ सद्गुरु प्रसन्न.

**श्रीसमर्थ सद्गुरु राममारुतिमहाराज भिवंडीकर,** हे मिति भाद्रपद वद्य ९ शके १८४०, तारीख २८ माहे सप्टेंबर सन १९१८ शनिवार रोजीं कल्याण मुक्कामीं समाधिस्थ झाले. महाराज बालब्रह्मचारी असून सुमारें चाळीस वर्षे ईश्वरनामाशिवाय कांहीं बोलत नसत. भक्तिमार्गाचा प्रसार करण्यांत व ईश्वरनामाचा महिमा वाढविण्यांत महाराजांनीं आपलें आयुष्य खर्ची घातलें, अशा सत्पुरुषाचें स्मारक व्हावें असें महाराजांच्या परिचयांतील प्रत्येक मनुष्यास वाटत आहे, सबब कल्याण मुक्कामीं महाराजांची समाधि बांधण्याचा महाराजांचे भक्तमंडळीचा हेतु असून तेथें श्रीरामपंचायतनाची स्थापना करून नित्य पूजा, नैवेद्य वगैरे चालू ठेवण्याचा विचार आहे.

या कामीं सुमारें २०,००० रुपये खर्च येईल असा अजमास आहे. परंतु 'दसकी लकडी एकका बोजा' या न्यायानें सर्वांनीं मदत केल्याशिवाय वरील सद्धेतु सिद्धीस जाणें शक्य नाहीं. सबब प्रत्येकानें आपापले शक्त्यनुसार व इच्छेनुरूप या धार्मिक कृत्यास हातभार लावावा अशी नम्र विनंति आहे.

### सह्या.

| | |
|---|---|
| शेट खेमराज श्रीकृष्णदास | होरमसजी पालनजी मिस्त्री |
| सखाराम गणेश फडके ( ऑ. मॅ. कल्याण ) | बाळकृष्ण वामन खारकर, बी. ए. |
| | अमीदास बी. मेहता |
| प्रभाकर विठ्ठल गुप्ते ( रावबहादुर ) | दामोदर महादेव कोतवाल |
| जहांगीर वी. पटेल, बारिस्टर ॲट लॉ | परशराम रामचंद्र मेघःश्याम जोशी |
| महादेव रामचंद्र रानडे, वकील | वासुदेव गोपाळ पिंपळखरे |

त्रिभुवनदास जमनादास
द्वारकानाथ राजाराम वैद्य, बी. ए., एल. सी. ई.
कृष्णराव बळवंत प्रधान ( सब रजिष्ट्रार, मुंबई )
जिवा नारायण
द्वारकानाथ आपाजी मेढेकर
विठ्ठलदास करसनदास
गंगाविष्णुदास कृष्णदास
गणेश दत्तात्रय गोखले
सखाराम तुकाराम खैरे
गणेश लक्ष्मण सुळे
माधवराव रघुनाथ खारकर
नारायण मोरोबा घनवटकर
त्रिंबक बाळकृष्ण मराठे, डॉक्टर
महादेव बाळकृष्ण ताह्मणे, वकील
रामकृष्ण वामन गुप्ते, एल. सी. ई.
गोविंद नारायण कामथे
नारायण द्वारकानाथ रणदिवे, बी. ए. एलएल. बी.
भिकाजी मोरशेट
गोविंद गोपिनाथ जयवंत
नानाभाई गोविंद चित्रे
केशव दामोदर दळवी
गोविंद नारायण राजे
वामन सिताराम खारकर
गोपाळ यशवंत कर्णीक
गोपाळ रघुनाथ राजे
यशवंत धोंडदेव गुप्ते
गोविंद करसन रामजी ( ऑ. मॅ. कल्याण )
करसन देवजी ठक्कर
शंकर जयराम झुंजारराव
कृष्णराव बळवंत देशमुख
शिवराम नारायण कामथे
त्रिंबक निळकंठ कर्णीक ( ॲग्रुमिक्चरवाले )
विष्णु चिंतामण अत्रे
नारायण बळवंत नाचणे (श्रीगोंदेकर)
दामोदर सांवळाराम यंदे
जनार्दन गंगाधर प्रधान, बाळकृष्ण वासुदेव प्रधान } बडोदकर, समाधीस जागा देणरे.
आत्माराम गणपतराव गुप्ते
केशव शिवराम खारकर
द्वारकानाथ सिताराम टिपणीस
केशव वासुदेव कार्डे
रामकृष्ण गणपतराव गुप्ते
रघुनाथ सखाराम राजे
गंगाधर सिताराम मोकाशी
कृष्णाजी पांडुरंग तुंगारे
त्रिंबक खंडेराव कुळकर्णी
रघुनाथ पांडुरंग हजिरनीस
द्वारकानाथ पांडुरंग देशपांडे
शंकर नारायण पालकर
रामचंद्र महादेव दळवी
वामन रामचंद्र प्रधान
दत्तात्रय आत्माराम जयवंत

| | |
|---|---|
| मणीशंकर शिवशंकर | यशवंत काशिनाथ फगसे |
| गोपाळ रामचंद्र कुळकर्णी | गोविंद कृष्ण प्रधान |
| मुरार गिरधर ठक्कर | दत्तात्रय महादेव वढावकर |
| अनंत रावजी जयवंत | वामन धोंडदेव गुप्ते |
| आपाजी गणेश देशमुख | शिवराम गणेश गुप्ते |
| त्रिंबक आनंदराव कर्णीक | गजानन बळवंत टिपणीस |

कोणास आपले स्मरणार्थ जमीन किंवा ५०० रुपयांवर देणगी देण्याची इच्छा असेल तर त्याप्रमाणें महाराजांचे समाधीचे इमारतीमध्यें तसा शिलालेख ठेवण्याची व्यवस्था केली जाईल. तसेंच कोणी इमारतीचे उपयोगी पडणारें सामान अगर कांहीं उपयुक्त वस्तु दिल्यास त्यांचा आभारपूर्वक स्वीकार केला जाईल.

समाधि-मंदिराचें मदतीकरितां या चरित्र पुस्तकाशिवाय खालीं दिलेल्या पुस्तकांच्या विक्रीपासून होणारें सर्व उत्पन्न जमा व्हावयाचें आहे. तरी या कार्यास सर्वांनीं मदत करावी, अशी विनंति आहे.

( १ ) चां. का. प्रभु धर्माधिकारसंग्रह—मूळ किं. २ रु हल्लीं. ८ आणे.

( २ ) चां. का. प्रभूच्या इतिहासाचें दिग्दर्शन—मूळ किं. ४ आणे तूर्त २ आणे.

( श्रीराममारुती महाराजांचे कार्डसाइझ फोटो—प्रत्येकीं दोन आणे. पैकीं एक आणा समाधीफंडाकडे जमा होईल. वरील दोन्ही पुस्तकें मागविणारांस महाराजांचा फोटो बक्षीस देण्यांत येईल. शिवाय पोष्टेज पडेल.

समाधीफंडाकडे तसेंच पुण्यतिथ्युत्सवाकडे द्रव्यद्वारा किंवा कांहीं उपयुक्त जिनसा पाठवून मदत करणें ती फुल ना फुलाची पाकळी म्हणून सर्व भाविक जनांनीं करणें, हें त्यांस भूषणावह आहे, तरी या सुसंधीचा लाभ सर्व मंडळी घेऊन या सत्कार्यास हातभार लावितील अशी नम्र विनंति आहे.

३ महाराजांचे आजपर्यंत दोन पुण्यतिथि-उत्सव झाले. भाद्रपद वद्य १ पासून नामसप्ताहास सुरवात होऊन उत्सव नवमी पर्यंत होत असतो. दररोज प्रसिद्ध कीर्तनकारांचीं कीर्तनें, पुराणें व भजनी दिंड्यांचीं भजनें तसेंच प्रवचनें होत असतात. श्रीगणेशोत्सवांतील मेळ्यांकडूनहि या उत्सव प्रसंगी सेवा सादर करण्यांत येते. आजपर्यंत या उत्सव समयीं वगैरे महाराजांसमोर श्रीसाधु गोद-

डेबुवा, पंडित विष्णु दिगंबर पलुसकर [गांधर्व महाविद्यालयाचे मालक], कीर्तन पंडित यशवंतबुवा ब्रह्मनाळकर, श्री साधु मौलाबुवा, श्रीगोंदेकर नाना महाराज यांसारख्या विद्वान् व नांवाजलेल्या मंडळींनीं आपली सेवा सादर करण्यांत जें प्रेम व्यक्त केलें त्यावरून महाराजांच्या चरणां जवळ किती थोर थोर व विद्वज्जन निरभिमान वृत्तीनें त्यांचे गुणानुवाद गातात हें व्यक्त होतें.

महाराज शनिवारीं अहोरात्र उपोषित रहात. उड्डाणें घेणें, भुःभुःकार करणें, तसेंच श्री मारुतिरायाप्रमाणें ब्रह्मचर्यव्रत पाळून मारुतीवारी ह्मणजे शनिवारींच स्वस्थानाप्रत गमन करिते झाले म्हणून हा त्यांचा आवडता वार पुण्यतिथी-प्रमाणें प्रयाणवाराचे स्मरणादाखल भक्तवर्गाकडून पाळण्यांत येतो. महाराज निर्गुण स्वरूपीं मिलीन झाल्यापासून दर शनिवारीं त्यांच्या समाधीसमोर भजन करण्यांत येतें व रात्रौ १२ वाजतां महाराजांस आरति ओंवाळून प्रसादग्रहण करून मंडळी घरोघर जाते. हा नियम अव्याहत चालू आहे.

---

## प्रकरण १४ वें.

# स्तुति सुमनांजलि.

( श्रीराममारुतीदास–कल्याण )

श्लोक—( शार्दूलविक्रीडित. )

सद्भावें नमितों गुरूचरण मी जो तोडितो आपदा ।
काढोनी भवसागरामधुनिया जो दावितो तत्पदा ।
जाई जैं मिळतां जळीं लवण तें मूळ स्वरूपा अपा ।
तैसे सद्गुरु आत्मरूप करिती शिष्यासि होता कृपा ॥ १ ॥
शुभ्रातें पिंवळा मिळोनि त्यजिती मूळ स्वरूपास ही ।
होती लाल परी पुनश्च दिसती ना श्वेत ना पीत ही ।

---

१ भावार्थ शुभ्र रंगास जरी पिंवळ्याची संगती झाली तरी त्या शुभ्राचा पिंवळा रंग न होतां तिसराच एक लाल रंग बनतो तसेंच लोहास परिसाचा संग

होई हेम खरें परी न परिसा पावे कदा लोह कीं।
होई ब्रह्मरुपीं जरी घडतसे देहीं गुरुसंग कीं ॥ २ ॥

डॉ. त्र्यंबक बाळकृष्ण मराठे, भिवंडीः—

आर्या.

श्रीराममारुतीचा अत्युत्तम नेम जन्म अजपाचा।
असुनि प्रभू प्रभूच्या नामाचा यज्ञ वाग्विलासाचा ॥ १ ॥
श्रीबालमुकुन्दाचा शिरिं विलसे पद्महस्त कल्याण।
झालासि काय बापा सोडुनि भीमापुरीस कल्याण ॥ २ ॥
ज्याच्या वाणीवाटे शिवशिव विठ्ठलविना नयेचि कधीं।
भजनीं प्रेम अलौकिक द्या मज कांहीं असें न येच कधीं ॥ ३ ॥
श्रीरामदास्य करण्या त्रिकुटाचलपुरवरासि माराया।
प्रगटे त्रेति कलौ हा शंकर श्रीराम मारुतीराया ॥ ४ ॥
ज्या संतमहात्म्याची घडली आह्मांस सहज परिचर्या।
तत्पदिं त्र्यंबक प्रेमें अर्पितसे करुनि पांच ह्या आर्या ॥ ५ ॥

रा. रा. गोविंद कृष्ण प्रधान, पनवेलः—

श्रीगुरुराया ऐका विनंती। सद्गुरुराया राममारुति ॥ ध्रु० ॥
द्या मज स्फूर्ति तव गुण गाया। राममारुति सद्गुरुराया ॥ १ ॥
ये भजनीं रंग तईं होईन दंग। होवो भवभंग नश्वर काया ॥ २ ॥
होय कृपा जरि या दासावरि। शांति अंतरीं होइल सदया ॥ ३ ॥

अभंग.

सद्गुरु माऊली श्रीराम मारुती। निजदासावरती प्रेम फार ॥ १ ॥
पापमुक्त केलें सन्मार्गी लावीलें। ज्ञानामृत पाजिलें प्रेमभरें ॥ २ ॥
अहंकारादि रिपू ठायींच जाळिले। मन स्थिरावलें सद्बोधेंची ३ ॥

---

झाला तर त्यापासून तिसरेंच एक सुवर्ण बनतें परंतु सद्गुरू तसे नव्हत. ते स्वतः ब्रह्मस्वरूप असून त्यांची संगति देहाबरोबर जरी झाली तरी संगति घडलेल्या देहास ते आपणाप्रमाणें ब्रह्मस्वरूप बनवितात.

चित्ता समाधान दिलें अखंडित । निजानंदीं रत केलें सदा ॥ ४ ॥
दास ह्मणे गुरु माय पान्हावली । अनुग्रहें पाजिलीं शिष्यवृंदें ॥ ५ ॥

भजन.

जयजयराममारुती माउली । गुरुराममारुती माउली ।
सद्गुरु राममारुती माउली । माझी राममारुती माउली ॥ १ ॥
गुरु माते माझे राम मारुते रंगा येईं हो ॥ २ ॥
राममारुती माझे आई । मजला ठाव द्यावा पायीं ॥ ३ ॥
बालमुकुंदा आनंदकंदा । भक्त सखा श्रीगोविंदा ॥ ४ ॥
राममारुती सद्गुरुमाय । दीन अनाथा दाखवि पाय ॥ ५ ॥
राममारुती बलभीमा । मज दीनातें द्या प्रेमा ॥ ६ ॥
राममारुती सद्गुरुनाथ । शरणागत तव दीन अनाथ ॥ ७ ॥
माय बापा सद्गुरुनाथा । घ्या मज पदरीं दीन अनाथा ॥ ८ ॥

'वामन कांता' दादरः—

जनोद्धारार्थी । अवतार धरती । राममारुती ।
राममारुती । राममारुती । राममारुती । ध्रु ।
भक्तजन गृहीं । वास करुनी । भक्तिप्रेरिती ।
भक्तिप्रेरिती । भक्तिप्रेरिती । भक्तिप्रेरिती । १ ।
रामनाम । मंत्ररुपीं । ज्ञान पाजिती ।
ज्ञान पाजिती । ज्ञान पाजिती । ज्ञान पाजिती । २ ।
जन्मोजन्मीं । लाभो गुरू । राममारुती ।
राममारुती । राममारुती । राममारुती । ३ ।
* श्रावणमासीं । प्रेमसागरा । आली भरती ।
आली भरती । आली भरती । आली भरती । ४ ।
भजनिं दंग होउनि भक्त संगें नाचती ।
संगें नाचती । संगें नाचती । संगें नाचती ॥ ५ ॥
* आरति घेउनि कल्याण क्षेत्रीं । जाउनि राहती ।
जाउनि राहती । जाउनि राहती । जाउनि राहती ॥ ६ ॥

*टीपः—प्रकरण १२ पॅरिग्राफ १ व २ पहा.

हाय हाय । दिसेल काय । सगुणमूर्तिती ।
सगुणमूर्ति ती । सगुणमूर्ति ती । सगुणमूर्ति ती ॥ ७ ॥
अठराशेंचाळिस । षष्ठममासीं । कृष्णनवमिला ।
कृष्णनवमिला । कृष्णनवमिला । कृष्णनवमिला ॥ ८ ॥
शनवार साधुनी । ब्राह्म मुहुर्तीं । देह ठेविला ।
देह ठेविला । देह ठेविला । देह ठेविला ॥ ९ ॥
सुमनहार । गुंफुनियां । कंठीं अर्पिते ।
कंठींअर्पिते । कंठीं अर्पिते । कंठीं अर्पिते ॥ १० ॥
गुरुचरणीं । शिर ठेउनि । लक्ष्मी प्रार्थिते ।
लक्ष्मी प्रार्थिते । लक्ष्मी प्रार्थिते । लक्ष्मी प्रार्थिते ॥ ११ ॥
पद्महस्त । ठेवा शिरीं । पदर पसरितें ।
राममारुते । पदर पसरितें । राममारुते ॥ १२ ॥

रा. त्र्यंबक सदाशिव गुप्ते, कुलाबकरः—कल्याण.

अभंग १.

अनाथाच्या नाथा । अहो कृपावंता ।
ठेवियेला माथा । चरणावरी ॥ १ ॥
निरंतर वास । देई पायापाशीं ।
सेवा अहर्निशीं । घडो तुझी ॥ २ ॥
तुझा ह्मणवी दास । ऐसें करी आतां
पुरवी मनोरथा । गुरुराया ॥ ३ ॥
श्रीराममारुति । चरण आलिंगन ।
चित्ता समाधान । दास ह्मणे ॥ ४ ॥

अभंग २.

कृपाळा दयाळा । अहो गुरुराया ।
केंव्हां करिसि दया । कळेचिना ॥ १
कांहो करीतसा । स्वामी अनुमान ।
अभागी मी हीन । काय पापी ॥ २ ॥

शरण आलिया । तारणें हें ब्रीद ।
नाहीं भेदाभेद । तुह्मांपाशीं ॥ ३ ॥
निश्चय हा आतां । न सोडी चरणा ।
करीगा करुणा । दीनावरी ॥ ४ ॥
श्रीराममारुती । गुरुकृपावंता ।
नका पाहूं अंता । दासाचिया ॥ ५ ॥

अभंग ३.

गुरुराया माझ्या । कृपा करी आतां ।
तुजवीण त्राता । नाहीं कोणी ॥ १ ॥
अनाथाचा नाथ । दीनाचा कैवारी ।
होसी तूं निर्धारीं । गुरुराया ॥ २ ॥
मज पामरासी । तुझाचि आधार ।
माझा सर्व भार । तुझे पायीं ॥ ३ ॥
नाहीं नाहीं कोणी । तुजवीण मातें ।
शरण पदातें । आलों पाहीं ॥ ४ ॥
तूंचि माझा सखा । मायबाप बंधु ।
होसी कृपासिंधु । गुरुराया ॥ २ ॥
तुवां उपेक्षिल्या । भवाब्धीं बुडेन ।
तेथें मग कोण । तारी मज ॥ ६ ॥
सद्गुरुसमर्था । श्रीराममारुती ।
उजळी ज्ञानज्योती । हृदयांतरीं ॥ ७ ॥

अभंग ४.

मी तो पापराशी । धर्मकर्महीन ।
धरिले चरण । सद्गुरुचे ॥ १ ॥
गुरुमाय माझी । श्रीराममारुती ।
परब्रह्म मूर्ति । कृपावंत ॥ २ ॥
भक्तिभाव माझा । जाणूनि अंतरीं ।
ठेवी कर शिरीं । गुरुराया ॥ ३ ॥

अज्ञान तें माझें । सारोनियां दुरी ।
दावी एकसरी । सच्चिदानंद ॥ ४ ॥

दास ह्मणे गुरु-। कृपेचें महिमान ।
भेटे नारायण । शरणांगता ॥ ५

अभंग ५.

सद्गुरु माउली । परब्रह्म मूर्ती ।
ज्ञान दीप ज्योती । पाजळली ॥ १ ॥

प्रकाशीचा लाभ । होय तो जयाशी ।
धन्य पुण्य राशी । तोचि एक ॥ २ ॥

ज्ञानवैराग्याचा । भोगितो सोहळा ।
सुखें सुखावला । प्रेमानंदें ॥ ३ ॥

सद्गुरु प्रसादें । आनंद हो केला ।
परब्रह्मीं झाला । दास लीन ॥ ४ ॥

सद्गुरु निधान । श्रीराम मारुती ।
स्वानंदें नाचती । दासासंगें ॥ ५ ॥

अभंग ६.

आतां येई माझे । सद्गुरु गे माये ।
कृपादृष्टी पाहे । दीनदासा ॥ १ ॥

अपराध कोटी । केले आजवरी ।
क्षमा कोण करी । तुजवीण ॥ २ ॥

रक्षी रक्षी मातें । कृपाळे दयाळे ।
करुणा वेल्हाळे । गुरुमाये ॥ ३ ॥

वाहिला मी माथां । तुझे चरणावरी ।
वसे तूं अंतरीं । गुरुराया ॥ ४ ॥

गुरुराया माझ्या । श्रीराममारुते ।
स्वानंद सुखातें । देई दासा ॥ ५ ॥

अभंग ७

कांहो गुरुराया । त्यजिले सगुण ।
रतला निर्गुण । कांसयासी ॥ १ ॥
काय तेथें आहे । भक्तांचा तो मेळा ।
आणिक सोहळा । भजनाचा ॥ २ ॥
वाजे टाळ झांज । चिपळ्या मृदंग ।
विणा हो सुरंग । नामघोष ॥ ३ ॥
हरिगुण गाती । दासभक्तिभावें ।
तेथें त्वां नाचावें । प्रेमरंगें ॥ ४ ॥

आरत्या.

त्र्यंबक सदाशिव गुप्ते कुलाबकर, कल्याण.

चाल—सुखकर्ता दुःखहर्ता.

जयदेव जयदेव राममारुतिराया ।
ओवाळूं आरती तुजला गुरुवर्या ॥ ध्रु ॥

कायस्थ प्रभुकुळीं घेऊनी अवतार
राम–मारुति नामें सगुणी संचार ॥
ब्रह्मचर्यव्रत अखंड साचार ।
श्वासोश्वासीं राममंत्र उच्चार ॥ १ ॥

बाळमुकुंद गुरु जातां कैवल्यधामीं ।
भाषा त्यजुनी वाणी अर्पियली नामीं ॥
शिव शिव विठ्ठल मारुति जय जय श्रीराम ।
सहजावस्थीं ॐ कार उमटे सप्रेम ॥ २ ॥

कीर्तन भजन रंगीं प्रेम अनिवार ।
आनंदें डुलतां देहीं वीसर ।
हुंकार उड्डाणें घेउनी अपार ।
दासा दाखविला हा मारुति अवतार ॥ ३ ॥

निजदासा दाउनियां नवभक्तिसार ।
ज्ञानामृत पाजुनियां नेले त्यां पार ।
शांती सुख आनंद जेथें अपार ।
तये स्थानीं नेऊनी केलें त्यां स्थीर ॥ ४ ॥
भाद्रकृष्ण नवमीं अठराशें चाळीस ।
शनिवारीं गार्जीं निजधामीं वास ।
आरती ओंवाळी प्रेमें हा दास ।
दर्शन देउनि तया पुरवावी आस ॥ ५ ॥

हरिदास गोविंदात्मज रामचंद्र, भिवंडी.

चाल—श्रीतुकोबांचे आरतीची.

जयजयाजी सद्गुरु श्रीराममारुति हो ।
तुमच्या नामस्मरणें त्रिविधताप हरती हो ॥ ध्रु० ॥
संतानंत एकीकरण जगीं दाखविलें ।
संसारिं येवोनि जगत्कार्य आराधिलें ।
तनमनधन हें सर्वेश्वरीं अर्पण केलें ।
भद्रमासिं नवविधभक्तिनें निजधामा गेले ॥ १ ॥
वज्रासमहि कठिण भक्ती अंगीं संचारुनी ।
नामःस्मरणी कीर्तनरंगीं तल्लिन होवोनी ।
विदेहस्थितिप्रदीप्त होई मी हें विसरोनी ।
मीतूंपणासी ठाव नाहीं जयाचिया मनीं ॥ २ ॥
मुख्य साधन ब्रह्मचर्य हें ब्रह्माध्ययनाचे ।
अर्चन करुनि भक्तितत्व हें दाखवित साचे ।
परात्पर वाणि जयाची हरिरंगाणिं नाचे ।
रामकृष्णहरि विठ्ठल गणपति अक्षर ज्या वाचे ॥ ३ ॥
शुकसनकादिक संत सद्गुरु वचनीं विश्वास ।
ठेउनि वाणी अर्पियली श्रीहरि चरणास ।
सत्संगतिच्या तीर्थीं रिझवित देहास ।
गुरुकृपांजन लेउनि डोळा दाखवि सुजनांस ॥ ४ ॥

बाळपणीं ज्या तनुचे जातक शंकर अभिधानीं ॥
विवर्तविले सभाग्यसंपन्न ज्या सत्पुरुषांनीं ।
गुरुकृपेनें हरिनामामृत प्राशिताचि कर्णीं ।
दाविली तनु श्रीराममारुति साक्षर संजिवनीं ॥ ५ ॥

हीच आस मनिं अक्षय तुमचे चरणाचा हेत ।
श्रीरंगासन्निध आमुचि सांगावी मात ।
अनाथ अपराधी आह्मीं अवगुणी बहूत ।
श्रीहरि चरणीं निरवा ह्मणे हा गोविंदसुत ॥ ६ ॥

डॉ. त्र्यंबक बाळकृष्ण मराठे, भिवंडी.

चाल--आरती भुवनसुंदराची.

आरती राममारुतीची । शंकर नाम तया प्रभूची ।
हरिहर विठ्ठल नामाचा । अहर्निश छंद असे ज्याचा ।
अद्भुत प्रेमा भजनाचा । निस्पृह ब्रह्मचारी साचा ॥
॥ चाल ॥ साधन नामस्मरणाला । लाविले बहुत ।
लोक जे पतित । करुनियां पुनित ।
अखंडित नाम गर्जनेची । प्रित बहु स्वरूप समाधीची ।
आरती राममारुतीची ॥ १ ॥

आपपर भाव जया नाहीं । जग हें ब्रह्मरूप पाहीं ।
रघुपति नाम मुखें गाई । भजनीं भान नसे कांहीं ।
॥ चाल ॥ सनातन धर्मजागृतीला । कलियुगीं संत ।
जाहले बहुत । त्यांत हनुमंत । अलंकृतमूर्ति सज्जनाची ।
अवतरे भीमापुरी साची । आरती राममारुतीची ॥ २ ॥

सद्गुरु बालमुकुंदाचा । पद्मकर विलसे शिरिं ज्याच्या ।
विनवी त्र्यंबक नामाचा । बोलवी विश्वनाथ वाचा ॥
॥ चाल ॥ अहा ही अघटित तव लीला । समाधीस्थान ।
करुनि कल्याण । भक्तजन त्राण । पतित पावनाची ।
निरंतर झाली वस्ति ज्याची ॥ आरती राममारुतीची ॥ ३ ॥

श्रीराममारुतिदास, कल्याण.

चाल—आरती सप्रेम जयजय विठ्ठल परब्रह्म.

आरती सप्रेम जयजय सद्गुरुनाथाला ।
राममारुतीराज भुजंगनाथाला ॥ ध्रु० ॥
निर्गुणरूपीं ब्रह्म सद्गुरु नरदेहीं नटला ।
मायाभ्रांतीयुक्त जीव निर्भ्रम केला ॥
त्यागुनि शबल ब्रह्म अंतीं गुह्यात्मा दावियला ।
सद्गुरु कृपा होतां ब्रह्मानंद उज्वळिला ॥ १ ॥
चांद्रसेनियवंशीं येउनि प्रभुकुल उद्धरिलें ।
बालपणापासून ब्रह्मचर्यव्रत केलें ।
उच्छंखल वृत्ती दाउनि संतपणा लपविलें ।
बालमुकुंद सद्गुरु चरणीं देहार्पण केलें ॥ २ ॥
नामीं बहु आवडी तुह्मां भजनीं तल्लीनता ।
कीर्तनरंगीं दंग वृत्ती होई तन्मयता ।
उड्डाणावरि उड्डाण घेतां स्वरूपीं तद्रुपता ।
भुःभुःकारें हनुमान वाटे आले अवचिता ॥ ३ ॥
सहज समाधी सोहं शब्दें अनुहत गाजविला ।
अंतर्वाचा परावाणी राजयोग आचरिला ।
लौकिक भाषा त्यजुनी वदला ईश्वर नामाला ।
शिव शिव विठ्ठल हरेहरे राम गोविंदा गोपाळा ॥ ४
मुंबापुरिहुनि योगद्वारें काशिपुरीं गेले ।
गंगा डोहीं बुडतां बुडतां गुरुबंधु वांचविले ।
वाडी क्षेत्रीं श्रीगुरुदत्तदर्शन जैं घडलें ।
गुरुबन्धुसि ओढुनी श्रीचरणावरिं लोळविलें ॥ ५ ॥

१ प्रकरण १० पहा. २ प्रकरण ३ पहा. ३ प्रकरण ४ पहा. पॅरिग्राफ २ पहा. ४ प्रकरण ४ पहा. ५ प्रकरण ६ पॅरिग्राफ ३ व प्रकरण ७ पहा. ६ प्रकरण ५ पॅरिग्राफ ४ पहा. ७ प्रकरण ४ पॅरिग्राफ ४ पहा.

साधकाची वृत्ति एका कीर्तनीं ढळली ।
उड्डाणासरसी ग्रंथीं बैसवुनी दिधली ।
परकिय शिष्य ह्मणुनि उपेक्षा मुळीं न त्वां केली ।
ऐशी प्रेमळ माय माझी सद्गुरु माउली ॥ ६ ॥
कासवीसम प्रेमशिष्यावरि त्वां केलें ।
ब्रह्मगिरीवर सोहंमार्गें प्रयाण करविलें ।
भुजंगनाथ आपण ऐसे अंतरिं जाणविलें ।
नाथांचा अवतार संतउदयासी आले ॥ ७ ॥
लौकिकदृष्ट्या प्रसिद्ध झाला ब्रह्मविद संत ।
उड्डाण भुःभुःकारें लोकीं दिसला हनुमंत ।
प्रगट न केलें स्वरूप आपुलें भूजंगनाथ ।
ऐशी सद्गुरु माय केवळ श्रीगुरुदत्त ॥ ८ ॥
अँठराशे चाळीस शके मारुति वाराला ।
षष्ठममासीं द्वितीयपक्षीं नवमी तीथीला ।
ब्राह्ममुहूर्तीं ब्रह्मानंदीं कल्याणीं स्थिर झाला ।
तेजोरूपीं वास आह्मां सर्वांतरिं केला ॥ ९ ॥
संतसमागम देई नाथा विनती ऐकावी ।
नेटका संसार करवुनि परमार्थी लय लावी ।
कृतांतासी न भी ऐसें आपणासम करवी ।
राममारुतीदास नित्य गुरुपदिं मन ठेवी ॥ १० ॥

चाल—आरती ज्ञानराजा.

आरती गुरुवर्या । राममारुतिराया ॥
अवतार सिद्ध संत । नाथ भुजंगराया ॥ ध्रु० ॥
धनुष्य अर्ध मात्रा । बाण ॐकार राम ॥
लक्षुनि शुन्यासन । भेदीले ब्रह्मधाम ॥ १ ॥
ब्रह्मचि गुह्य ठेले । ब्रह्मि मिळूनि गेले ॥
नमन गुरुचरणीं । कल्याण पुनीत केलें ॥

---

८ प्रकरण ९ पान ५० पहा. ९ प्रकरण ९ पॅरिग्राफ ४ पहा. १० प्रकरण १२ पहा.

[ चाल ] येई वो विठ्ठले माझे माउली ये ।

येईगे गुरुमाय माझे राम मारुती ।
सगुण दर्शन देई ओवाळुं आरती ॥ ध्रु० ॥
अमूर्त ब्रह्म मूर्त होई वियोग साहिना ।
भक्ति वश हे ब्रीद आपुलें राखाना ॥ १ ॥
विशाळ भाळ शोभत कर्णीं कुंडलें ।
रत्नहार कंठीं तेजोमय रुळे ॥ २ ॥
सोनियाचा कमरबन्ध पायीं नूपुरे ।
ताम्रकंकण हस्तीं पाहुनि मन मुरे ॥ ३ ॥
सावध चित्तें पहा पीतांबर लाल ।
सद्गुरु माय आली घेउनि कृपेची शाल ॥ ४ ॥
नाचा स्वामी भजनीं आवड पुरवावी ।
राम मारुतीदास कर जोडूनि विनवी ॥ ५ ॥

( भजनरूपी महामंत्र. )

**गोविंद रामा । गोपाळ रामा ॥ १ ॥**
**गोविंद रामा । गोपाळ रामा ॥ २ ॥**
**गोविंद रामा । गोपाळ रामा ॥ ३ ॥**

( राममारुतिदासः—कल्याण )

**नमस्काराष्टक.**

वसे अंतरीं ज्या समाधान शांती ।
अशी माउली ज्या मिळे ब्रह्ममूर्ती ।
तया भ्रांति कैंची भव रोग गेला ।
नमस्कार माझा गुरु पादुकांला ॥ १ ॥
अहंकार योगें अविवेक वृत्ती ।
अविवेक योगें जडाभास दृष्टी ।
सत्संग होतांच भ्रम दूर झाला ।
नमस्कार माझा गुरुपादुकांला ॥ २ ॥

अंगींच वैराग्य दृढ बाणवीतां ।
नुरेना कशी ती सुखःदुख वार्ता ।
असा थोर भाग्यें कृपाबोध केला ।
नमस्कार माझा गुरुपादुकांला ॥ ३ ॥

जया ध्यास लागे भवाब्धी तरावा ।
तयानें हरी सर्वभूतीं पहावा !
गुरू माउलीनें असा बोध केला ।
नमस्कार माझा गुरु पादुकांला ॥ ४ ॥

गुरु कृपेनें लाहिजे ज्ञान दृष्टी ।
मिळे वस्तु ती जी मुळीची स्वकंठीं ।
स्वरूपानुसंधानें तो मुक्त झाला ।
नमस्कार माझा गुरु पादुकांला ॥ ५ ॥

भुजंगासि पाहे मनीं भीत आहे ।
परी दीप योगें रज्जु देखताहे ।
ज्ञानार्क उदयीं भव दग्ध झाला ।
नमस्कार माझा गुरु पादुकांला ॥ ६ ॥

जया वक्षभागीं सदा देव राहे ।
असा संतराणा नित्य भेटताहे ।
जयाचे कृपें थोर हा लाभ झाला ।
नमस्कार माझा गुरु पादुकांला ॥ ७ ॥

किती आठवूं या उपकार राशी ।
न सोडी कदा माउलीच्या पदाशीं ।
स्मरावें किती ते अशा सद्गुरूला ।
नमस्कार माझा गुरु पादुकांला ॥ ८ ॥

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय
ग्रा. क्र.....
वि. ........



## श्रीराममारुति महाराज की जय.

### त्रयोदशाक्षरी नमस्कार.

श्रीरामश्रीराम मुखीं श्वास वाहे ।
सदा रामरूपाहृदीं पाहता हे ।
सखा एक श्रीराम हा ध्यास ज्याला ।
नमस्कार माझा गुरु पादुकांला ॥ १ ॥

रामाविणें व्यर्थचि सर्व कांहीं ।
पदार्थादिका एक रूपेंचि पाही ।
अवस्था त्रयीं शुद्ध जाणीव ज्याला ।
नमस्कार माझा गुरु पादुकांला ॥ २ ॥

मदादि रिपुंसी न थारा शरीरीं ।
जसा कालियाकृष्ण हो धाक भारी ।
जना शत्रु ते मित्र होती जयाला ।
नमस्कार माझा गुरु पादुकांला ॥ ३ ॥

मायेंत ज्यांचें मन नाहिं ठेलें ।
मूळस्वरूपीं मन गुन्तवीलें ।
लोभांतही जो न कधीं बुडाला ।
नमस्कार माझा गुरु पादुकांला ॥ ४ ॥

रुपीं जयानें मन मूरडीलें ।
नेवोनि उगमा रुपातीत केलें ।
सदा सच्चिदानन्द डोहीं बुडाला ।
नमस्कार माझा गुरु पादुकांला ॥ ५ ॥

तितिक्षादि ज्ञानें च हो पूर्णयोगी ।
व्यतिरेक बोधें निजानन्द भोगी ।
वंचनादिमार्गीं न जाई न गेला ।
नमस्कार माझा गुरु पादुकांला ॥ ६ ॥

मनोजयें ब्रह्मसुखादि प्राप्ती ।
आत्मानुभावें मिळे पूर्ण मुक्ती ।
असा सच्चिदानन्द ज्यासी मिळाला ।
नमस्कार माझा गुरु पादुकांला ॥ ७ ॥

हा कोण कोठील कुठें यासि जाणें ।
विवरोनि केला उपदेश जेणें ।
जयाच्या कृपें बोध सुगम्य झाला ।
नमस्कार माझा गुरुपादुकांला ॥ ८ ॥
राहोनियां नित्य समाधि योगीं ।
वागूनि जनिं जो विषया न भोगी ।
परी राजयोगी असा हो जनांला ।
नमस्कार माझा गुरुपादुकांला ॥ ९ ॥
जनीं वावरे ब्रह्मचर्यासि राखी ।
असा संत राणा सदा वंद्य लोकीं ।
महारुद्र हा नाथरूपें मिळाला ।
नमस्कार माझा गुरुपादुकांला ॥ १० ॥
की राम हा कीं नाथ कीं मारुती हा ।
नको कल्पना रे रुपातीत तो हा ।
गुणातीत ऐशा महापूरुषाला ।
नमस्कार माझा गुरुपादुकांला ॥ ११ ॥
जयाचेनि बोधें तदाकार व्हाया ।
एको देवः केशवो वृत्तिसीया ।
मुळारंभ हा अंतरीं दृढ झाला ।
नमस्कार माझा गुरुपादुकांला ॥ १२ ॥
यशः कीर्ति हानी समदृष्टि पाहे ।
कृपाळूपणें जो सदोदित राहे ।
असा सद्गुरू पूर्वपूण्यें मिळाला ।
नमस्कार माझा गुरुपादुकांला ॥ १३ ॥

# स्फुट पदें वगैरे.

श्रीराममारुतिदास—कल्याण.

पद.

## एकविंशति गणेश नामस्मरण.

चालः–राधाधर मधुमिलिंद.

गणपति गणराज । भज मन गजानन महाराज ॥ ध्रु० ॥
एकदन्त स्मर स्मर मोरेश्वर । चिंतामणि ढुंढिराज ॥ भजमन ॥ १ ॥
सिद्धिविनायक आशापूरक लंबोदर महाराज ॥ भज० ॥ २ ॥
निशिदिनिं गा तूं त्या हेरंबा विकट सुमुख विनायकराज ॥ भ० ॥३॥
विसरुं नको रे क्षणभरिही तूं ब्रह्मणस्पति ज्येष्ठराज ॥ भ० ॥ ४ ॥
विघ्नहरा स्मर अहर्निशीरे वक्रतुंड राखिल लाज ॥ भ० ॥ ५ ॥
भालचंद्रपदिं दान माग हें अखंड स्मरणामृत पाज ॥ भ० ॥ ५ ॥
वरद गणेशा जाइ मिळोनी साध कीं रे तव काज ॥ भ० ॥ ७ ॥
राममारुतिदास ह्मणे बा स्मर आधीं गुरुराज ॥ भजमन ॥ ८ ॥

## वैराग्यपर.

[ चाल ] अभाग्याचे घरीं बाबा कामधेनु आली.

वैराग्यातें साधाया तुज जाणें नको राना ।
प्रपांचिं राहुनि सोडि आसक्ती विषयावरि नाना ॥ ध्रु० ॥
इंद्रिय दमना करुनी साधी शान्ति समाधाना ।
षड्रिपु जिंकुनि आवरिरे त्या स्वैरौढाळ मना ॥ वैराग्य ॥
कर्तुत्वाचा लेप न धरिरे कार्ये करितांना ।
घडेल तें तें सुखें घडोंदे वंचु नको माना । वैराग्या ॥ २ ॥
आपत्तीनें मानि न खेदा ठेवी स्वस्थ मना ।
परधन परस्त्री विष सम मानी लक्ष असों दे दाना ॥ वैराग्या ॥ ३ ॥

साधन करुनी मन वाहीं तूं सद्गुरुच्या चरणा ।
सद्गुरुकृपा होतां समरस होसी इश चरणा ॥ वैराग्यातें ॥ ४ ॥
सद्गुरु सांगड तरउनि नेई अनुभव हा जाणा ।
राममारुतीदास धरीतो एकचि त्या चरणा । वैराग्यातें ॥ ५ ॥

## बोध बत्तीसी

(भूप)

नेणसि तूं जासि फसून ॥ मानवा ॥ नेणसि तूं जासि फसून ॥ ध्रु० ॥
मिथ्या अवघा दृश्य पसारा सत्यचि मानिसि भुलून ।
कोण कोणाचे आप्त सोयरे जाशिल एकला निघून ॥ मानवा ॥ १ ॥
जातां एकटा सर्वहि रडती बाइल पोरें घरिं बसून ।
आप्त सोयरे परत फीरती स्मशान यात्रा करून ॥ मानवा ॥ २ ॥
धनदौलत आदि सर्व पसारा लोभें ठेविसी करून ।
यम नेतां तुज जाशिल बारे खांका बगला वर करून ॥ मानवा ॥ ३ ॥
कर्मवासना संगें जाती येसी मागुति जन्मून ।
ऐशा कितितरि येजा करिशी आड रानीं तूं चुकून ॥ मानवा ॥ ४ ॥
रक्तरेतमय देह तुझा रे परि सुंदर तो समजून ।
नटविशि त्यातें रंगभूमिवरी येत जसा नट सजून ॥ मानवा ॥ ५ ॥
मांस हाडाचा हौद रचिला शोणित वाहे मधून ।
जिवजन्तूसह नर्ककुंडही तुडुंब उदरीं भरून ॥ मानवा ॥ ६ ॥
लाळमुत्रांचे प्रवाह वाहति गटार बरें त्याहून ॥
देह असारे चोखट गणिसी केवळ दुर्गंधि असून ॥ मानवा ॥ ७ ॥
अहंकारमय मूर्तिच केवळ मीं मीं माझे करिसि बसून ।
तमो गुणें तूं स्वैर चालसी नीतिपथ रे सोडून ॥ मानवा ॥ ८ ॥
विषयलोलुप तूं माशी जैशी बसे गुळावर डसून ।
धनतृष्णा तरि अपार तव किती भुजंग बरा तुजहून ॥ मा० ॥ ९ ॥
बाळपणीं त्वां खेळ खेळुनी तरुणपणीं विषय भोगून ।
वृद्धपणींही ईश नाठवितां फुकट जाशी रे मरून ॥ मा० ॥ १० ॥

देहरुपी ही नौका तुझी रे षड्रिपु नेती वल्हवून ॥
नरक सागरीं नेउनि देती जीव तुझा ढकलून ॥ मा० ॥ ११ ॥
घडिभरि तरी हरिस्मरण करी सार्थक घे बा करून ।
जगदीशाला शरण जाउनी घेई आपुला करून ॥ मा० ॥ १२ ॥
जवळी असतां दूराचि भासे अंतरिची ही खूण ।
सद्गुरु चरणीं लीन होऊनी घेई रे पटवून ॥ मा० ॥ १३ ॥
अभ्यासें मग आत्मस्वरूपा घेई रे ओळखून ।
ब्रह्मस्वरुप तूं होतां जाशी ईशपदातें मिळून ॥ मा० ॥ १४ ॥
जन्ममरण मग कैंचें तुजशी स्वयेंचि ईश्वर ह्मणून ।
लवण बाहुली जाई जैशी सागरातें मिळून ॥ मानवा ॥ १५ ॥
राममारुतिदास ह्मणे बा इंद्रियदमनें करून ।
वैराग्यातें साधुनि जाई भवसागर तूं तरून ॥ मानवा ॥ १६ ॥

श्लोक ( शार्दूल विक्रिडित. )

राखी याद पुरी नसेचि तुज बा सत्ता शरीरावरी ।
नाहीं आप्त तुझे कलत्र सुतही सत्ता न काडीवरी ।
वृक्षाचें हलतें न पान कधिंही त्या एक सत्तेविना ।
वायां कां फससी प्रपंचिं भुलसी कांहीं करी साधना ॥ १ ॥

सद्गुरुपर आरती.

सगुण ही आरती निर्गुण ओवाळूं । निर्गुण ओवाळूं ॥
कल्पनेचें घृत घालुनी दीपे पाजाळूं ॥

ओवाळुं आरती सद्गुरुनाथा । माझ्या स्वामीनाथा ॥
भावें चरण कमलावरी ठेविला माथा ॥ ध्रु० ॥

अविद्येचे मोड पडतां उपडोनी काढूं । उपडोनी काढूं ॥
आशा मनशा तृष्णा काम कुरवंडी करूं ॥ ओवाळुं आ० ॥

सद्गुरुचें पूजन केलें षोडषोपचारें ॥ षोडषोपचारें ॥
रामानंद जीवन्मुक्त झाले संसारें ॥ ओवाळुं आरती ॥

प्रदक्षिणा.

धन्य धन्य हे प्रदक्षिणा सद्गुरुरायांची[1] ।
झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ॥ ध्रु० ॥
पदोपदीं अपार झाल्या पुण्याच्या राशी ।
सर्वहि तीर्थें घडली आह्मा आदि करुनि काशी ॥ १ ॥
मृदंग टाळ घोष भक्त भावार्थें गाती ।
नाम संकीर्तनें नित्यानंदें नाचती ॥ २ ॥
कोटी ब्रह्महत्या हरती करितां दंडवत ।
लोटांगण घालितां मोक्ष लोळे पायांत ॥ ३ ॥
गुरु भजनाचा महिमा न कळे अगमानिगमासी ।
अनुभवि ते जाणति जे गुरुपदिंचे अभिलाषी[2] ॥ ४ ॥
प्रदक्षिणा करुनी देह भावें वाहिला ।
श्रीरंगात्मज विठ्ठल पुढें उभा राहिला ॥ ५ ॥

अभंग.

दसरा दिवाळी तोचि आह्मा सण । सखे संतजन भेटतील ॥
अमुप जोडल्या सुखाचिया राशी । पार या भाग्यासी न दिसे आतां ॥
धन्य दिवस आजि जाला सोनियाचा । पिकली हे वाचा रामनामें ॥
तुका ह्मणे काय होऊं उतराई । जीव टेवूं पायीं संताचिये ॥

ॐ शांतिः शांतिः शांतिः

॥ श्री सद्गुरूचरणार्पणमस्तुः ॥

---

१ दुसऱ्यांदा म्हणतांना "साधूरायाचा" असें म्हटलें असतां जास्त माधुर्य वाटतें. २ कोठें "रहिवासी" असाही पाठ आहे.

# आश्रयदाते होणारे सद्गृहस्थांचीं नांवें

| प्रती | | नांव |
|---|---|---|
| ५ | रा.रा. | अनंत सखाराम देशपांडे, ठाणें |
| ५ | ,, | अनंत विश्वनाथ चित्रे, B. A. L. L. B. ठाणें |
| ५ | ,, | अनंत महादेव कर्णिक, दादर |
| ५ | ,, | अनंत रावजी जयवंत, दादर |
| ५ | ,, | अमृतराव नारायण वैद्य, जबलपूर |
| ५ | ,, | अनंत पांडुरंग चौबळ, कल्याण |
| ५ | ,, | आत्माराम गणपतराव गुप्ते, अलिबाग |
| ५ | ,, | आत्माराम रामचंद्र ताम्हणे, पुणे |
| ५ | ,, | कृष्णराव सिताराम सोनाळकर, B. A., L. L. B. मुंबई |
| ५ | ,, | कृष्णराव दाजीबा दीघे, ठाणें |
| ५ | ,, | कृष्णराव पांडुरंग तुंगारें, पनवेल |
| १० | ,, | कृष्णराव वासुदेव चौबळ, कल्याण |
| ५ | ,, | कमळाकर गणेश सुळे, मुंबई |
| ५ | ,, | काशिनाथ राजाराम प्रधान, कल्याण |
| ५ | ,, | काशिनाथ नारायण प्रधान, घोट, पनवेल |
| ५ | ,, | काशिनाथ गोविंद नवरे, शिंव |
| ५ | ,, | काशिनाथ सिताराम देशमुख, गव्हाण, पनवेल |
| ५ | ,, | केशव मोरेश्वर फडके, पनवेलकर, पनवेल |
| ५ | ,, | केशव रामचंद्र ताम्हणे, नागपुर |
| ५ | ,, | केशव रावजी बक्षी, पालघर |
| ५ | ,, | केशव गणेश गुप्ते, दादर |
| ५ | ,, | केशव भगवंत प्रधान, बडोदे |
| ५ | ,, | केशव महादेव सोनाळकर, जळगांव |
| ५ | ,, | केशव सिताराम कर्णिक, डहाणू |
| ५ | ,, | खंडेराव सखाराम देशपांडे, ठाणें |
| ५ | ,, | खंडेराव शामराम कोठारे, मुंबई |
| ५ | ,, | गंगाधर सिताराम मोकाशी, पेण |

| प्रती | | नांव |
|---|---|---|
| ५ | रा.रा. | गजानन गोविंद समर्थ, कल्याण |
| ५ | ,, | गजानन सखाराम गुप्ते, B. A., L. C. E. दादर |
| ५ | ,, | गजानन भास्कर गुप्ते, दादर |
| ५ | ,, | गजानन महादेव कारखानिस, दादर |
| ५ | ,, | गणपतराव नारायण प्रधान, बडोदे |
| ५ | ,, | गणेश लक्ष्मण सुळे, पनवेल |
| ५ | डॉ. | गोपाळ आबाजी नाडकर, L. M. & S स्टेट सर्जन धार, |
| ५ | रा.रा. | गोपाळराव बाळकृष्ण डबीर मोतीवाले, दादर |
| ५ | ,, | गोपाळराव बळवंत पेणकर, इंदूर |
| ५ | ,, | गोपिनाथ धोंडदेव गुप्ते, खानापूर |
| ५ | ,, | गोविंद आपाजी गुप्ते, निफाड |
| ५ | ,, | गोविंद कृष्ण प्रधान, पंढरपुर |
| ५ | ,, | जगन्नाथ बाळकृष्ण कर्णिक, म्हसळे, जंजिरा |
| ५ | ,, | जनार्दन गणेश जाईल, पनवेल |
| ५ | ,, | झीणाभाई विठ्ठल वणजारा, चेंबुर |
| ५ | ,, | ताम्हणे ब्रदर्स, ठाणें |
| ५ | ,, | त्रिंबक निळकंठ कर्णिक, मुंबई |
| ५ | ,, | त्रिंबक आनंदराव कर्णिक, कल्याण |
| ५ | ,, | त्रिंबक रावजी प्रधान, ठाणें |
| ५ | ,, | तुळशीदास परशोत्तमदास, मुंबई |
| ५ | ,, | दत्तात्रय काशिनाथ देशपांडे सेक्रेटरी, महाराष्ट्र ना. मंडळी |
| ५ | ,, | दत्तात्रय रामचंद्र गुप्ते, मुंबई |
| ५ | ,, | दत्तात्रय आत्माराम जयवंत, भिवंडी |
| ५ | ,, | दत्तात्रय यशवंत गडकरी, कुर्ला |
| ५ | ,, | दत्तात्रय मार्तंड प्रधान, शहापुर |
| ५ | ,, | दत्तात्रय मुकुंद देशपांडे, महाड |
| ५ | ,, | दत्तात्रय यशवंत कर्णिक, कल्याण |
| ५ | ,, | दत्तात्रय अमृत आंबेगांवकर, बडोदे |

| प्रती | नांव |
|---|---|
| ५ | डॉ. दत्तात्रय जगन्नाथ गुप्ते, L. M. & S. कल्याण |
| ५ | रा.रा. दत्तात्रय जयराम बेंद्रे, बोरखेडी; नागपुर |
| ५ | ,, दामोदर विठ्ठल प्रधान, कल्याण |
| ५ | ,, दामोदर सदाशिव श्रोत्री, ठाणें |
| ५ | ,, द्वारकानाथ रामचंद्र कर्णिक, यवतमाळ |
| ५ | ,, द्वारकानाथ पांडुरंग देशपांडे, नागोठणे |
| ५ | ,, द्वारकानाथ वामन कोतवाल, अकोला |
| ५ | ,, द्वारकानाथ निळकंठ कर्णिक, मुंबई |
| ५ | ,, द्वारकानाथ गणेश देशमुख, रोहे |
| ५ | ,, द्वारकानाथ दामोदर चित्रे, उज्जन |
| ५ | ,, नानाभाई गोविंद चित्रे, मुंबई |
| ५ | रा.सा. नानासाहेब घाटवळ डि. सुप. पोलीस, पुणें |
| ५ | ह. भ. प. नानामहाराज श्रीगोंदेकर |
| ५ | रा.रा. नारायण गणेश गडकरी, कल्याण |
| ५ | ,, नारायण गणेश जयवंत, डहाणू |
| ५ | ,, नारायण द्वारकानाथ रणदिवे B. A. L. L. B. कल्याण |
| ५ | ,, नारायण मार्तंड धारकर, पेण |
| ५ | ,, नारायण विठ्ठल रणदिवे (वढावकर) रेलवे यार्ड, कल्याण |
| ५ | ,, निळकंठ रघुनाथ मेढेकर, बडोदे |
| ५ | ,, निळकंठ भाऊराव वढावकर, ठाणें |
| ५ | ,, परशराम अप्पाजी नाचणे, डहाणू |
| ५ | रा. ब. प्रभाकर विठ्ठल गुप्ते, ठाणें |
| ५ | रा.रा. पांडुरंग वामन दुर्वे, कल्याण |
| ५ | ,, पुरुषोत्तम वामन लिखिते, गोऱ्हेकर, ठाणें |
| ५ | ,, बलवंत हरी नाचणे, डहाणू |
| ५ | ,, बल्लाळ रघुनाथ चित्रे, भोर |
| ५ | ,, बळवंत हरिशंकर पाटिल. दादर |
| ५ | ,, बळवंत चिमाजी कोहोजकर, ठाणें |

| प्रती | नांव |
|---|---|
| ५ | रा.रा. बळवंत खंडोजी रांजणे, ठाणें |
| ५ | ,, बाळकृष्ण वामन खारकर, B. A., ठाणें |
| ५ | ,, बाळकृष्ण बाबूराव फणसे, वांद्रे |
| ५ | ,, बाळकृष्ण बळवंत मुळे, जबलपुर |
| ५ | ,, बाळकृष्ण बाजीराव चित्रे, मुंबई |
| ५ | ,, भास्करराव लक्ष्मण जयवंत, मुंबई |
| ५ | ,, भिमाबाई आत्माराम सावंत, परळ |
| ५ | ,, मगनलाल विठ्ठलदास शाह, मुंबई |
| ५ | ,, मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें |
| ५ | ,, मल्हार विनायक राजे B. A, कल्याण |
| ५ | ,, महादेव रामचंद्र ताह्मणे, पुणें |
| ५ | ,, महादेव रामचंद्र रानडे, कल्याण |
| ५ | सरदार माधवराव नारायण फडणीस, देवास |
| ५ | प्रो. माणिकराव, बडोदे. |
| ५ | रा.रा. मोतीराम बापुजी विजयकर, वांद्रे |
| ५ | ,, मोरेश्वर आत्माराम देशमुख, ठाणें |
| ५ | शेट मोहनलाल नथुभाई, तळेगांव |
| ५ | रा.रा. यशवंत अनंत गुप्ते, कर्जत |
| ५ | ,, यशवंत काशिनाथ फणसे, कल्याण |
| ५ | ,, रघुनाथ सखाराम राजे, दहिवली |
| ५ | ,, रघुनाथ बाबाजी चौबळ, दादर |
| ५ | ,, रामकृष्ण माधवराव चिटणीस, दादर |
| ५ | ,, रामकृष्ण नारायण कोतवाल, ठाणें |
| ५ | ,, रामकृष्ण आत्माराम गुप्ते, पनवेल |
| ५ | ,, रामकृष्ण गणपतराव गुप्ते, कल्याण |
| ५ | ,, रामकृष्ण वामन गुप्ते, मुंबई |
| ५ | ,, रामकृष्ण सिताराम जयवंत, कल्याण |
| ५ | ,, रामचंद्र बाबाजी नाचणे, डहाणू |

## आश्रयदाते होणारे सद्‌गृहस्थांचीं नांवें.

| रु. | | नांव |
|---|---|---|
| ५ | रा.रा. | रामचंद्र वामन पाटणकर, ठाणें |
| ५ | ,, | रामचंद्र मोरेश्वर वैद्य, सासवडकर, ठाणें |
| ५ | ,, | रामचंद्र कृष्ण पुराणिक, पनवेल |
| ५ | ,, | रामचंद्र गजानन कणेकर, कल्याण |
| ५ | ,, | रामचंद्र यशवंत दळवी, पिंपळगांव |
| ५ | ,, | रामचंद्र महादेव वाकरे, मुंबई |
| ५ | ,, | रामचंद्र महादेव दळवी, कल्याण |
| ५ | ,, | रामचंद्र मुकुंद कुळकर्णी, तळे |
| ५ | ,, | रामचंद्र मोरेश्वर खळे, बडोदे |
| ५ | ,, | रामचंद्र गणेश दळवी, मुंबई |
| १० | ,, | लक्ष्मण गोविंद देशपांडे, वकील; उरण |
| ५ | ,, | लक्ष्मण मार्तंड गुप्ते, कल्याण |
| ५ | ,, | लक्ष्मण विनायक खळे, बडोदे |
| ५ | ,, | वामन गणेश हार्चेकर, दादर |
| ५ | ,, | वासुदेव रघुनाथ प्रधान, बडोदे |
| ५ | ,, | वासुदेव कृष्ण सांडु, मुंबई |
| ५ | ,, | विष्णु दामोदर ताह्मणे, विना |
| ५ | ,, | विनायक सिताराम पाटणकर, ठाणें |
| ५ | ,, | विनायक गणेश गडकरी, वेंगुर्लें |
| ५ | ,, | विनायक आबाजी दवणे, डहाणू |
| ५ | ,, | विनायक अमृत कारखानिस, वांद्रें |
| ५ | ,, | विनायक शिवराम धारकर, पेण |
| ५ | ,, | विनायक नारायण खारकर, ठाणें |
| ५ | ,, | विठ्ठल दिनकर कर्णिक, डहाणू |
| ५ | ,, | विठ्ठल त्रिंबक वढावकर, कल्याण |
| ५ | ,, | विश्वनाथ बळवंत जोशी उर्फ शामराव जोशी, दिवा कल्याण |
| ५ | ,, | विश्वनाथ धोंडशेट पाठारे, लो. बो. मेंबर, दुगाड, ता. भिवंडी |

## आश्रयदाते होणारे सद्गृहस्थांचीं नांवें.

| प्रती | नांव |
|---|---|
| ५ | रा.रा. शंकरराव जयरामराव झुंझारराव, नेवाळप |
| ५ | ,, शंकर सिताराम कर्णिक, वकील, अलिबाग |
| ५ | ,, शंकर बापुजी राजे, अंधेरी |
| ५ | ,, शंकर रामचंद्र मेढेकर, कल्याण |
| ५ | ,, शंकर सखाराम सुळे, कल्याण |
| ५ | ,, शंकर नारायण पत्की, वकील, पनवेल |
| ५ | ,, शंकर सिताराम वैद्रे, दादर |
| ५ | ,, शंकरराव जी. जुन्नरकर, माहिम |
| ५ | ,, शंकर रावजी चित्रे, मुंबई |
| ५ | ,, शंकर नारायण पालकर, बडोदें |
| ५ | ,, शंकर सदाशिव कोहोजकर, भिवंडी |
| ५ | ,, शामराव रावजी श्रोत्री, डहाणु |
| ५ | ,, शामराम सखाराम कामेरकर, दादर |
| ५ | ,, शांताराम गोविंद कुळकर्णी, कल्याण |
| ५ | ,, शिवराम भगवंत देशमुख, पनवेल |
| ५ | ,, शिवराम गणेश वडखळकर, माटुंगा |
| ५ | ,, शिवराम गोविंद सावंत, दुगाड, ता. भि |
| ५ | ,, श्रीपत लक्ष्मणराव साळसकर, खलिफा … म … कसरत शाळेचे मालक, काळा चौ … रोड; |
| ५ | ,, सच्चिदानंद रघुनाथ चित्रे, भोर |
| ५ | ,, सखाराम गणेश फडके, कल्याण |
| ५ | ,, सखाराम गोपाळ किलवनकर, मुंबई |
| ५ | ,, सखाराम त्रिंबक वढावकर, ठाणें |
| ५ | ,, सदाशिव त्रिंबक वढावकर, ठाणें |
| १० | ,, सदाशिव धोंडदेव देशमुख, तळे |
| ५ | ,, संतुराम राजाराम सुळे, कल्याण |
| ५ | ,, स्वयंसेवक, भिक्षुक; मुंबई |
| ५ | ,, सोमेश्वर पुरुषोत्तम भट (तंबाखुवाले) कल्याण |
| ५ | ,, हरीभाऊ केशव कर्णिक, डहाणू |
| ५ | ,, होरमसजी पालनजी मिस्त्री, मुंबई |

वा. क्र. ...३८०
दि. ...

IRBK-0100380